सालअखेर ,, ७ .... ८
किरकोळ अंकास .... .... .... ८४

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8
Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।८६
दुसरे खेपेस .... .... ०।

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 9 MARCH 1896 — NO 9

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख ९ माहे मार्च सन १८९६ इ० — अंक ९



## घड्याळ.

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि मक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.



आम्ही स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे रासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे मागील चजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस ६ जीवेल ( ह्मणजे चकांचे खालीं वर हिरे बसविले आहेत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यात व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षात दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— " गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पोळ.
१२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक.


## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, व स्टेशन धर्म शाळेचा कर वसूल करण्याचा सन १८९६।९७ सालचे हक्कांचा लिलांव ता० १९ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टाऊनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टाऊनहालांत हजर राहावें. कळावे तारीख १८।२।९६ इसवी.

B. M. Sathe
Secretary
Akola Municipal Committee

---

वऱ्हाड हायस्कुलांतील माजी विद्यार्थ्यांचें वार्षिक ग्यादरींग भरलें होतें त्यावेळीं रा० रा० लक्ष्मणराव ढोले यांनीं महत्वाकांक्षा या विषयावर संभाषण केलें. ते संभाषण येणें प्रमाणें:—

## महत्वाकांक्षा

महत्वाकांक्षा या विषयांवर मोठमाठ्या ग्रंथकारांचे अनेक ग्रंथ आहेत. त्यांनीं या विषयांचा पुष्कळ शोध करून आपआपल्या स्वतंत्र मतानुरूप उहापोह ही केला आहे तेव्हां अशा विस्तृत व गहन विषयाचें त्रोटक विवेचन अल्पावकाशांत करणें खरोखर फार कठिण आहे असो,

महत्वाकांक्षेच्या जोडीचा इंग्रजीत विषय पाहूं गेलें असता ambition असा उपलब्ध होतो. या विषयाचें स्वरूप असें दिसून येतें कीं महत्वाकांक्षा ही मनुष्यास अवश्यमेव असणें जरूरीचें आहे. महत्वाकांक्षा मनांत असणें हें महत्कृत्याचें मूळ बीजच होय. एका सुप्रसिध्द ग्रंथकाराचें म्हणणें आहे कीं "that glory and virtue ought to be the darling, nay, the only wish in life" यावरून महत्वाकांक्षा ही मनुष्यमात्रास अत्यावश्यक आहे. कारण ती जर मनुष्यामध्यें वास करणार नाहीं तर त्याचे हातून धाडसाच्या गोष्टी होणार नाहींत. शौर्य, औदार्य साहस इत्यादि गोष्टी त्याचें हातून कधींही घडून येणार नाहींत. आजपर्यंत जे जे लोक जगद्विख्यात होऊन गेले; त्यांनीं सत्कृत्याच्या योगानें आपणास, आपल्या कुलास व स्वदेशास प्रसिद्धीस आणिलें त्या त्या लोकांनीं बलवत्तर महत्वाकांक्षा मनांत धरल्या वांचून त्यांचे हांतून अशीं कृत्यें घडलीं असतील काय? याचें उत्तर अगदीं वरच आहे. सुखदुःखास एकीकडे सारून ऐषआरामाचा परित्याग करून व आपलें आयुष्य संसारांतील संकटांच्या कांट्यावर तोलून धरून केवळ आपला संकेत सिद्धीस नेण्या करितां मनुष्यास प्रवृत्त करणारी महत्वाकांक्षा काय ती एक होय. तिचा ज्या प्रमाणानें मनुष्याच्या मनावर पगडा बसला असेल त्याप्रमाणानें त्याच्या कृत्यास यशही येईल. आपण पुष्कळ प्रसंगीं असें पाहतो कीं पुष्कळ लोक मोठमोठीं कामें करण्याकरितां कंबरा बांधतात परंतु त्यांच्या पैकीं थोडक्यासच यश प्राप्त होतें. याचें कारण एवढेंच कीं त्यांचा निश्चय त्यांच्या कृत्याच्या मानानें मजबूत नसतो एरव्हीं प्रत्येक मनुष्यास त्याच्या त्याच्या दृढ निश्चयाच्या व प्रयत्नाच्या मानानें यश प्राप्त होतें. आपणास आपल्या प्रयत्नानुरूप यश मिळालें नाहीं ह्मणजे आपला आशातंतु ढिला पडतो व पुढें आपले हातून व्हावा तसा प्रयत्न होत नाहीं व कधीं कधीं आपण यत्न करणें ही सोडून देतो. जरी आपणास एखादी गोष्ट प्राप्त होण्यास चार श्रम जास्त पडत असले तरी आपण यत्न करणें सोडूं नये. मनुष्य जर नेटानें काम करील तर त्याच्या महत्वाकांक्षानुरूप त्यास फळ मिळेल लॉर्ड बेकनचें ह्मणणें आहे If a man look sharp and attentively he shall see fortune or though she is blind, she is not invisible" ह्म० मनुष्य जर बारीक रीतीनें व लक्षपूर्वक शोध करील तर लक्ष्मी त्यास सहज प्राप्त होईल कारण लक्ष्मी जरी आपण होऊन कोणाच्या पदरांत पडणारी नाहीं तरी तिचा शोध करणारास ती प्राप्त होणार नाहीं असें ही पण नाहीं. या करिता जर आपणास यश मिळविणें असेल तर तदनुरूप यथायोग्य प्रयत्न आपले हातून झाला पाहिजे. त्या प्रयत्नाचे ठळक मार्ग एक दोन येथें घेतले आहेत.

१ आपल्या वेळेचा सद्विनियोग.

जें काम ज्या वेळीं करणें इष्ट आहे तें त्या वेळीं केलेंच पाहिजे. त्यास क्षणैक विलंब लावतां कामा नये. वेळचे वेळीं कामें न झाल्यामुळें काय परिणाम होतात याची जगांत अनंत उदाहरणें आढळतात. नेपालियन बादशहाचा सेनाधिपती किलवमन यास एक पाव तास विलंब लागल्यामुळें त्यास वाटर्लू येथील लढाईत अपजय मिळाला व बिचाऱ्यास आजन्म विपत्तींत रहावे लागलें. नेपोलियनानें त्यावेळीं ह्मटलें आहे "I have observed that it is always these quarters of an hour that decide the fate of a battle." ह्मणजे अशाच प्रकारच्या अर्धा पाव तासाच्या विलंबामुळें लढायामध्यें भयंकर परिणाम होतात. हीच गोष्ट आपल्या आयुष्यास ही लागू आहे. आपण आपल्या आयुष्यांत करावयाच्या गोष्टी वेळच्या वेळीं न केल्यामुळें जनापवादास पात्र होतो. जगांमध्यें सर्वांसच जरी या प्रमाणें वागतां येत नाहीं तरी आपणामध्यें जे लोक प्रमुख आहेत, त्यांचे आचार विचारांचा इतर लोक कित्ता घेऊं पहातात, व ज्यांचेवर समाजाच्या बऱ्यें वाईटाचा बोजा आहे अशाचें तरी वर्तन योग्य वक्तशीर, नेमस्त असें असलें पाहिजे. नाहीं तर त्यांच्या वर्तनाचा कित्ता इतरास लागला असतां इतरांचें नुकसान होणार. अशी ह्मण आहे:—यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरे जनाः ह्मणजे आपणापैकीं जे कोणी श्रेष्ठ आहेत त्यांच्या वर्तनाप्रमाणें इतर लोकही वागतील. असा जर जगाचा नियम आहे तर आपणापैकीं प्रमुख लोकांस आपलें वर्तन निर्दोष राखणें अति अवश्यक आहे. मनुष्यानें आपले हातून होऊं शकेल अशाच कामाविषयीं इच्छा धरावी. जीं कामें ज्या वेळीं करणें जरूर आहेत तीं त्याच वेळेस आपले हातून होऊं शकतील किंवा नाहीं याचा पूर्वीच विचार केल्यानंतर तीं हातीं घ्यावींत. त्या वांचून तीं मुळींच घेऊं नयेत उगींच भाराभर कामें अंगावर घेऊन त्यापैकीं एकही काम वक्तशीर न करणें हें रास्त नव्हे. वरील प्रकारच्या वर्तनाचे दाखले आपणास आज मितीस पुष्कळ आढळून येतील. आपणा पैकीं पुष्कळांस, अशा तशास नव्हे तर विद्वान, सुप्रसिद्ध व हुशार अशा लोकांस, शेंकडों गोष्टी करण्याची उत्कटेच्छा असते पण त्यापैकीं एकही त्यांचे हातून घडून येत नाहीं. प्रसंगवशात त्यांच्यापेक्षां कनिष्ठ लोकांच्या हातून जीं कामें उत्कृष्ट रीतीनें व वेळच्या वेळीं होण्याजोगीं असतात तींच कामें यांचे हातीं पडल्यामुळें बिघडून जातात व तीं पुन्हा सुधारणें मुष्कील पडतें जगांत पैशा संबंधानें आपणास इतरांवर कितपत भरंवसा टेवितां येतो याचें विशेष वर्णन करणेंच नको कारण ह्या गोष्टी प्रत्येकाच्या अनुभवास येऊन चुकल्या आहेत. तेव्हां प्रत्येकानें पैशाचे कामांत व तत्संबंधी हिशेबाचे कामांत फार हुशारीनें वागलें पाहिजे. तेथें गाफिल राहून काही इतका फायदा नाहीं. आमचे इकडचे लोक सरकारापासून हक्क मागून घेण्यास मात्र सरसावतात परंतु तदनुरूप आपले हातून वर्तन होईल किंवा नाहीं याचा विचार करीत नाहींत. मागणें तेंही परिमितच असलें पाहिजे. महाराष्ट्र कवि मोरोपंत यांनीं केकावलींत ह्मटलें आहे.

" वृथाचि गमतें दिल बहु हि जे न दासा जिरे "
" पुसोनि अधिकार द्या सुकर तें सदा साजिरें॥ "

या वरून जें आपले हातून सहज अथवा अल्पायासानें होण्याजोगें असेल तेंच मागून घ्यावें. हवे तितकें मागून घेतलें परंतु तशाप्रमाणें वागणूक झाली नाहीं तर [illegible] नालाइकी मात्र पदरांत पडते. आमच्या [illegible] सुदैवानें ह्मणा अथवा दुर्दिनरूप घोरांधःकारांत अल्पतेजानें चमकणाऱ्या सदैवाच्या चांदण्याचा थोडकासा उजेड पड यामुळें गत [illegible] म्हणा आह्मास स्थानिक स्वराज्याचे [illegible] मिळाले आहेत, ते देखील आम्हास [illegible] जड जात आहे व ते पाळण्यामध्यें [illegible] वर्तन नीट व वक्तशीर नसल्यामुळें आ[illegible] नालायक ठरत चालला आहों. अशा रीतीनें नालायक ठरण्या पेक्षां " झांकली मूठ सवा लाखाची " या ह्मणी प्रमाणें वर्तन करणें फार चांगलें. आपले हातुन होत असल्यास कोणतेही काम अंगावर घ्यावें नाहीं तर उगींच ते अंगावर घेऊन नालायक बनूं नये. असें उद्गार काढण्याचे प्रयोजन एवढेंच कीं, वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या गोष्टी आ-

पल्या प्रत्यक्ष अनुभवास येत आहेत. सरकारानें बहुमानानें ज्यांस आपले अधिकार देऊन थोर पदवीत चढविलें आहे त्यांनीं आपले कामांत वक्तशीर वर्तन न ठेविल्यामुळें किती नुकसानें आजपर्यंत होत आलीं आहेत त्याचा सविस्तर इतिहास देण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं. रावण कुंभकर्णाच्या नाटकांत ज्याप्रमाणें रावणानें प्रधानजीस विचारावें "प्रधानजी राज्याचा बंदोबस्त कसा काय आहे" यावर त्यांनीं लवून उत्तर द्यावें "जी सरकार सर्व ठीक आहे" अशा प्रकारच्या "जी सरकार" प्रधानजी सारख्याच्या वर्तनामुळें राज्यांत काय संकटें गुदरतात व काय अव्यवस्था आहे याची राजे साहेबास खबर देखील नव्हते व राजे साहेबांचा प्रधानजीवर पूर्ण भरंवसा! तेव्हां राजे साहेब आपल्या सिंहासनावर बसून नुसत्या तोंडपाटिलकीनें राज्यकारभार चालविणार कोठ पर्यंत? अर्थात् असा कारभार अशाश्वत होय. एवंच कोणतीही गोष्ट मिळविण्या विषयीं नुसती पोकळ महत्वाकांक्षाच असून उपयोग नाहीं तर तिज प्रमाणें यथायोग्य वर्तन ही पाहिजे या करितां ज्या विषयीं आपण मनांत महत्वाकांक्षा धरतो त्याचा योग्य विचार केला पाहिजे. नंतर होता होईल तों पर्यंत ती गोष्ट करितांना कशी संकटें येतील अशीं तोंड काढली पाहिजे व इतक्या गोष्टी करण्यांत आपणास किती झिज सोसावी लागेल याचा योग्य विचार केला पाहिजे. इतका सव योग्य विचार झाल्या नंतर एक दृढनिश्चय करून कामास लागलें पाहिजे. एकदा काम हातीं घेतल्यावर पुन्हां मागें परतण्या विषयीं मनांत येऊं देऊं नये संकटें आलीं असता मागें हटू नये व आपल्या कार्यसिद्धीस अवश्य लागणाऱ्या प्रयत्नांत काडी इतकी कसूर ठेऊं नये. अशा रीतीनें आपण महत्वाकांक्षा मनांत बाळगल्यास आपणास कदापि यश आल्या वांचून राहणार नाहीं. व हिलाच खरी महत्वाकांक्षा ह्मणतां येईल नाहींतर केवळ लौकिक होण्या करितां महत्वाकांक्षेचा आव घालावा परंतु तथ्यांश कांहींही नसावा व "घटं छिंद्यात ....... इ० वाक्याचा अवलंब करून प्रसिद्धीस येणें उत्तम प्रकारच्या महत्वाकांक्षेचें लक्षण नव्हे. केवळ लौकिकार्थ मनांत वागविलेली महत्वाकांक्षा निरुपयोगी आहे माझी अमुक प्रकारची योग्यता व्हावी, मला अमुक प्रकारचा मान मिळावा, माझें नांव अमुक महत्कार्याच्या योगानें कीर्तीच्या शिखरास चढावें एवढ्याच उद्देशानें जो कोणी एखादें काम हातीं घेतो तें काम सिद्धीस न जातां मध्यंतरींच लयास जातें एकूण मनुष्याच्या प्रत्येक कर्मांत [illegible] केवळ स्वहितबुद्धीच असून चालत नाहीं. [illegible]च्यरहित बुद्धीचीही अवश्यकता आहे. प्रसिद्ध [illegible]नीतिशास्त्रवेत्ते हरबर्ट स्पेंसर पंडित यांनीं [illegible] आपल्या नीतिसूत्रांत देखील असेंच विधान केलेलें आढळतें. आई आपल्या मुलाचें पालन पोषण करते यांत मुलाचें जें संगोपन होतें तो तिचा परमार्थ व मुलापासून इच्छिलेल्या भावी सुखाची इच्छा ही स्वार्थ होय. एकूण अशा हलक गोष्टींत जर परमार्थ केल्यावांचून स्वार्थ साधत नाहीं तर मग महत्कृत्यांत केवळ स्वार्थ बुद्धि ठेवून कर्मे चालेल? अर्थात चालणार नाहीं. तेव्हां प्रत्येकानें परमार्थाकडेस विशेष लक्ष्य असलें पाहिजे ह्मणजे वाटेल ती महत्वाकांक्षा सिद्धीस जाईल. उदाहरणार्थ आपल्या देशाचे हितकर्ते मि. दादाभाई नौरोजी यांचें उदाहरण घ्या. त्यांनीं हिंदुस्थानावर उपकार घडावेत याच हेतूनें आपलें सर्व आयुष्य विलायतेंत खर्च केलें. त्यांच्या मनांत पार्लमेंट सभेंत जाऊन आपण सभासद व्हावें यांत केवळ परमार्थबुद्धि वास करित असल्यामुळें आजपर्यंत त्यांच्या मनांत असलल्या महत्वाकांक्षेस यश आलें व ते त्या सभेंत सभासद निवडले गेले. हें अगदीं अलीकडच्या काळाचें उदाहरण झालें. पलीकडच्या काळचें उदाहरण लागत असल्यास राजा शिवाजी किंवा थोरले बाजीराव साहेब यांचें घेऊं. राजे शिवाजी यांनीं गोब्राह्मणांस यावनांच्या जाचापासून सोडविण्याची उत्कटेच्छा मनांत धरिली व त्याप्रमाणें यांनीं यत्न केले. ईश्वरकृपेनें त्यां या सर्व प्रयत्नांस उत्तम फळ आलें व पुनरपि दक्षिणेंत हिंदूंचा शे दोनशे वर्षें पर्यंत अंमल राहिला. हीच गोष्ट थोरले बाजीराव साहेब पेशवे यांसही लागूं पडते वरील पुरुषांचे मनांत आपली कीर्ति व्हावी हा मुळीच हेतु नव्हता. कीर्ति मिळविणें ह्मणजे महत्कृत्य करणें नव्हे. तर कोणतें ही महत्कृत्य करण्यापासून आपोआप कीर्ति प्राप्त झाली पाहिजे. आपली कीर्ति व्हावी एवढाच हेतु असणें हा गौण पक्ष होय. व अशा हेतूनें मनांत धरलेली महत्वाकांक्षा पोकळ होय.

महत्कृत्य करणें हाच मूळ हेतु असावा. एका ग्रंथ काराचें ह्मणणें असें आहे To be remembered is not necessarily to be famous ह्मणजे जगांत आपली आठवण राहण्या जोगें एखादें कृत्य आपल्या हातून घडावें यास चावडीवर डफडे घेऊन आपल्या नांवाची द्वाही देणें नको. कृत्य मात्र त्याप्रकारचें असावें. इंग्लंडांतील प्रसिद्ध कवी, नाटक कर्ते, निबंधकार, मिल्टन, पोप, ड्रायडन शेक्सपियर, वर्डस्वर्थ, जानसन ॲडिसन इ० लोकांच्या कृती वरूनच त्यांचीं नांवें जगाच्या हृत्पट्टी केवळ ब्रह्मलिखिता प्रमाणें खोदलीं गेलीं आहेत. अलीकडचे इतिहासकार, ग्रंथकार, कवी, निबंधकार, यांस पोकळ महत्वाकांक्षा फार असल्यामुळें चार अक्षरेंच जर येत असलीं तर तीं मासिकपुस्तकांतून बाहेर पडून आपलें नांव जगापुढें द्यावें अशी बलवत्तर इच्छा असते. मग अशा प्रकारच्या महत्वाकांक्षेस कितपत यश येतें या विषयीं विशेष सांगणेंच नको त्यांचेंच उलट तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर, मोरोपंत इ० भगवत्परायण, पुरुषांचीं उदाहरणें घ्या. तुकोबा वाणी, नामदेव शिपी यांच्या अभंगाच योगानं त्यांस त्यांचे कालांत कितपत प्रसिद्धीचा संभव होता याचा विचार केला असतां सहज कळून येईल. शुद्रां विषयीं स्वभावतः तिरस्कार ज्यांचें मनांत वास करीत होता अशा ब्राह्मणांचा भरणा पूर्वी विपुल असल्यामुळें तुकाराम सारख्यास प्रसिद्धीस येण्याचा फारच थोडा मार्ग होता. परंतु त्यांनीं केवळ परमार्थ बुद्धीनें आपलीं काव्यें रचिलीं असल्यामुळें कालांतरानें त्यांच्या कीर्तीचा सुगंध भूलता वर पसरत आहे. आपलें नांव कायम रहावें एवढ्याच उद्देशानें बांधलेला ताजमहाल जागजागीं जमिनदोस्त होत असून त्याचा नाम निर्देश देखील राहील किंवा नाहीं असा संदेह पडत चालला आहे.

याच विषयाची दुसरी बाजू जी कोणत्या तरी रीतीनें प्रसिद्धीस येण्याची महत्वाकांक्षा अथवा उगीच उठाठेव ही होय याची पगडी त्याचे डोक्यावर त्याची याचे डोक्यावर ठेवून आम्ही "अमुक कोणी" असा बाणा मिरविणें ही होय.

अशा रीतीनें उठाठेव करून दुर्लौकिकानें आपल्या आयुष्याच्या इतिहासांत भर पाडण्यापेक्षां दृष्टी आड महत्कृत्य करून लौकीकापासून अलिप्त असणें विशेष चांगलें.

किंग जॉन किंवा रिकार्ड दि थर्ड तैमूरलंग यांच्या सारखी राक्षसी महत्वाकांक्षा मनांत बाळगून जगांत तोंड काळें करण्यापेक्षां कांहींच न करणें उत्तम.

(पुढें चालूं.)

---

## वऱ्हाडसमाचार

---

मिती फाल्गुन वद्य १० शके १८१७

---

वऱ्हाड हायस्कुलांतील माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळा गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं आकोल्यास भरला होता. हा समारंभ ९ वा होय. बुलढाणा, उमरावती, इलिचपूर यवतमाळ व वाशिम या पांचही जिल्ह्यांतून लोक जमले होते. एकदर २५०।३०० वर बाहेरचे सभासद आले होते ही मोठी आनंदाची गोष्ट होय. दोन दिवस मोठ्या आनंदानें जातात आणि मित्र मंडळी या भेटी मेजवान्या, सभा, व्याख्यानें नानाविध खेळ गायन, नाटक इत्यादि मनोरंजक गोष्टींत मन इतकें तल्लीन होऊन जातें कीं दोन दिवस कसे न कळत गेले याचा आचंबा वाटतो. सर्व मंडळी लहानथोर पायऱ्या विसरतात आणि सारखेपणाच्या नात्यानें इतरांशी वागून परस्परांस संतोष देतात पहिले दिवशीं सर्व सभासद टाऊनहालांत जमले तेव्हां रा० रा० मोरो विश्वनाथ जोशी यांनीं सूचना आणिली कीं मि० एदलजी बहिमनजी यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें. या सूचनेला सर्वांनीं टाळ्यांच्या गजरानें अनुमोदन दिलें.

हीं सूचना आणतांना राजश्री जोशी ह्मणाले कीं मि० एदलजी साहेब यांस अध्यक्ष नेमण्यांत आपण आपलेंच अभिनंदन करून घेत आहों. हे गृहस्थ आपल्या समाजापैकीं आहेत आणि यांची थोरवी, योग्यता व लायकी लक्ष्यांत घेऊन सरकारानें यांस कायमचे डेपुटी कमिशनर नमिलें आहे. हा विशेष आनंदाचा प्रसंग होय. आपल्या पैकीं एकजणांस हा मोठा अधिकार मिळाला हा आपल्यासच मान मिळाल्या सारखा आहे. तेव्हां मि० एदलजी साहेब यांस प्रेसिडेंट नेमणें ह्मणजे आपला आपण बहुमान करून घेणें होय. सर्वानुमतें ही सूचना पसार झाल्यावर अध्यक्षांनीं समारंभास सुरुवात केली. ते इंग्रजींत बोलले कीं आपल्या ह्मणण्यास मान देण्यांत मला मोठा अभिमान व आनंद वाटतो. अध्यक्षपणाचें काम माझ्यापेक्षां दुसऱ्या कित्येकांनीं अधिक चांगलें केलें असतें पण आपल्या मर्जीपुढें जाववत नाहीं. व्याख्यानें देण्याचा मला अभ्यास नाहीं तथापि आपण आनंदानें हांसून खेळून मौज करावी, स्नेहभाव वाढवावा, जुने तंटे विसरावे, व स्नेही मंडळ विस्तृत करावें असा आपल्या समाजाचा उद्देश आहे आणि तो उत्तरोत्तर सफळ होत जावा अशी माझी मनापासून इच्छा आहे. नंतर मागील सालचा रिपोर्ट वाचण्यांत आला. सर्व हकीकत चांगली लिहिली होती व ती मंडळीस पसंत पडली. भोजनोत्तर प्रोफेसर बाळकृष्ण बुवा मिरजकर यांचें गायन झालें. गायन समारंभाला पुण्याचे सरदार श्रीमंत तात्या महाराज हे प्रसंगवशात् आले होते संध्याकाळीं रा. रा. लक्ष्मणराव डोळे व जयराम केशव असनारे या उभय गृहस्थानीं सुरस व्याख्यानें दिलीं. तीं यथास्थल आह्मी प्रसिद्ध करीत आहों. रात्रौ झुंझारराव नाटकाचा प्रयोग झाला. रा. रा. जोशी, दाले, दंडे आदिकरून उमरावतीकर सभासदांनीं हा प्रयोग बसविला होता. स्वल्प तयारीच्या मानानें नाटक फार नामी झालें. गांवांतील पुष्कळ सभ्य गृहस्थ प्रयोग पाहण्यास आले होते. जाधवराव, झुंझारराव, कमळजा, रंभाजीराव इत्यादि भूमिकांचें काम वर्णनीय होतें.

दुसरे दिवशीं समाजाच्या कार्यपत्रिके प्रमाणें कांहीं उपयुक्त ठराव करण्यांत आले. त्यांत मुख्यत्वेंकरून समाजाच्या फंडाची कायम व्यवस्था ठरविण्यांत आली, निम्म्या हांशिलावर समाजाच्या सभासदांस टिकिटें देण्याची मेहरबानी गेल्या दोन वर्षा प्रमाणें करण्याविषयीं रेलवे कंपनीला विचारणा करण्याचें ठरलें, आणि निरनिराळ्या व्यायाम विषयक खेळामध्यें शर्यती लावून बक्षिसें वाटण्या विषयीं मंडळीनें बेत केला

दुपारीं मेजवानी, गायन वगैरे आटोपल्यावर रा० रा० मोरोपंत जोशी यांनीं सामाजिक परिषदेस सर्व जणांनीं अवश्य जावें अशा विषयीं उत्तम बोध केला. व्याख्यान चांगलें झालें. नंतर अध्यक्षांनीं सर्वांचे आभार मानले, वेळ, खर्च, व अडचणी मनांत न आणितां मंडळी एकत्र जमली याबद्दल आनंद प्रदर्शित केला आणि पुढील वर्षीं असेंच जमण्याविषयीं अभिवचन देऊन समारंभाचें विसर्जन केलें. सांप्रदाया प्रमाणें अध्यक्षांचे आभार मानण्यांत आल्यावर सभा बरखास्त झाली.

व्यवस्थापक मंडळीनें सर्व बेत नामी ठेविला होता. ही मंडळी रात्रंदिवस एकसारखी झटत होती. व अकोलेकरांची ही मनःस्वीकृत सेवा सर्व जमलेल्या पाहुण्यांनीं गोड करून घेतली इतकेंच नाहीं तर सर्वतो मुखीं त्यांची प्रशंसा ऐकूं आली. ही गोष्ट व्यवस्थापक-मंडळीचे अध्यक्ष रा० रा० बाळकृष्ण बळवंत मुळे, उभय सेक्रेटरी, व

त्यांच्या हाताखालील मंत्रिमंडळ यांस अत्यंत भूषणावह होय.

सर एडवर्ड बक आले, कानफरन्स भरलें, व प्रांतिक अधिकारी व सर बक हे आपापल्या स्थळीं परत सुरक्षित गेले हें कळविण्यास आनंद वाटतो. त्याच समयास अलिशान रेसिडेंट फ्लौडन साहेब यांची ही स्वारी आली होती म्हणून अकोल्यास चार दिवस स्वागत, मुलाखती, शाळांचें निरीक्षण, सरबराई, इत्यादि गोष्टींमुळें मोठीच धामधूम चालू होती. कानफरन्समध्यें होणाऱ्या गोष्टी वाचकास कळविण्या या उत्सुकतेनें आमचे मित्र वैदर्भकर्ते यांनीं पुष्कळ यत्न केले पण त्यांस वरिष्ठ अधिकाऱ्या कडून जबाब मिळाला कीं लोकांस कळविण्यासारख्या विशेष महत्वाच्या गोष्टी कानफरन्स पुढें नाहींत तेव्हा कानफरन्साला येण्याची तसदी घेऊं नये. महत्वाच्या गोष्टी खरोखर नव्हत्या तर इतका खर्च करून कानफरन्स भरविण्याचें प्रयोजनच नव्हतें. हिंदुस्थान सरकारानें सर एडवर्ड बक यांस रिकामपणाचें, कालक्रमणेंच, व निरर्थक खर्चीचें हें काम दिलें आहे असें आम्हास कळलें नाहीं तोपर्यंत आह्मास कानफरन्सच्या लोकोपयोगा विषयीं विशेष विचापूस ठेवावी लागली. लोकांच्या हितासाठीं ह्मणून अशीं कार्यें सरकार करवितें आणि लोकांपासून सर्व गोष्टी गुप्त ठेवण्यांत सरकारचे उच्च उच्च दासजन आपली कर्तबगारी लढवितात तेव्हां सरकारच्या ईश्वरी अवतारावर नजर ठेवून आह्मी गुप्तस्फोट करूं इच्छित नाहीं. लोकदृष्टीला सध्यां कानफरन्स ह्मणजे पडद्या आड चाललेला गारुड्याचा खेळखंडोबाच वाटत आहे।

देशी कपडा वापरावा ह्मणून प्रस्तुत जी चळवळ चालूं आहे ती सर्व देशभर झाली असून तिला चांगलें यश येईल अशी आशा वाटूं लागली आहे. शहरोशहरीं सभा भरवून लोक निश्चयपूर्वक शपथा घेत आहेत कीं विलायती कपडा न घेतां देशीच कपडा आह्मी वापरूं. पारध्यांच्या तडाख्यांतून सुटका होत नाहीं असें पाहून हरिण जसा निराशेनें पण अतिवेगानें उलट वळतो त्या प्रमाणें आपल्या नेटिवांची सध्यां कार्यदिशा उलटली आहे. सरकारें जणू काय आपल्या जकातीच्या कायद्यानें नेटिवांचा शिकारच आरंभिली आहे. निराशेनें वीरश्रीही प्रसंग विशेषीं बहुत येते; आणि निराशेच्याच वेळीं राष्ट्रें नवींजुनीं होतात तेव्हां आनंदाची गोष्ट हीच कीं अशा निर्वाणीच्या वेळीं नेटिव लोकांत देशाभिमान जागृत झाला; आणि आह्मी तर हीच भावी भाग्योदयाची पूर्ण खूण समजतो. देशीच कपडा नेटिवांनीं वापरला तर आपली संपत्ति व गिरण्या वाढती, राज्यकर्त्यांच्या पदरीं आपोआप चूक बांधली जाईल, आणि या उदाहरणानें सरकारही शहाणें होऊन लोकमताची पायमल्ली या पुढें करणार नाहीं. असा सुयोग सध्यां आला आहे आणि तो राजनिष्ठेला धरून आहे तेव्हां अशा वर्तनाला कालत्रयीं भिती नाहीं.

The Berar Samachar

MONDAY MARCH 9, 1896

It will interest many to learn the state of finances of this province. The figures that appear in the para given below will at least give a fair idea that there is no necessity for an increase in the land revenue or in other forms of taxation.

"The gross revenue of the province during the year 1894 95 amounted to Rs. 1,22,49,345, and the total disbursements to Rs. 1,17 05,459. Omitting the receipts and disbursements of the Incorporated and Excluded Local Funds, the provincial surplus was Rs. 4,69,071 compared with a surplus of Rs. 7,35,912 for the year 1893-94. The amount paid to His Highness the Nizam during the year 1894-95 was Rs. 11,62,045, being the balance of the surplus for the years 1890-91 to 1892-93 unpaid for want of funds, and a portion of surplus for the year 1893 94; the balance at the credit of the British administration of Berar on 31st March 1895 was Rs. 33,70,125. Of the gross income Rs. 1,01,19,488 were derived from Provincial revenues, Rs. 9,47,215 from incorporated, and Rs. 11,82,642 from Excluded Local Funds. Rs. 96,50,417 of the Provincial revenues, Rs. 11 07,827 of the Excluded Local Funds, and the whole of the Incorporated Local Funds revenue were utilized."

Further, it is to regretted that the Civil expenditure is growing along with the military one; and one will easily see from some of the items quoted below with the causes of the increase that the expenditure will know no bounds in such a procedure as the present one.

"Land Revenue ...55,544— Due chiefly to (1) increase of establishment sanctioned for the Land Records and agriculture Department; (2) to purchase of new tents required by the Deputy Commissioners; (3) to larger payments made on account of exchange compensation allowance due to the rate of exchange; (4) to larger payments to district and village officers, apparently on the increased land revenue receipts realized by them; and (5) to ordinary variations in officers on duty in the Commission.

General Administration ...41,197—Due chiefly to (1) creation of a new appointment of Personal Assistant to Resident; (2) to the payment of privilege leave allowances; (3) to the increased expenditure under tour charges with reference to the Resident's tour programme; (4) to the inspection of the office of Comptroller, Hyderabad, by the Deputy Auditor—General having taken place in 1894 95, and being longer than usual; and (5) to larger payments of exchange compensation allowance due to the rate of exchange.

Police...74,995—Due chiefly to (1) creation of steam-boiler inspection establishment; (2) arrear payment of contributions from cattle pounds receipts to municipalities, the Chikalda sanitarium, and the Melghat taluk; (3) larger payments of exchange compensation allowance; (4) privilege leave allowances of officers; (5) increase in the cost of police clothing; and (6) the refund of cattle pounds receipts transferred in excess to credit of the district funds in the previous year."

The Indian Volunteers Act, 1869 is amended with a view to maintain a strict discipline and to regulate on a liberal scale the grant of pay, pensions, gratuities &c. to the volunteers. This force has now reached the strength of 24,000 men. By-the-by there is an argument adduced in the presentation of the bill to show that a volunteer in India does a great service not only to the state but to himself also. It is his own protection in India that forces him to enrol himself as a volunteer. Let us realize how a volunteer in India is called upon to perform a different duty from that of a volunteer in England. The remark runs thus:—

"The dangers which the volunteers may be required to combat in India are internal dangers. such dangers as this country has seen in the past, but which we all fervently hope it may never see again. In case of such danger arising, the old story of the bundle of sticks is applicable. Each stick taken by itself is easily snapped the bundle of sticks bound together is unbreakable by human force. There can be no greater mistake on the part of men in this country than to suppose that by holding aloof from the volunteers they can better defend their individual hearths and homes. The lesson of the great Mutiny teaches the contrary doctrine. It is only when men are banded together instructed in arms and disciplined, that they can show a firm front to revolt or riots due to religious fanaticism or other causes. It is only by such banding together that they can protect their own families and homes, and I for one must always hold that in banding themselves together the volunteers are not only conferring a benefit upon the State, but that having, in the words of the Act under which they serve, volunteered their services for the protection of life and property and the preservation of the pease. they are acting in their own interests as well. It must be admitted that, to quote the words of the Secretary to the Government of Bengal, it is an 'extreme improbability that volunteers will be called out for any prolonged and serious military service,' and in in the words of the Secretary to the Government of the Punjab, that, 'instances of volunteers being disabled or killed in action, would in any case be of very rare occurrence."

Herein lies the chief terror that haunts our rulers. The British rule is said to be benign but the darkest spot on the British glory is the disarmament of the Natives of the soil and the total refusal to their enrolment as volunteers. We are being disarmed and enfeebled by lack of military training because we may be so many enemies to the ruling race in case of revolt. It is by way of prevention that we are witheld from our right to the use of arms in loyal devotion to the paramount power. An experience of forty years goes for nothing when the Natives are thus distrusted and we are the more disappointed when no liberal amendment is found possible to grant the request of the National Congress in this connection.

## वऱ्हाड

हवामान—थंडी थोडी पडते आणि दिवसा ऊन फार तापतें. यंदा पाऊस कमी झाल्यामुळें उन्हाळा विशेष होईल असें वाटतें. रोगराई ह्मणण्यासारखी कांहीं नाहीं.

रा० रा० सखाराम आत्माराम अधिकारी ए० अ० कमिशनर व टान्सलेटर यांस गेल्या १९ वे तारखेपासून तीन महिन्यांची रजा मिळाली आणि त्या रजेंत रा० रा० जी. सुब्रायलु नायडू ए० अ० कमिशनर यांस रेसिडेंटचे क्लार्क व ट्रान्सलेटर नेमिलें आहे.

लेफटेनंट मारिस असि० कमिशनर यांस येत्या १९ वे तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

खालील अधिकाऱ्यांस पांचशे रुपयांच्या दिवाणी दाव्यांवरील अपिलें चालविण्याचा डेपुटी कमिशनरचे कोर्टाचा अधिकार देण्यांत आला आहे:—

मेसर्स एदलजी बहिमनजी, क्याप्टन ग्यरेट, पंडित सुरज नारायण, रुस्तुमजी फर्दूनजी, क्याप्टन कोलंब, सिम्पसन, प्रीडो, क्याप्टन हार्सबरो, व क्याप्टन माडिट.

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं मि. एदलजी बहिमनजी यांस कायमचे डेपुटी कमिशनर नेमिलें. यांची नेमणूक सध्यां वाशिमास झाली आहे तथापि ते सिव्हिल आणि सेशन जज्य यांस मदत करीत आहेत तोंपर्यंत सध्याच्या या नेमणूका चालूच राहतील.

### नोटीस

नागोलाल साजुराम सरकीवाला व महबूभाई दुकान अकोलें ताजनापेठ अकोलें यांस.

खाली सही करणाराकडून तुह्मी ता० २८ माहे फेब्रुवारी सन १८९६ रोजीं माझा नांगराच्या धुरेचा बैल ज्याला ५० पन्नास रुपयांस लोकांनीं मागितला होता तो तुह्मी परदेशी जवान पाठवून जबरीनें माझे ताब्यांतून नेला आहे. त्या करितां तुमचे दुकानीं यावें तर तुह्मी मारठोक करून कैदही करणार, या प्रमाणें बोलून दाखविलें आहे. यास्तव ही नोटीस देतो कीं ह्या नोटिसीचे तारखे पासून १० दिवसात रुपये पन्नास रोख नगद भवरदेस आणून द्या. अथवा तुमचे देणें सरकी एक खंडी व कापूस २ दोन [illegible] यांची किमत जी रकम होईल ती व [illegible] तारीख २८ माहे फेब्रुवारी सन १[illegible] पावेतों व्याज मिळून जी रकम होईल [illegible] वजा करून बाकीची रकम व या नोटिसीचा खर्च भवरदेस आणून द्या. असें न केल्यास तर कायद्या प्रमाणें फिर्याद करणें भाग पडेल. तारीख ६ माहे मार्च सन १८९६ इसवी.

(सही) रामजी बल्लद मुरारजी राज बस्ती भवरद निशाणी खुद हातची.

वर्तमानसार

मणिपूरचा दुर्दैवी राजा जो इतके दिवस अंदमान बेटांत खुनी, चोर, लुटारू वगैरे बदमाष लोकांचे सहवासांत आपले आयुष्याचे दिवस घालवीत होता, त्यास आतां छोटा नागपूर येथें हजारी बागेंत आणून ठेविलें आहे म्हणतात.

रशियन पत्रें रशियन राज्याविषयीं लिहितांना “ सर्व रशियन अंमल निर्वैर झाला आहे, रशियाला वैरी काय तो इंग्लंड ” असें स्पष्ट म्हणतात.

लोखंड किड्यांनीं खालें हें म्हणणें आजवर कोणासही संभवनीय वाटलें नसतें परंतु जर्मनींत हेगनजवळच्या रेलवे इंजिनियरनें असला एक रिपोर्ट आल्यावरून सरकारांतून कमिशन नेमून चौकशी करण्यांत आली. तेव्हां असें दिसून आलें की, सुतासारखे बारीक व गळपट्टे विणण्याच्या सुईसारखे लांब असे एक जातीचे किडे आहेत, त्यांच्या डोक्यावरच एक लहानशा गोळींत कांहीं पदार्थ असतो. हे किडे हा पदार्थ दहा मिनिटांनीं लोखंडाच्या जिनसांवर शिंपतात, त्यामुळें एक दोन सेकंदांत लोखंड मेणासारखें बनतें. व हे किडे मग ते हावरेपणानें खातात. शंभर मैल रेलवे या किड्यांनीं ६ महिन्यांत पोखरून भुगा करून टाकली. क०

दुध व दही यांच्या मलई पासून विलायती कारागीर नकली हस्तिदंत तयार करीत असल्याचें समजतें.

विनेचे साहेबांनी चंद्राचा कलंक काढून टाकण्याचा कांहीं युरोपियन ज्योतिष शास्त्रवेत्ते प्रयत्न करीत आहेत. जें करतील तें थोडें.

ता. २० एप्रिल पासून इंग्लिश मिडलची परीक्षा सुरू होणार. बा. वै.

मुएझच्या कालव्याप्रमाणें इजिप्तमध्यें दुसरा एक कालवा खणण्यांत येणार आहे.

झांशी, बांदा वगैरे प्रांतांतील १३०००० लोकांना रिलीफ फंडांतून मदत करावी लागेल असें तिकडे धान्य फार महाग झालें आहे यावरून वाटतें.

आस्ट्रेलिया मध्यें सध्यां खोकडांनीं फार उपद्रव दिला आहे.

व्हेनिझूएला या हद्दींत दोनशेंवर सरावें आहेत. प्र.

प्रचंड अजगर—गेल्या चिचोळी प्रदर्शनांत एका मुसलमानानें एक अजगर आणिला होता त्याची लांबी २४ हात व शरिराचा घेर ३ हात होता असें प्रसिद्ध झालें आहे.

सोलापूर येथील लक्ष्मय्या नांवाच्या एका व्यापाऱ्यांनीं आपल्या मुलाच्या लग्नाबरोबर गरिबांचीं धर्मार्थ ३० लग्नें केलीं. आ.

ब्राझीलमध्यें मुलगी उपवर झाली म्हणजे तिला डाक्तरकडून देवी काढवितात. त्याप्रमाणें ज्यास ती द्यावयाची ठरविलें असेल त्यालाही डाक्तरकडून देवी काढल्या आहेत असें सर्टिफिकीट दाखवावें लागतें. त्याशिवाय त्या देशांत लग्नें मुळींच करीत नाहींत. तसेंच स्वीदन व नार्वे या देशांतही लग्नाचे पूर्वी नवरानवरींना देवी काढल्याच पाहिजेत, इतकेंच नव्हे पण नारवे देशांतल्या मुलींना शिवणकाम, वीणकाम स्वयंपाक वगैरे गोष्टी [illegible] आहेत अशाबद्दल सर्टिफिकिटें मिळवावीं लागतात. नाहीं तर त्यांचीं लग्नें होण्याला मोठी पंचाईत पडते. वॉलरेकमध्यें ज्या मनुष्याला दारू वगैरे मादक पदार्थ सेवन करण्याची वाईट खोड आहे, त्याला कोणीही आपली मुलगी देऊं नये असा सरकारचा कायदा आहे. त्यानें आपल्याला कोणत्याही प्रकारचें वाईट व्यसन नाहीं अशा प्रकारची चांगली खात्री करून दिल्याखेरीज त्यास लग्न करण्याची मुळींच परवानगी नाहीं. रशियामध्यें लग्नाची चाल मोठी विलक्षण आहे. ऐशी वर्षांचा अगदीं म्हातारा जरी असला, तरी त्यानें एकदां नाहीं, दोनदां नाहीं, पण चार वेळां तरी त्यानें एखाद्या कुमारिकेचें पाणिग्रहण केलें तरी त्यास कोणाची आडकाठी नाहीं. क०

उत्तर ध्रुवाचा शोध—नॉर्वेचे रहाणार डा० नानसन या चतुर, साहसी व दैवशाली मनुष्यानें, आज ४०० वर्षें ज्या उत्तर ध्रुवाचा शोध लागावा म्हणून सुधारलेल्या राष्ट्रांस तळमळ लागली होती, तो शोध लावला असें नुकत्याच आलेल्या बातमीवरून समजतें. उत्तर ध्रुवाच्या शोधास जावयाचा असा निश्चय या धाडसी मनुष्यानें सन १८९३ सालीं केला, त्याच्या खर्चासाठीं नार्वे सरकारानें १०००० पौंड, आणि इतर दुसऱ्या लोकांनीं बरीच मोठी रक्कम दिली. आपल्या प्रवासासाठी या मनुष्यानें तीस शिडांचे, बर्फांत घुसून जाणारें आणि त्याला १८० घोड्याच्या शक्तीचें इंजिन लावलेलें असें तारूं तयार करून त्यांत या मोठ्या सफरीसाठीं सर्व प्रकारची भक्ष्य सामुग्री भरून तो निघाला. कित्येक महिन्या पूर्वी त्याचें तारूं बर्फाच्या मोठमोठ्या लोटांत सांपडून वाहत गेलें अशी बातमी होती. आर्केनल येथून डा० नानसन आपल्या मंडळीसह उत्तर ध्रुवावर सुरक्षित जाऊन पोहोंचले अशी बातमी आली आहे. त्याच प्रमाणें तिकडे एक अप्रसिद्ध खंडा एवढी भूमीही सांपडली आहे. असें म्हणतात हा शोध या १९ व्या शतकांतला अति मोठा विजय समजला पाहिजे.

गोऱ्या गार्डास चोरीबद्दल शिक्षा—बरेली येथे असलेल्या युरोपियन पलटणीचे आफिसर कर्नेल बर्टन हे करांचीहून बरेलीस आगगाडीनें आले तेव्हां त्यांनीं आपलें लगेज गार्डा या ताब्यांत दिलें. गार्डाचें नांव इ. जेम्स असें होतें. कर्नेल साहेब बरेलीस आल्यावर तपासून पहातात तों ४०० रुपये किंमतीचा सामान त्यांत नाहीं असें त्यांना समजल्यावर त्यानीं रेलवेस त्याबद्दल वर्दी दिली. चौकशींत गार्डाच्या रहाण्याच्या जागेचा झाडा घेतला तेव्हां बरेच सामान त्यांत मिळालें त्या गार्डावर पुराव्यावरून चांगली शाबिदी झाल्यामुळें बरेलीचे जाइंट मानिस्त्रेटांनीं त्यास ६ महिन्यांची शिक्षा दिली.

पिनसिल कानिया येथें एक रेलवेचा नकाशा आहे. या नकाशा एवढा नकाशाच कोठें ऐकण्यांत नाहीं. याची रुंदी १५ फूट असून लांबी ११२॥ फूट आहे. या नकाशावर ४ हजार रेलवे स्टेशन्स आहेत.

उत्तम लढाऊ गलबताचा नुसते बोर ४० हजार रुपयांचे असतात-

दक्षिण आफ्रिकेंतल्या रत्नांच्या खाणींतून दरसाल निदान ३० लक्ष रुपये किंमतीचीं रत्नें चोरीस जातात असा अजमास काढला आहे. शु सू.

इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या सरकारांची थोडथोडी फौज कोरियांतल्या बंडाच्याकरतां कोरियांत येऊन दाखल झाली.

रशिया एकटाच काय तो इंग्लंडचा शत्रू आहे असें विलायतच्या टाइम्स पत्राचा रशियांतला बातमीदार म्हणतो.

शोन प्रांत इटालीनें सोडावा असा अबिसिनियाच्या राजाचा आग्रह असल्यामुळें तो राजा व इटाली यांच्या दरम्यान चाललेले तहाचें बोलणें रद्द झालें.

टर्की व रशिया यांच्या दरम्यान एक गुप्त तह झाल्याची बातमी आहे. ही तहाची बातमी खोटी आहे. असेंही कित्येकांचें म्हणणें आहे ती टर्कीची राज्यसत्ता नाहींशी करून टर्कीचें राज्य युरोपियन राजे पुढील प्रमाणें वाटून घेणार अशीही बोलवा आहे. पीटर धी ग्रेट या रशियन बादशहाच्या म्हणण्याप्रमाणें अमल करण्याची वेळ येऊन पोचली असें रशियाचें म्हणणें असून त्याप्रमाणें सिबास्टोपल व ओडीसा येथें रशियाची फौज तयार होऊनही राहिली आहे. कॉकेशस फौज आर्मेनियाच्या हद्दीवर जमत आहे. टर्कीची पुढील प्रमाणें वाटणी करण्याचा रशियाचा बेत असून त्यास युरोपांतल्या इतर राजांची संमती घेण्यांत रशिया गढून गेला आहे असेंही सांगतातः— आर्मेनिया प्रांत, अलेकझांड्रिया पर्यंतचा एशियांतील प्रदेश, व खुद्द कान्स्टांटीनोपल इतका मुलूख रशिया आपण स्वता घेणार, सिरिया, पालस्टाइन व जरूसेलम फ्रान्सानें घ्यावा, इजिप्तदेश व पर्शियन गल्फचा पूर्वकिनारा इंग्लंडानें घ्यावा, सर्विया व मसिडोनिया हे प्रांत अस्त्रियानें घ्यावा, आणि थेसेली, क्रेट व बेटे ग्रीसन घ्यावीं. या प्रमाणें वाटे घेऊन संतुष्ट राहण्यास अस्त्रियावांचून बाकी सगळे राजे तयार झाले आहेत असें सांगतात. अ. द.

मुंबई सरकारच्या ताब्यांत जीं नेटिव संस्थानें आहेत त्यांची लोक वस्ती ८९ लक्ष असून वसूल चार कोटी रुपयांपेक्षां जास्त आहे असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या मुंबई इलाख्याच्या वार्षिक रिपोर्टावरून कळतें.

पूर्व आफ्रिकेंत दंगा—पूर्व आफ्रिकेंत ग्रेट ब्रिटनचा जो मुलूख आहे त्यांत कांहीं दंगा धोपा चालू असल्यामुळें मुंबईची २४ वी पायदळ पलटण तिकडे पाठविण्याचा हुकूम झाला आहे. लौकरच ती तिकडे रवाना होईल. आणखी गरज लागल्यास आणखी एक पलटन पाठविण्याची तयारी लष्करी खात्याकडून झाली आहे असें म्हणतात. ह्या पलटणच्या संबंधानें होणारा खर्च कोणावर बसणार एवढा मात्र संशय आहे.

श्रीक्षेत्र काशीपासून कलकत्यापर्यंत गंगेतून लवकरच एक जाणारी येणारी आगबोट सुटणार आहे. रेलवेपेक्षां निमे दरानें माल व उतारूंस नेण्याचा तिचे मालकांचा विचार आहे.

चितानुगा येथें तेथील जज्ज व एक बारिस्टर यांच्यामध्यें कांहीं बोलाचाली झाल्यावरून जज्जसाहेब गरम होऊन त्यांनीं त्या बारिस्टरावर एकदम गोळ्या घातल्या. जज्ज साहेब हल्लीं पोलिसचे ताब्यांत असून काम लवकरच चालणार आहे.

कापड विणण्याची कला ख्रिस्ती शकाचे पूर्वी ३०० वर्षे चिनी लोकांस अवगत होती असें शोधांतीं प्रत्ययास आलें आहे. शु. सू.

## नोटीस

बनेमी मर्द महमदखा जात मुसलमान रोहिले राहणार अकोलें इस नोटीस देणार सब्दरअली वल्लद रोषणअली चौकीदार अकोलें नोटीशीनें असें कळवितों कीं तुमचा नवरा नामे महमदखा हा मयत होऊन आज सात वर्षें झालीं. तुमचा नवरा मयत झाला त्यावेळीं तुम्ही आम्हास पुराणा कोट येथील घर वगैरे बक्षीस करून दिलें व ताब्यांतही दिलें. याचें कारण तुम्हास आम्ही तुमच्या हयातीपर्यंत अन्नवस्त्र द्यावें. याजकरितां तुम्ही आम्हास सदरहू जागा घर वगैरे बक्षीस करून दिलें व रीतशीर कागदही करून दिला आहे. तुम्हास आम्ही कबूल केल्याप्रमाणें अन्नवस्त्र देतच आहों. आतां आम्हास असें समजतें कीं तुम्ही ती जागा वगैरे विकणार आहां तर सदरहू जागा तुम्हास विकण्याचा वगैरे कोणत्याही प्रकारानें अधिकार नाहीं कारण तुम्ही बक्षीसपत्र करून दिलेली जागा वगैरे आहे. हें तुम्हास कळावें म्हणून दिली नोटीस सही. ता. ३-३-९६ इसवी.

सही

सहीची निशाणी कट्यार सब्दरअली वल्लद रोषनअली चौकीदार अकोलें याच्या हातची असे.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें सब्दर अली वल्लद रोषणअली मुसलमान चौकीदार अकोलें वस्ती अकोली असें जाहीर करितों कीं पुराणाकोट येथील जागा घरासुद्धां माझे ताब्यांत आज सात वर्षें बनेबी मर्द महमद खा जात मुसलमान इनें मजला बक्षीस करून दिलेली आहे व रीतवार बक्षीसपत्रही करून दिलें आहे. बक्षीस देण्याचें कारण बनेबी इजला आम्ही जन्मभरपर्यंत अन्नवस्त्र द्यावें. व या बद्दल तिनें आम्हास पुराणा कोट येथील घर वगैरे बक्षीस दिलें आहे. आतां ही जागा कोणी विकत, खरेदी, गहाण, तारण वगैरे आमच्या संमती शिवाय घेईल तर त्याजबद्दलचे जबाबदार सदरहू घर व जागा व आम्ही नाहीं त्याचा तो आहे. म्हणून दिली जाहिरात सही तारीख ३-३-९६.

सही

सहीची निशाणी कट्यार सब्दरअली वल्लद रोषणअली चौकीदार अकोलें याच्या हातची असे.

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,,१ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०१०६
दुसरे खेपेस .... .... ०१

Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 16 MARCH 1896 — NO 10

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख १६ माहे मार्च सन १८९६ इ० — अंक १०

## घड्याळ.

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेल्वे रेग्युलेटरचें असून याचे कांटे रासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे. मागील बाजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस ६ जीवेल ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहेत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यात व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्य. ? जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— " गिऱ्हाइकांत घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल."

गोविंद महादेव पोळ.
६२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, व स्टेशन धर्म शाळेचा कर वसूल करण्याचा सन १८९६।९७ सालचे हक्कांचा लिलांव ता० १९ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टाऊनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस सदहू वेळीं टाऊनहालांत हजर राहावें. कळावे तारीख १८।२।९६ इसवी.

B. M. Sathe
Secretary
Akola Municipal Committee

## महत्वाकांक्षा

( मागील अंकावरून समाप्त )

ज्या कामाची आपल्या मनांत महत्वाकांक्षा असते तिजविषयीं आपले मनांत कळकळ ही असली पाहिजे. नुसते लोक ह्मणतात एवढ्यावरच कोणतें ही अंगावर घेऊं नये. लोक ह्मणतात देशी कपडा वापरण्याविषयीं नियम केला पाहिजे, व मनांत तर त्याचें मोठेंसें महत्व वाटत नाहीं मग चार मंडळी ह्मणते ह्मणून त्यांचें ह्मणणें कबूल करावयाचें लांब लचक ठराव करून मोठमोठ्या शपथा घ्यावयाच्या परंतु वर्तनाच्या नावानें शून्य कारण तितकी कळकळ नाहीं. राष्ट्रीय सभे संबधानें हीच हाकाहाक ऐकूं येत आहे. राष्ट्रीय सभेच्या चालकांस तिच्या उत्कर्षाची जरी इच्छा आहे तरी योग्य कळकळ नाहीं. वर्षाचे अखेरीस ज्या वेळी वर्गणी गोळा करण्याचा प्रसंग येतो तेव्हां मात्र राष्ट्रीय सभेचें नांव बाहेर येऊं लागतें. तोपर्यंत जणूं काय तें एखाद्या मोहोरबंद पेटींत कुलूप बंद केलेलेंच असते. अडाणी लोकांस राष्ट्रीय सभा काय आहे हें समजण्याची पुष्कळ इच्छा असते पण त्यास तिचे हेतु, तिची रचना, व तिचा कारभार इ० गोष्टींचें यथायोग्य ज्ञान करून देणारा कोणी कळकळीचा मनुष्य अद्यापि मिळत नाहीं. आमच्यामध्यें राष्ट्रीय सभे सारख्या टोलेजंग संस्थे संबंधानें इतकी अनास्था दृष्टीस पडत असल्यामुळें " लीवार्नर सारख्यानीं लोकमतांस खो देणें यांत विशेष तें काय. त्यांस पुरतेपणीं माहित आहे कीं, राष्ट्रीय सभेच्या चालकांत मनापासून कळकळ बाळगून सरकाराशी आपले हक्क मिळण्याकरिता भांडणारा एखादा गृहस्थ मिळाल्या वांचून राष्ट्रीय सभेपासून आपणास काहीं दखल होणार नाहीं. आमच्यामतें खरें खर कळकळीनें झटणारे असे एक दोनच जर गृहस्थ आपणास मिळतील तर सर्व हिंदुस्थानचें दुर्दिन लयास जाईल. ही कळकळ नुसती बडबडीची नव्हे तर आंग मेहनतीची असली पाहिजे. लोक जर आपली कर्तव्यताबुद्धि कायम ठेवून वर्तन करतील तर देशाचें पूर्णपणें हित होईल. ज्या प्रमाणें लार्ड नेल-सन यानें आपले निशाणावर लिहिलें होतें कीं इंग्लंडांतील प्रत्येक मनुष्य आपलें काम योग्य रितीनें बजावील अशी इंग्लंडास पूर्ण आशा आहे तोच प्रकार आज मित्तीस दृष्टोप्सत्तीस येत आहे. आह्मांस लार्ड वेलिंगटन किंवा नेलसन या सारखा मार्गदेशक पाहिजे व आतां जरी India expects every man to do his duty असें ह्मणतां येत नाहीं तरी त्यांचे पासून आपणास पुष्कळ फायदा होणार आहे. कालांतरानें ज्या वेळीं आपली महत्वाकांक्षा जागृत होऊन आपण कळकळीनें देशहिताचा प्रयत्न करूं त्यावेळीं मात्र आपणास असें समजण्यास हरकत नाहीं. मी कोण, माझें काय काम, व माझे शिरावर स्वहिताची, स्वतःच्या कुंटुबाची किंवा राष्ट्राची काय जबाबदारी आहे याचा प्रत्येक मनुष्य पूर्ण विचार करून वर्तन ठेवील तर हा हिंदुस्थान देश सुरविमानारूढ होऊन वैकुंठाप्रत प्राप्त होईल. आपणांमध्यें असावी तशी महत्वाकांक्षा नाहीं. ज्या लोकांत थोडी बहुत महत्वाकांक्षा आहे त्याचें तसें वर्तन नाहीं. एकूण या दोहींचा मेळ न पडल्यामुळें देशास विपत्तींतच रहावें लागत आहे. जार्ज वाशिंगटना सारखा एखादाच जरी स्वाभिमानी पुरुष हिंदुस्थानांत उत्पन्न होईल तर अपरंपार सुख होईल यांत संदेहच नाहीं. खऱ्या महत्वाकांक्षेचें स्वरूप नुकत्याच झालेल्या चीन व जपान यांचे मधील तुमुल युद्धावरून दिसून येत आहे. खरोखर पाहिलें असतां जपान केवढा, तेथें लोकवस्ती किती, परंतु केवळ स्वाभिमानामुळें व निःसीम महत्वाकांक्षमुळें जपानास चीन देशावर विजय मिळाला असो, एकंदरीनें इतकें सिद्ध झालें कीं आपणामध्यें योग्य प्रकारच्या महत्वाकांक्षेची उणीव आहे ती भरून येईपर्यंत देशहित होणें कठीण. असो. प्रत्येकानें योग्य प्रकारची महत्वाकांक्षा मनांत ठेवून आपलें वर्तन ठवावें. ती केवळ लौकिकार्थ किंवा पोकळ नसावी. लौकिकार्थ मनांत बाळगिलेली महत्वाकांक्षा असून नसून सारखीच. तिचा आपणास काडी इतका देखील उपयोग होणार नाहीं. तर ती परोपकारबुद्धिपुरःसर आपण आपलें मनांत धरिली पाहिजे. अशा प्रकारची परहितबुद्धि आपणामध्यें वास करूं लागल्या वांचून आपणास काडीमात्र फायदा होणार नाहीं ह्मणून पुन्हां एकवार सांगणें आहे कीं सर्वांनीं खरी महत्वाकांक्षा, खरी कळकळ खरी कर्तव्यताबुद्धि ले० व खरा स्वाभिमान, व स्वधर्माभिमान मनांत बाळगावा.

## नीति शास्त्राचें मुख्य बीज व तदनुरोधानें आपल्या समाजाचें परीक्षण.

आपल्या मध्यें ' मनःपूतं समाचरेत् ' किंवा ' सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरण प्रवृत्तयः ' इत्यादि अनेक महाकवींच्या उक्ती आहेत. त्यांचा अर्थ काय हें जर आपण सूक्ष्म रीतीनें पाहिलें तर आपणास दिसून येईल कीं, ज्याला ते अंतःकरण प्रवृत्ती किंवा मन ह्मणतात ते आपल्या इंद्रियज्ञानास अगोचर आहे. तेव्हां हें मन किंवा अंतःकरण प्रवृत्ती ह्मणजे काय व यांचा नीतिशास्त्राशी कसा संबंध आहे हें आज पाहणें आहे.

मानवी स्वभावाचा असा नियम आहे कीं एकमेकांच्या कृत्यांवर बरे वाईटपणाचा शेरा ठोकावयाचा. हा स्वभाव अगदीं लहान मुलांपासून तों वृद्ध मनुष्यापर्यंत, व अगदी पुरातन कालापासून तों आजच्या कालापर्यंत अव्याहत चालत असलेला दिसून येतो. ही जी मनुष्याची स्वतः प्रवृत्ती इलाही कांहीं बंधनें आहेतच. मनुष्य सर्व प्राणिमात्रांच्या कृत्यावर बरे वाईटपणाचा शेरा ठोकीत नाहीं तर केवळ मनुष्यांनीं केलेल्या त्यासच बरें वाईट ह्मणतों. अवर्षण, किंवा टोळधाड पडून जर शेतें [illegible] तर आपण त्या संबंधानें कांहींच [illegible] नाहीं. पण सारा जात वादविल्यामुळें [illegible] शेतें बुडालीं तर मात्र आपण सरकारास दोष देतों. तशीच दुसरी गोष्ट ही कीं आपण कृत्यास जेव्हां चांगलें वाईट ह्मणतों तेव्हां त्याच्या परिणामाकडेस विशेष लक्ष देत नाहीं तर त्याच्या हेतूंकडेस देतों. कारण मनुष्यमात्राची प्रवृत्तीच तशी दिसून येते. एखाद्यानें खुनशीपणानें जर [illegible] वध केला व दुसऱ्यानें शत्रूच्या हातीं सांपडून तिची विटंबना होऊं नये म्हणून निरुपाय होऊन जर बायकोचा वध केला तर या दोन्ही कृत्यांचा परिणाम एकच. तथापि आपण पहिल्या गृहस्थाची अधमाधमांत गणना करतो. व दुसऱ्याच्या कृत्याची कांहींशीं वाखाणणीच करतों. याचें कारण पहिल्याचा हेतु वाईट होता व दुसऱ्याचा हेतू चांगला होता तिसरी गोष्ट अशी कीं आपण जो कृत्यांच्या बरे वाईटपणाचा विचार करतों तो प्रथमतः आपल्या कृत्यावरून करतो व नंतर दुसऱ्याच्या कृत्यास चांगलें किंवा वाईट ह्मणतो कारण नीतीची दृष्टी जर केवळ हेतूंकडेसच असते तर प्रथमतः आपणास दुसऱ्याच्या कृत्यांचे हेतू समजणें अशक्य होय. आपणास जेव्हां आपल्या कृत्यांचे हेतू समजतील तेव्हां आपण त्या कृत्यांच्या परिणामावरून दुसऱ्यांच्या कृत्यांचे हेतू ताडूं शकूं व नंतर आपण त्या कृत्यास बरें किंवा वाईट ठरविता ईल. चौथी गोष्ट अशी कीं आपण जीं त्यें समजून उमजून केलीं आहेत अशा कृत्यास आपण बरें किंवा वाईट म्हणतो नाहींतर वेड्याच्या कृत्यांत व आपल्या [illegible] त्यात कांहींच फरक राहिला नसतां. [illegible] गांचा झपाट्यांत एखाद्याच्या थोबाडींत [illegible] व नंतर शांत मन असतांना एखाद्या थोबाडींत देणें या दोहोंची योग्यता आपण एकच धरीत नाहीं. व अशा तऱ्हेनें कृत्य समजून उमजून करण्यास आपण दोन कृत्यांमध्यें तुलना करून त्यांतून एक केलें असले पाहिजे कारण ज्या वेळेस आपलें मन विकार वश होऊन त्याची प्रवृती एकाच

दिशेकडेस असते तेव्हां आपल्या त्या प्रवृत्तीवर आपला पगडा नसल्यामुळें आपण जें करितों तें समजून उमजून करीत नाहीं. पण जेव्हा दोन प्रवृत्ती आपणास दोन दिशेस ओढीत असतात तेव्हां त्या दोन प्रवृत्ती पैकीं कोणताही प्रवृत्तीचा स्वकिार करणें आपल्या स्वाधीनचे असल्यामुळें आपण जें कृत्य करतों तें समजून करतां तसेंच ज्या दोन कृत्यांत तुलना करून मी एक कृत्य करतों तीं दोन कृत्यें एक समयावच्छेदेकरून मज-समोर उभी असलीं पाहिजेत व तीं दोन्ही कृत्यें जर एक समयावच्छेदेकरून मज समोर उभीं राहणार नाहींत तर त्या दोहोंमध्यें तुलना करणेंच शक्य नाहीं. व जर तीं दोन्ही कृत्यें करणें मला शक्य नसेल तर त्यापैकीं अशक्य कृत्य करण्याबद्दल मी जबाबदार असूं शकणार नाहीं. एकूण मी स्वतः साध्य अशा दोन कृत्या पैकीं समजून केले या कृत्याचा हेतु पाहून व त्यापासून मिळालेल्या किंवा दुसऱ्यांचे हेतु ताडून त्या कृत्यास चांगलें किंवा वाईट ठरवितों.

अशा रीतीनें कोणत्याही कृत्यांची नैतिक दृष्ट्या योग्यता ठरविण्याचा एक प्रकार आहे तो हा कीं तुलने करितां निदान दोन कृत्यें असलीं पाहिजेत असें जें वर सागितलें तीं दोन कृत्यें एकमेकास अगदीं बाधक असलीं पाहिजेत ह्मणजे तीं कृत्यें अशीं पाहिजेत कीं त्यापैकीं कोणतेही कृत्य केल्यास दुसरें कृत्य करणें अगदीं अशक्य असलें पाहिजे. अशा तऱ्हेचीं दोन कृत्यें समोर येऊन त्यापैकीं कोणतें करूं असा संदेह उत्पन्न झाल्याबरोबर आपणास अगदीं चमत्कारीक रीतीनें असें वाटावयास लागतें कीं त्या दोन कृत्यांपैकीं एक कृत्य श्रेष्ट प्रकारचें आहे व तें केलें पाहिजे व दुसरें कृत्य कनिष्ठ प्रकारचें आहे व तें टाळलें पाहिजे. एक कृत्य केल्यास मला पुण्य लागेल व दुसरें कृत्य केल्यास मला पाप लागेल. हा जो चांगले वाईटपणाचा फरक कृत्यामध्यें दिसून येतो हा माझ्या खुषीवर त्या नाहीं. ह्मणजे मला एक कृत्य करावेंसें वाटतें किंवा तें केल्यापासून माझा फायदा आहे ह्मणून तें कृत्य करणें चांगलें व दुसरें कृत्य करण्यास मला कंटाळा येतो किंवा तें केल्यापासून माझें फार नुकसान आहे ह्मणून तें कृत्य करणें वाईट, असा त्या चांगले वाईटपणाचा मुळींच अर्थ होत नाहीं. कारण प्रसंगविशेषीं आपला अनुभव अगदीं याच्या उलट दिसून येतो. डा. जान्सन हा लहान असतां त्यास एकदां त्याच्या बापानें आपल्या पुस्तकांच्या दुकानावर जाऊन बसण्यास सांगितलें. त्या वेळेस पाऊस पडत होता. व अशा पावसांत जाणें इष्ट नाहीं हें डा० जान्सन यास माहित होतें. तथापि स्वतःचा पावसांत जाण्याचा त्रास चुकविण्याकरितां त्यांनीं दुकानावर जाण्याचें नाकारलें. या ठिकाणीं जरी त्यांनें आपल्या खुशीची गोष्ट केली तथापि 'मी केलें तें वाईट केलें' असें त्याचेंच मन त्याला खाऊं लागलें. तसेंच, अट्टल चोरांना सुद्धां केवळ फायदेशीर गोष्टी करीत असतांनांही आपल्या दुष्कृत्याबद्दल कसें वाईट वाटत असतें हें ज्यांनीं प्रसिद्ध इंग्लिश कवी स्कॉट यांचें रोकबी नावाचें काव्य वाचलें असेल त्यांस त्यांतील [illegible] बर्ट्रामच्या स्वभावावरून सहज लक्षांत येईल. एकूण, वर सांगितल्या तऱ्हेनें दोन कृत्यामध्यें जो नैतिक फरक दिसून येतो तो माझ्या खुषीच्या किंवा माझ्या फायद्याच्या पेक्षां फार भिन्न तऱ्हेचा आहे. हा फरक दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर अवलंबून नसून केवळ त्या कृत्याच्याच योग्यतेमध्यें आहे. व ज्या प्रमाणें सोन्याचा पिवळा रंग व रुप्याचा पांढरा रंग कोणाही समोर नेला तरी बदलला जाणार नाहीं, कारण ते रंग केवळ मनुष्याच्या कल्पनेचे नसून त्या पदार्थाचे गुण आहेत, त्याचप्रमाणें हीं दोन कृत्यें कोणाही समोर नेऊन उभीं केलीं तरी त्याला त्या दोहोमध्यें तोच फरक दिसून येणार आहे, कारण तो जो फरक तो त्या कृत्यामध्येंच असून त्याच्याशीं मनुष्याच्या कल्पनेचा कांहीं एक संबंध नाहीं याचीं उदाहरणें आपणास पदोपदीं शेकडों दिसून येतात. आतां प्रसंगविशेषीं एखाद्या कृत्याचें चांगलेवाईटपणा बद्दल मतभेद उत्पन्न होतो, पण त्याचें कारण निराळें आहे. आपण जेव्हां कोणत्याही एखाद्या कृत्याचा विचार करतों तेव्हां ज्या दुसऱ्या कृत्याशीं तुलना करून आपण त्याचें चांगले-वाईटपण ठरवितो, तें कृत्य बाहेर स्पष्टपणें प्रकट केलें नसल्यामुळें तें प्रत्येकाचे मनांत निरनिराळें असण्याचा संभव आहे व ह्मणून त्यांची तुलना निरनिराळी होऊन त्या कृत्याच्या चांगले वाईटपण बद्दल मतेंही निरनिराळीं पडतात पुढें चालू

---

# वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध २ शके १८१८

---

देशी कपडा वापरावयाचा व विलायतचा कपडा वापरावयाचा नाही असा निश्चय प्रांतोप्रांतीचे लोक जाहिरसभा मधून करीत आहेत इतकेंच नाहीं तर त्या निश्चयाच्या अनुरोधानें वर्तनही पुष्कळ लोक ठेवूं लागले आहेत हें कळविण्यास मोठा अभिमान व आनंद वाटतो. हिंदुस्थान-सरकारनें म्यांचेटरवाल्याच्या पोकळ ओरडण्यास मान दिला व इंडियांतील प्रजाजनांचा हितकारक सल्ला ऐकिला नाहीं या गोष्टीमुळें निराशेनें लोकांचें चित्त खवळून गेलें आहे, आणि सरकारच्या अन्यायी कृतीचा प्रतिकार करण्यासाठीं देशाभिमानाच्या स्फूर्तीनें लोक तत्पर झाले आहेत. बिलायती कपडा त्याज्य किंवा वर्ज्य मानण्यांत आला तर नेटिव लोकांचा देशी कपड्यावर निभाव लागणार नाहीं अशी भिती मि. दिनशी एदलजी वाचा या सारख्या गृहस्थांस वाटू लागली आहे. कोट्यावधि रुपयांचा माल दरसाल विलायतेहून येतो तितका माल या देशांत तयार होण्या इतके माग इंडियांत नाहींत आणि त्या शिवाय इंडियाचें सूत असावें तितकें तलम व लांब धाग्याचें नसतें त्यामुळें उंची उंची कापड इंडियांत तयार होण्याचीच वानवा आहे. तेव्हां आमच्या पैकीं कित्येक गृहस्थांस विलायती कपडा टाकूं नये असें वाटतें. त्यांच्या मनाची अशी कातरता व साशंकपणा निराधार आहे असें कोणाचें ह्मणणें नाहीं पण त्यांच्या बिकट व गूढ शंकेला उत्तर निराळेंच आहे.

किती ही अडचणी येवोत, संकटें पडोत, व त्रास होवो विलायती कपडा वापरावयाचा नाहीं असा दृढनिश्चय लोकांनीं केला आहे. निश्चयाचें बळ इतकें विलक्षण आहे कीं इष्ट फलप्राप्ती कांहीं फार दिवस लांबणार नाहीं विलायते प्रमाणें इंडियांत सर्व प्रकारचा मुबलक कपडा तयार होत असता तर म्यांचेस्टर वाल्यांनीं आपल्या आक्रोशानें आकाश पाताळ एक करून सोडलें नसतें. विलायती कापडा वाचून इंडियाचें चालणारच नाहीं असें भ्रमपटल इंग्लिश गिरणीवाल्यांच्या डोळ्यावर आलें आहे तें दूर करण्याची वेळ हीच आहे. झालुकीचा, नरम, सफाईदार, व बारीक धाग्याचा विलायती कपडा वापरण्याची आमची संवय मोडण्यास आह्मी तयार आहों. ओबड धोबड, साधें व जाडेभरडें देशी कापड उपलब्ध असेल तितक्यावरच आह्मी आपल्या गरजा भागवून घेण्याची शपथ घेतली आहे स्वार्थत्यागा शिवाय कोणती ही गोष्ट साध्य नाहीं. अंगाला झीज लावून घेतल्या शिवाय व कांहीं तकलीफ सोसल्या शिवाय देशाभिमानाचें कोणतेंच कार्य साध्य नाहीं देशाभिमान बहुत उपाधींचा व्यंजक आहे. आपल्या देशाचें ब्रीद आपण या निकराच्या व आणिबाणीच्या प्रसंगीं राखलें नाहीं व आपलें वचन आह्मी खोटें पाडलें तर आपल्या लोकांच्या आंगचें पाणी सरकारास सहजी कळून चुकेल आणि मग नेटिवांची पायमल्ली करितांना फारसें भिण्याचे कारण राहणार नाहीं. वेळ येऊन बेतली तेव्हां विलायती कपडा न वापरण्याचा आह्मी संकल्प केला. हा संकल्प यथान्याय आहे, राजनिष्ठपणाचा आहे, व स्वातंत्र्य दायक आहे. तो अक्षरशः खरा करून दाखविणें आपल्या हातीं आहे. प्राण जावो अथवा राहो, मी प्रतिज्ञे पासून भ्रष्ट होणार नाहीं असा आपला प्रत्येकाचा निर्धार पाहिजे.

---

जमिनीची फेर मोजणी झपाट्यानें चालू आहे आणि सारा वाढविण्याचा संकेत पूर्वींच ठरला आहे. सारा वाढला जावो अथवा कमी होवो, दिवसानुदिवस लोक अधिक रंजीस येत चालले आहेत, त्यांच्याजवळ त्राण नाहीं, काबाडकष्ट करून देखील वर्षभराची पोटाची सोय बरोबर होत नाहीं अशी संकटमय स्थिती डोळ्यापुढें दत्त ह्मणून उभी राहते. अशा निकृष्ट दशेस पोचत चाललेल्या लोकांविषयीं सरकारचा अभिप्राय कांहींही असला तथापि प्रजेचें स्वास्थ्य शांतता, व समाधानी हीं कायम राहतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. प्रजेची कांहीं काळजी घेण्याच्या ऐवजीं प्रजचें दुःख दुणावेल अशा कृती सरकार करीत आहे. सारा जबर आहे. इंग्रजी राज्य होण्यापूर्वी फक्त एक जमिनीतील उत्पन्नावर कर असे पण इंग्रजीखालीं बहुविध कर नानाप्रकारें लादण्यांत येत आहेत. रयत अडाणी पण गरीब व साधीभोळी आहे. शेतकीचा काय तो मुख्य उदरनिर्वाहाचा धंदा आहे. आणि त्या धंद्यातल्या मुख्य किफायतीवर साऱ्याच्या वाढीची गदा येऊन पडली ह्मणजे काय काय परिणाम होतील याचें चित्र मनातच चांगलें काढता येईल. शेतकरी लोक सावकाराच्या देण्याखालीं व व्याजाखाली अगोदरच चक्काचूर झाले आहेत, त्यांच्या जमिनी त्यांच्या हातांतून बहुतेक गेल्या प्रमाणेंच आहेत आणि सारा वाढल्यामुळें त्यांच्या तोंडची भाकरी पळविल्या प्रमाणें होत आहे.

वऱ्हाड सार्वजनिक सभा या विषयाचा चांगला खल करण्यासाठीं प्रांतिक जाहिरसभा भरविणार होती पण तो योग लांबणीवर टाकण्यांत आला. सध्यांचा काल व्याख्यानें देण्याचा, वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याचा आणि अर्ज करण्याचा आहे ह्मणजे लोकांचे गाऱ्हाणें सरकारपाशीं पोचविण्याचे तीन मार्ग आहेत ते सभा वर्तमानपत्रें व अर्ज होत साऱ्याच्या प्रकरणांत कांहीं दाद मिळण्याची आशाच नाहीं परंतु मनुष्यानें प्रयत्नशील असावें ह्मणून कोणत्या तरी मार्गानें हा प्रश्न आह्मी लोकदृष्टी समोर वारंवार आणित आहों. जें जें घडेल तें खरें.

---

## The Berar Samachar

MONDAY MARCH ,16 1896

Mr. R. D. Hare will shortly proceed to England on a long furlough of nineteen months. His indifferent health seems to have forced him to seek for such a long rest. It would be quite beyond the scope of our usual work to narrate the history of successive officers going on long leaves; we make a significant exception to this in that we feel bound to express our sense of gratitude for the meritorious services which Mr Have has all along been rendering with an undivided heart to this province. It is hence within the mark for us to take a brief resume of Mr. Hare's interesting career. With a stern regard to duty and by a faithful discharge thereof he has succeeded to win the confidence of the Government on one hand and of the people on the other. He went deep into all the matters that went before him and studied them well before he disposed of them. He is always methodical in his work. As a straight forward officer without any official bias he maintained amicable relations between the Government and the people. Although he might not have obtained academic distinctions he possesses a very high literary and artistic taste.

Mr. Hare came to India in 1869 as an Extra Assistant Commissioner posted in Chotta Nagpur division After several transfers he was appointed as a Relief officer of the Pu[illegible] circle in the famine days of 1874. Next year he was sent to Berar as an Assistant Commissioner of the 3rd class in which he was comfirmed in 1878. In 1883, he was made a first class Assistant Commissioner and acted as a Judge of the Khamgao Small Cause Court. From this he was promoted to the grade of a Deputy Commissioner As a District officer he displayed his abilities in various ways. He took keen interest in municipal and local Board's affairs and did his best in bringing out the welfare of the people. The supply of water to Akola is a living mark of his industry and regard for the general wants and needs.

---

The p[illegible] Forest Administration in

Berar is not as satisfactoy as it ought to be. The complaints and grievance of the masses at large are often ignored and sometimes restrictions are introduced to increase the Forest—revenue even at the cost of inconveniences and discom—forts which they will entail upon the people. In the Provincial Public meeting held at Akola in the November of 1894 under the anspices of the Berar Sarva—janik Sabha the present policy was condemned and a calm and deliberate consideration of the matter was de—manded at the hands of the high officers? Where climatic or physical conditions necessitate the preservation of forests the public find little ground for dissatisfaction. But in lands pre-served for a supply of timber or for pasture lands, the needs and wants of the people are often set aside in prefeernce to the revenue available from such lands being turned into state forests. We call the attention of the Local autho rities to the main principles which the government of India has laid down for their guidance. It should be observ ed that none will miss the unambigious terms in which the rights and con veniences of the people are given a prior claim over the demands of the revenue. we quote below the aule in general and let Government see its way cf following it to its letter.

"It should also be remembered that, subject to certain conditions to be referred to presently, the claims of cultivation are stronger than the claims of forest pre-servation. The pressure of the population upon the soil is one of the greatest difficulties that India has to face, and that application of the soil must generally be preferred which will support the largest numbers in proportion to the area. Accordingly, wherever an effective demand for culturable land exists, and can only be supplied from forest areas. the land should ordinarily be relinquished without hesitation; and if this principle applies to the valuable class of forests under consideration, it applies *a fortiori* to the less valuable classes which are presently to be discussed. When cultivation has been established, it will generally be advisable to disforest the newly-settled area."

"Mention has been made of certain conditions to which the application of the principle laid down in the preceding paragraph should be sub-ject. They have for their object the utilization of the forest area to the greatest good of the community. In the first place, the Honey-combing of a valuable forest by patches of cultivation should not be allowed; as the only object it can serve is to substitute somewhat better land in patches for sufficiently good land in large blocks, while it renders the pro per preservation of the remaining forest area almost impossible. The evil here is greater than the good In the second place, the cultivation must be permanent. Where the phy sical conditions are such that the removal of the protection afforded by forest growth must result, after a longer or shorter period, in the ste-rilization or destruction of the soil the case falls under the principle discussed in paragraph 4 of this Re solution. So again a system of shift-ing cultivation, which denudes a large area of forest growth in order to place a small area under crops, costs more to the community than it is worth, and can only be permitted, under due regulation where forest tribes depend on it for their sustenance. In third place the cultivation in ques-tion must not be merely nominal, and an excuse for the creation of pastoral or semi-pastoral villages, which do more harm to the forest than the good they reap from it. And in the fourth place, cultivation must not be allowed so to extend as to encroach upon the minimum area of forest which is needed in order to supply the general forest needs of the country, or the reasonable forest requirements, present and prospective, of the neigh bourhood in which it is situated In many tracts cultivation is practically impossible without the assistance of forests, and it must not be allowed to destroy that upon which its exist-ence depends."

pur-

## वऱ्हाड

हवामान— उष्णता उत्तरोत्तर विशेष होऊं लागली आहे हवा स्वच्छ आहे पण असावी तितकी निरोगी नाहीं. पाण्या संबंधानें सर्व प्रांतभर हाकाहाक चालू आहे.

आमचे लोकप्रिय डेपुटी कमिशनर मि० हेअर हे येत्या १८ वे तारखे पासन १९ महिन्यांच्या फर्लो रजेवर विलायतेस जाणार आहेत. सध्या कामाचा चार्ज मि० सिम्पसन असि० कमिशनर यांस देण्याविषयीं हुकूम आला आहे.

गेल्या महिन्यांत मुनसिपाल सभासदांची निवडणूक झाली त्यांत खालील गृहस्थ बहुमतानें निवडण्यांत आले आहेत:—रा० रा० गणेश अनंत वैद्य, अनंत तात्याबा कोरडे, दामोधर गणेश पटवर्धन, मुरजराव गोविंद राम, शंकर गोविंद, व लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर.

मे० निकोलेट डिपुटी कमिशनर, व पोलीस सुपरिनटेंडंट मेसर्स कंवरलीज व राईट हे तिघे जुने अंमलदार येत्या एप्रिल महिन्यापासून पेनशन घेऊन जाणार आहेत.

रावसाहेब पटवर्धन, व रा. रा. महाजनी यांच्या स्वाऱ्या सध्यां उमरावती मुक्कामाला आहेत.

मि० हेअर साहेब यांच्या सन्मानार्थ सार्वजनिक पानसुपारी होणार होती परंतु ती त्यांनीं नाकारल्यामुळें तहकूब राहिली येथिल मित्र समाजांत त्यांस पानसुपारी होऊन सर्व मित्र मंडळीसह त्यांचा फोटो घेण्यांत आला. मित्रसमाजाच्या इमारतीकरितां निराळी जागा देवविण्याचा साहेबांचा विचार आहे.

रा० रा० मारुती मोहनराव यांस चिखलीचे तहशिलदारी वरून कमिशनरचे आफिसांत परत बोलावल्यामुळें चिखलीस मि० सय्यद महमद, नायब तहशिलदार उमरावती यांस तहशिलदार नेमिलें.

मुंबईकडील मि लुकस नांवाचे सिव्हील सरव्हंट यांस वऱ्हाडांत डेपुटी कमिशनर नेमणार अशी लोकवार्ता आहे.

## NOTICE

Whereas the Municipal Commit-tee at Ellichpur Civil Station in exercise of the powers conferred by the B M. Law 1886 have provided for the performance by their agents of the duties usually performed by sweepers in regard to private houses and buildings, that is to say for the cleaning and removing night soil from private latrines.

Notice is hereby given to all con cerned that it has been resolved by the said Committee to impose under section 42 of the said Law upon all such houses and buildings within Municipal Limits, a tax to be called the Scavenging Tax as below set forth:—

### DESCRIPTION OF PROPERTY TO BE TAXED

The Tax will be levied upon all houses and buildings which contain latrines or any parts of which are used as latrines.

### AMOUNT AND RATE OF TAX

The tax will be levied at the fol-lowing rates:—

*Class* I. On dwelling houses and buildings occupied by persons the annual rental of which does not exceed Rs. 10 Rs. 0-12 0 per annum.

*Class* II. On dwelling houses and builings occupied by persons the an-nual rental of which does not exceed Rs 20— Rs. 2-0 0 per annum.

*Class* III. On dwelling houses and buildings occupied by persons the annual rental of which does not exceed Rs. 50 — Rs. 4-0-0 per annum.

*Class* IV. On dwelling houses and buildings occupied by persons the annual rental of which does not exceed Rs 100 — Rs. 4—8—0 per annum.

*Class* V. On dwelling houses and buildings occupied by persons the annual rental of which exceeds Rs. 100— Rs. 6-0 0 per annum.

### Proviso

Provided that when the latrines in any house or buildings are cleaned by private sweepers the above Tax will not be levied but a sum of Rs. 2 will be charged on each such house or building for the use of the Municipal night soil carts.

### SYSTEM OF ASSESSMENT TO BE ADOPTED

The annual rental of houses and buildings referred to above will be ascertained by a Sub Committee of the Municipality subject to the sanction of the general Municipal Committee as provided in B. M. Law.

The Tax will be leviable in advance Any inhabitant objecting to the above proposed Tax should submit his objections in writing within 30 days from the date of notice in order that they may be considered at a special meeting of the committee as by law provided.

8th March Ellichpur
(Sd) Ganesh Nagesh
Secretary

(Sd.) H Godwin Austen
Chairman
Ellichpur Civil Station
Municipal Committee,

## जाहिरात.

सर्वत्र लोकास या ज्याहिरातीनें काशीनाथ शंकरआपा आज्ञान पालन करणार बहीण जवजे रामशेटआपा तर्फे मुखत्यार गोविंद माधव जोत राहणार आडगांव. असें ज्याहिर करतात कीं. तुकाराम वल्लद नारायण शिंपी राहणार आडगांव यांस आम्ही कुलमुखत्यार नेमून इतके दिवस काम घेत आलो परंतु त्यास अशीं मांदगी झाली आहे कीं, काम करण्याच्या लायक कोणच्याही प्रकारानें नाही. याजकरितां त्याच्या नांवचे म्हणजे तुकाराम वलद नारायण शिंपी याच्या नावचे कुलमुखत्यार पत्र आम्ही रद्द केलें आहे. जर कोणी आमच्याकरितां सदरील इसमाशी कोणी, कोणच्याही प्रकारचा व्यवहार वगैरे करिल तर त्याजबद्दलचे नाबदार आम्ही कोणच्या प्रकारचे नाहींत ज्याचा तो आहे. हें सर्वांस कळावें म्हणून दिली ज्याहिरात सही तारीख १४ माहे मार्च सन १८९६ इसवी.

[ सही ] काशीनाथ शंकरआपा आज्ञान पालन करणार बहीण ज्यानकी जवजे रामशेट आपा तर्फे मुखत्यार गोविंद माधव जोत राहणार आडगांव दस्तुर खुद्द.

## नोटीस.

नोटीस बेशमी रामजी परशराम देशमुख राहणार संवदड तालुके दर्यापूर जिल्हे एलिचपूर यास.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा बाप परशरामजी व माझा बाप नारायणजी वल्लद म्हसाजी हे सखे बंधु असून ते एकत्रच राहात होते. माझा बाप माझे आज्ञानपणातच मेला व आपण सर्वजण एकाच ठिकाणीं राहात आलो. जी हल्ली स्थावर जंगम इस्टेट आहे ती वडिलोपार्जीत असून त्याजवर मालकी आपले उभयताची आहे हल्ली तुमचे व माझे बनत नसल्यामुळें मी आपला निराळा राहलो इस्टेटीचा निमे भाग करून अलग द्यावा असे तुम्हास म्हटलें असतां तुम्ही त्याप्रमाणें हिस्सा अलग करून देत नाहीं सबब ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत माझा निमे हिस्सा स्थावर जिंदगीचा आलग करून द्या व तसे न केल्यास दिवाणीत दावाकरून या नोटीसीचे खर्चसह सर्व हिस्सा भरून घेईन कळावे. तारीख १३ माहे मार्च सन १८९६ इ.

( सही ) निशानी भास्कर वल्लद नारायण देशमुख राहणार संवदड याची असे.

## नोटीस.

रा० रा० तुकाराम नारायण शिंपी राहणार आडगांव यांस:—

नोटीस देणार काशीनाथ शंकरअपा अज्ञान पालन करणार बहाण ज्यानकी जवजे रामशेट आपा तर्फे मुखत्यार गोविंद माधव जोत राहणार आडगांव. या नोटीसीनें असे कळविले जाते कीं, तुम्हास आम्ही कुलमुखत्यारीचे कामवर नेमिले होते परंतु स्वारि प्रकृतीमुळें तुमचे हातून काम होईना सबब तुमचे मुखत्यार आम्ही निराळी ज्याहिरात देतर रद्द केलें आहे. परंतु ... कुलमुखत्यारीचे काम जितके दिवस ... त्याजबद्दल कागद पत्र वगैरे सर्व प्रकार तुमचे हातून जाहला आहे तो आम... रीतसीर समजून द्यावा. हे तुम्हास क... म्हणून दिली नोटीस सही. तारीख ... माहे मार्च सन १८९६ इसवी.

[सही] काशीनाथ शंकर आपा आ० पा० करणार बहीण ज्यान जवजे रामशेट आपा तर्फे मु० गोविंद माधव जोत राहणार आडगाव द०

## वर्तमानसार.

जर्मन सरकार इंग्लंडच्या चढाओढीनें आपलें आरमार बरेंच वाढविण्याच्या खटपटी स लागलें आहे.

अमेरिकेन सरकार व स्पनिश सरकार यां च्यामध्यें कांहीं लढा उत्पन्न झाला असून स्पेनदेशांतील वर्तमानपत्रें युद्धाची उचल करीत आहे, सांप्रत युरोपांतील राष्ट्रांमध्यें युद्धाची खुमखुम फारच वाढली आहे. स. वि,

यात्रा—पुढील वर्षी सिंहस्थ व त्याचेपुढें कन्यागत असें असल्यामुळें या वर्षी काशी येथें चोहोंकडून यात्रा फार येत आहे. वऱ्हाड. खानदेश व पुणें प्रांताकडील वगैरे यात्रा फारच दिसत आहे. गंगेचें महात्म्य कलीयुगाचीं ५००० वर्षें पुरीं होतांच जाणार यामुळें ही यात्रा काशी येथें फार येत आहे असें समजतें पांच हजार वर्षाची मुदत पुरी होण्यास अद्याप चार पांच वर्षें अवकाश आहे. श्री गंगेचें महात्म्य जाणारें नसून तें आहे असेंच राहणार हे.

सध्यां कलकत्ता येथील टांकसाळेंत चवल्या, पावल्या व अधेल्या अशीं नाणीं रोज एक लाख याप्रमाणें पाडली जात आहेत.

तूप तुळशींचीं पानें घालून कढविलें असतां स्वच्छ होतें. दें. से.

समुद्राच्या पाण्यांत सोनें असतें आणि तें काढतां येतें असा एका रसायनशास्त्रज्ञास शोध लागला आहे परंतु हें सोनें काढण्यास जितके श्रम व पैसा लागतो, तितक्या मानानें उत्पन्न केलेल्या सोन्याची किंमत फार थोडी होते असें ह्मणतात. त्या रसायनशास्त्रज्ञाचा शोध प्रसिद्ध झाल्यानंतर थोडेच दिवसांत अनेकांनीं इंग्लंडच्या किनाऱ्यावरील समुद्रजलांत सोनें निघतें कीं नाहीं याचा शोध लाविला व त्यांचे शोधप्रयोग अगदीं सिद्धही झाले. समुद्रजलांत सोनें रगड आहे, असें आतां सर्वानुमत आहे. त्याचप्रमाणें ज्वालामुखी पर्वताच्या आसपास जे उष्णोदकाचे फवारे असतात, त्यांतही सोनें सांपडतें असा शोध लागला आहे. गोड्या पाण्याच्या तळ्यांत, विहिरींत कांहीं सोनें सांपडल्याचा दाखला नाहीं. परंतु पृथ्वीवरील एकंदर समुद्रजलांत किती सोनें सांपडण्याचा संभव आहे याचा अदमास एका गृहस्थानें काढला आहे तो पाहिला ह्मणजे कमालच वाटते. त्याचें ह्मणणें कीं समुद्रजलांत [illegible]दर १४०००००० एक कोटी [illegible]ळीस लक्ष औंस इतकें सोनें आहे! इ[illegible]नें जर व्यवहारांत आणण्यास सांपडलें तर शिलिंगाची किंमत दोन आणे होण्याची पाळी येईल! पण इतकें सोनें व्यवहारांत आणण्यास अडचण एवढीच आहे कीं, त्याच्या दिढीनें खर्च येतो! तेव्हां शास्त्रज्ञांनीं सध्यां विचार बाजूला ठेविला आहे! करम०

लंडन शहराचा प्रचंडपणा.

लंडन शहरांत ६०००००० लोकवस्ती आहे. त्याची उत्तरदक्षिण रुंदी १४ आणि पूर्वपश्चिम लांबी १७ मैल आहे. त्याच्या रस्त्यांची लांबी ७५०० मैल आहे. दररोज ४०० मुलें जन्मतात, ३५० मुलें शिक्षणास आरंभ करितात आणि १०० जणलोक उमेद्वारी करूं लागतात, आणि दररोज १५० मनुष्याचीं लग्नें होतात आणि २०० मनुष्यें मरतात. सन १८९४ सालीं दर महिना ९०८ प्रमाणें घरें बांधलीं गेलीं पालेस्टाइनपेक्षां जास्त यहुदी, ग्लासगोपेक्षां जास्त स्काच लोक आणि डब्लिनपेक्षां जास्त एरिशलोक लंडन शहरांत राहतात. त्यांत ५००००० जर्मन्स आणि तितकेंच इतालियनलोक आहेत त्याचप्रमाणें फ्रेंच, डच, स्पानिश, जपानी आणि चिंनी लोकही पुष्कळ आहेत. या अठरा पगड जातीच्या शहरांत २४ तासांत ९५००० वाहनें आणि ६१८०००० पादचारी लोक हिंडतात, त्याचा बंदोबस्त ठेवण्याच्या कामावरच ८०० पोलिस शिपाई गुंतलेले असतात. त्या शहरांत ७०२ रेलवेचीं स्टेशनें आहेत, आणि त्याच्या आसपास १२ मैलाच्या छट्ट्यांत ७०८ मैल रेलवेचा रस्ता आहे. टेम्स नदीवर रेलवे कंपन्याचे असे १२ मोठमोठे पूल आहेत. त्या शहरांत जमिनी खालून जाणाऱ्या ज्या रेलवे आहेत, त्यांच्या गाड्या दर तीन तीन मिनिटानें सुटतात. आणि त्या रेलवेंतून दररोज १० लक्षांपेक्षां जास्त मनुष्यें प्रवास करितात. आगगाड्या शिवाय वाहनांतून जाणाऱ्या लोकांसाठीं ५००० आमिनिबस ६८०० ट्रामवेच्या गाड्या, १४८१०० क्याब गाड्या, आणि ७५०१ ह्यान्सम गाड्या लागतात, त्यांतून २५०००००० लोक फिरतात दरसाल १२००आगी लागतात. सार्वजनिक स्वास्थ्य ठेवण्यासाठीं १२०००पेक्षां जास्त पोलिस, ४०० गुप्त पोलिस आणि लेकांच्या फौजदारी कज्ज्यांचा निकाल करण्यासाठीं २५ पोलिस माजिस्त्रेट आहेत. याशिवाय टेम्स नदींतून जो व्यापार चालतो त्याचा बंदोबस्त ठेव यासाठीं ५०० पोलिस अगदीं निराळेच आहेत. दरसाल ७५००० मनुष्यांस कैदेच्या शिक्षा होतात, यांत दारू पिऊन मस्त होणारे २५००० इसम असतात.

लंडन शहरास अन्नसामग्री ही फारच मोठी लागते. दर आठवड्यास ७००० टण थोर जनावरांचें मांस, ४००० टण मासे आणि १००००० कोंबड्या खपतात. त्याचप्रमाणें भाजीपाला आणि फळफळावळ मिळून ६००० टण लागते. याशिवाय ३५०००००० क्वार्टर पाव, २०००००० अंडीं, ३०००००० पौंड लोणी, आणि २०००००० क्वार्ट दूध लागतें. दुधासाठीं ३५००० गाई लंडनांत गवळ्यांनीं ठेवल्या आहेत, आणि दर आठवडा आगगाड्यांतून ३५००० ग्यालन दूध बाहेरून येतें. लंडनांत दरसाल १६०००००० टण कोळसा त्यांत रहाणाऱ्या लोकांच्या सर्पणास लागतो.

विलायती कपड्यांची होळी—होळीच्या दिवशीं ठिक ठिकाणच्या होळ्यांत शहरामध्यें विलायती कपडे अग्नीस अर्पण करण्यांत आले. या समारंभासाठीं माळीवाड्यांत आणि नालेगांवांत पांच पांचशे लोक जमले होते. सर्वांनीं देशी कापड वापरण्याच्या शपथा घेतल्या. फारच स्तुत्य!

सन १८८५ सालीं यु. स्टे. अमेरिकेंत जें गव्हांचें पीक झालें तें तेथील पूर्व वर्षीच्या पिकापेक्षां नऊ पटीनें मोठें होतें. केवढें हें मोठें उत्पन्न आणि शेतकरी लोकांस केवढा हा फायदा! शु० सू०

नार्थवेस्ट प्रांतांत अजून दुष्काळच आहे. दुष्काळाच्या कामावर १२,७८७ माणसें असून त्यांतील २,६७४ लोकांस अगदी फुकट पोसावें लागत आहे. रिलीफ कामावर २,००० लोक आहेत. पाऊस पडण्याची फार जरूरी आहे.

अबिसीनियाच्या राजानें चालून आलेल्या इटालीच्या फौजेचा पुरा पराभव केला असें समजतें. राज्याच्या फौजेनें इटालीच्या मोठ्या फौजेस मागें हटविलें. लढाई मोठी कडक झाली आणि इटालियन लोकांस मार खात खात मागें हटावें लागलें. त्यांस या मागें हटण्यांत आपल्या तोफा शत्रूच्या स्वाधीन कराव्या लागल्या

या पराभवाबद्दल इटलीची राजधानी रोम शहर यांतील लोकांत अगदीं चळवळ व गडबड सुरू झाली आहे.

इटालाच्या ६० तोफा शत्रूंस मिळाल्या. ३ गोलंदाज नाहींसे झाले असून एक जनरल जखमी झाला.

अबिसीनियाचा राजा मेनलीक याच्या बरोबरच्या लढाईत इटालीचे तीन हजार पासून पांच हजार लोक जाया झाले

इटालीच्या राज्यांतील वगळाल्या ठिकाणच्या लोकांनीं इटाली सरकारच्या विरुद्ध खटापटी सुरू केल्या आहेत.

अबिसीनियाच्या कामावर नवे ६ तोफखाने व १०,००० फौज अशी आणखीं पाठविण्याचा इटाली सरकारानें ठराव केला आहे.

अबिसीनियाबरोबरच्या त्या लढईत इटालीचा हा पराभव झाला त्यांत इटालीच्या १५ पलटणी लढण्यास होत्या ज. बाराटरी हा मुख्य होता.

शत्रूची फौज फार होती व त्यांणीं गोळ्यांचा अगदीं वर्षाव केला.

इटालीचे किती लोक मेले हें अजून नक्की समजलें नाहीं तरी एका जनरलाच्या हाताखालची सगळीच फौज नाहींशी झाली आहे.

इटालींतले फार लोक सरकारच्या अगदीं विरुद्ध होऊन गडबड करण्यास प्रवर्तक झाले आहेत. कित्येक तर प्रजासत्ताक राज्याची स्थापना करण्याच्या ही उद्योगांत आहेत. मुख्य प्रधान व त्या लढाईवरचा मुख्य जनरल यांचीं अगदीं विटंबना चालली आहे.

मनुष्याच्या मस्तकांतल्या मेंदूची तसबीर काढण्याची एका फ्रेंच गृहस्थानें युक्ती काढली आहे. अजून ती युक्ती पूर्णपणें साध्य झाली नाहीं पण साध्य होण्याची बहुत्येक तयारी झाली आहे असें सांगतात.

अमेरिकेच्या सेनेटनें केलेल्या ठरावावरून माद्रीड येथील लोकांत फार गडबड सुरू झाली आहे. अमेरिकन लोकांच्या रक्षणार्थ विशेष बंदोबस्त करण्यांत घाट आहे. अमेरिकेशीं लढाई करण्याचा प्रसंग येणार कीं काय याबद्दल स्पेनच्या वर्तमानपत्रांत चर्चा सुरू झाली असून खासगी लोकांस हत्यारें देऊन सज्ज करावें अशा सूचना होऊं लागल्या आहेत. हा असा प्रकार चालू असतां २५,००० फौजेच्या एका टोळीस कुबावर जाण्यास तयार असण्याचा हुकूम सुटला असून दुसऱ्या एका फौजेसही तयारींत असण्याचा हुकूम झाला आहे.

अबिसीनिया बरोबरच्या लढाईत इटालीचा मोड झाल्यामुळें युरोपांतल्या बड्या तिघां राजांचा झालेला एकोपा बिघडेल व युरोपांतल्या सर्व बड्या राजांचे कट होण्याचें पुन्हा सुरू होईल असें इंग्रजांचें अनुमान आहे. ठा. अ.

---

नोटीस

रा. रा. विठु वा भिवसेनजी राहणार गाडेगांव तालुके आकोट जिल्हे अकोले यास नोटीस देणार अंबी मर्द विठु राहणार पारळे तालुके जिल्हे अकोले. नोटिसीनें असें कळविते कीं तुझे बरोबर माझें लग्न होऊन आज अदमासे बारा वर्षें जाहलीं. लग्न जाहाल्यावर आठ वर्षें तू मासर माहेर रिती प्रमाणें केलेस. मी शाहाणी होऊन सुमारे ४ चार वर्षे जाहली ह्या चार वर्षांत एक १ वर्ष मी तुजपाशी होते त्यावेळी तू व तुझी मातोश्री असे मिळून मजला मारावे, उपाशी ठेवावें. अशा हालात मी तुझे पाशी राहिले व समक्ष तुजला पुष्कळ प्रकारानें सांगितले. परंतु कांहीं एक उपयोग जाहाला नाहीं. नंतर मी निरउपाय होऊन. बापाचे घरीं राहिले तू माझे पोटा पाण्याची कांहीं एक तजवीज आज पावेतो केली नाहींस. मी तुझे नावावर आज पावेतो कर्ज रुपये १५० दिडशे काढून खाले आतां मजला कर्ज ही मिळत नाहीं. उपाशी मरत आहे. कड येऊन राहण्याची सोय नाहीं व छिती वाटते कीं तु काय करशील कोण जाणे. तर तुजला असे कळविते कीं ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत तू माझे बद्दल खालीं लिहिलेल्या गोष्टीचा बंदोबस्तकरून चार जात भाई पंच ची खात्री करून द्यावीस ह्मणजे मी तुझे पाशी येऊन राहण्यास तयार आहे. पंचाची खात्री करून देण्याच्या गोष्टी लिहिल्या प्रमाणें.

माझ्या जिवास कांहीं इजा वगैरे होणार नाहीं, मजला अन्नवस्त्र बीन तकरार मिळावे. नवरा बायको ज्या प्रेमानें वगैरे असतात त्या प्रमाणें तू मज बरोबर राहशील. आज पावेतो झालेली खावटी रुपये ( १५० ) आणून द्यावेत. अशा सदरी लिहिलेल्या गोष्टीची पंचाची खात्री करून द्यावी. असे जाहाले नाहीं तर. पंचा मारफत मी माझा पुढचा रस्ता पंच सांगतील त्या प्रमाणें करीन व हीच तुझी सोड चिठ्ठी समजून दुसरा घरठाव करीन मग तुझा नवरेपणाचा हक्क मजवर बिलकूल नाहीं. हे तुजला अगोदर कळविले आहे. ह्मणून दिल्ही नोटीस सहीं. तारीख ११ माहे मार्च सन सन १८९६ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी अंबी मर्द
विठु इच्या हातची असे.

---

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,,१ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।१

x monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisment.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR


VOL XXX AKOLA MONDAY 23 MARCH 1896 NO II

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख २३ माहे मार्च सन १८९६ इ० ११


## घड्याळ

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझर्लंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेल्वे रेग्युलेटरचें असून याचे कांटे सिकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे. मागील बाजू झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस ६ जीवेल ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहेत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यात व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— " गिऱ्हाइकांत घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पोळ.
९२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक


## नोटीस.

रा० रा० सिताराम वल्लद रूपचंद पाटील कारभारी मौंजे पिंपळगांवकाळे तालुके जळगांव यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं आडगांव ज्याहागीर प्रगणें अडगांव तालुके अकोट येथील शेतें.

१ सर्वे नंबर ८४ एकर ९८'८ आकार ११.

२ सर्वे नंबर ८८ एकर ६०२९ आकार ३६.

सदर्हू सेताचे खातें रावजी वल्लद रुपाजी पाटील टेकाळे राहणार आडगांव ज्याहागीर याचे नावाणी व त्यांचें वहिवाटीस आहेत सदरहू इसम आमचे गांवातून निघून जाऊन आपण त्याचे मामे भाऊ असल्यामुळें आपले घरी राहात आहे. म्हणून आमचे येथील पाटील लोक गव गवा सांगतात.

दिवाणी मुकद्दमा नंबर ३५४ व ६८७ सन १८९५ व १८९४ इसवीचे दावे सेत साऱ्याचे संबंधानें खातिदार याजवर केले असून तो तुमचे येथें राहातो ह्मणून तेथील समन्स केले .तुमचे कडून रिपोर्ट आले कीं सदरहू इसम आमचे गांवांत राहात नाहीं करितां सर्व लोकास जाहिरी नोटीस व तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं सन १३०३ व सन १३०४ व सन १३०५ असे तिन्हीं सालचें सेत साऱ्याचे खातेदार याजकडून घेणें असलेले ही नोटीस प्रदर्शीत झाल्यापासून व तुह्मास पावले दिवसापासून पंधरा दिवसाचे आंत खातेदार व त्याची बायको व त्याचे आप्त असे आमचे येथें येऊन साऱ्याचे रुपये सर्व चुकते द्यावे मुदतीचे आंत येऊन निकाल न केल्यास सेंटलमेंट रुळाप्रमाणें ज्याहागीरीचे नात्याणी खात्याच वहितीचा सेतांचे वरचा हक्क नाहींसा समजून सेतें त्याचे नावावरची कमी करून जो कोणी दुसरा मनुष्य साऱ्याची रकम कबूल करून देईल त्याचे नांवणीं सेतांचे खाते होऊन सेत त्याचे ताब्यांत दिले जातील पुढें खातेदार व वहितकार अगर गाहाणदार याचा कोणतेही ना यानें याचा मालकीचा हक्क मानिता येणार नाहीं. कळावें. तारीख १५ मार्च सन १८९६ इसवी.

[ सही ] गदाधर श्रीधर ज्याहागीरदार मौंजे आडगांव ज्याहागिरदार तालुके अकोट मुखत्यार भगवंत विठ्ठल देशपांडे आडगांव.

## नीति शास्त्राचें मुख्य बीज व तदनुरोधानें आपल्या समाजाचें परीक्षण.

( मागील अंकावरून पुढें )

देशी कपडा वापरावा किंवा नाहीं या संबंधानें जीं कचित निरनिराळीं मतें दिसून येतात तीं तरी याच कारणामुळें. केवळ देशी कपडाच वापरावा असें ज्यांचें ह्मणणें त्यांच्या मनांत परदेशी कपडा वापरल्या पासून होणारें देशीं कलाकौशल्याचें नुकसान टाळावें असें असतें. व ज्यांचें ह्मणणें केवळ देशीच कपडा वापरूं नये असें आहे त्यांचा विचार केवळ देशी कपडा वापरल्यापासून बंद होणारा अनियंत्रित व्यापार टाळावा असें असतें. एंकून कोणत्याही गोष्टी संबंधानें मतभेद दिसतो तो वरील कारणामुळेंच ह्मणजे कोणतीही बाधक दोन कृत्यें मज समोर येऊन उभीं राहिलीं ह्मणजे त्या पैकीं एक श्रेष्ठ वर्तें करणें कर्तव्य आहे व दुसरें कनिष्ठ व तें टाळणें कर्तव्य होय असा जो त्या कृत्यामध्यें फरक दिसून येतो त्याच्याशी व माझ्याशी कार्यकारणत्वाचा कांहीं एक संबंध नाहीं तर तो फरक त्या कृत्यांतच दिसून येतो. आतां हा जो श्रेष्ठकनिष्ठ वाचा भास होऊन त्याप्रमाणें करणें मला कर्तव्य वाटतें तें कसें हें पाहिलें पाहिजे. बाधक दोन कृत्या पैकीं श्रेष्ठ कृत्य केल्यास धन्यता मला वाटते व कनिष्ठ कृत्य केल्यास मला वाईट वाटतें व असें वाटतें कीं या माझ्या चुकी बद्दल खरोखरीच मी शिक्षेस पात्र आहें; ह्मणजे श्रेष्ठ कृत्य करणें व कनिष्ठ कृत्य टाळणें हें मला कोणी तरी सांगते आहे व याप्रमाणें करणें किंवा न करणें याबद्दल मी जबाबदार आहे. जबाबदार कोणास हें आतां पाहिलें पाहिजे. ही गोष्ट वर खास कीं ज्याला मी जबाबदार आहे तो मजपेक्षां श्रेष्ठ असला पाहिजे. तो लेस्ली स्टीफनच्या ह्मणण्या प्रमाणें समाज आहे असें जर ह्मटलें, म्हणजे अमुक गोष्ट कर व अमुक गोष्ट करू नको अशी समजाची मजवर जोरी आहे असें जर कल्पिलें तर तें संभवत नाहीं कारण ज्या गोष्टींत समाजाचा कांहीं एक संबंध नाहीं अशा गोष्टींत सुद्धां कांहीं गोष्टी करण्याची जबाबदारी मला टत असते. जर पेलेच्या म्हण याप्रमाणें स्वर्ग व नरक यांच्यामुळें चांगलीं कृत्यें आपण करतो व वाईट कृत्यें टाळतो असें गृहीत धेतलें तर तें सुद्धां बरोबर दिसत नाहीं कारण अंतःकरणाची प्रवृत्ती तशी वळल्या खेरीज स्वर्गसुखाची लालूच किंवा नरक यातनेचा धाक यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं. जर चोराला वाटेल कीं माझ्या चोरीबद्दल मला मिळालेली शिक्षा रास्त आहे तरच तो चोरी सोडील. नाहीं तर कधीं सोडणार नाहीं. तेव्हां शिक्षा व बक्षीस हीं अंतःकरण प्रवृत्ती शिवाय व्यर्थ आहेत. जर स्पेन्सरच्या म्हणण्या प्रमाणें आयुष्याची दोरी लांबविण्याची जबाबदारी आहे असें ह्मटलें तर आपणास अशी उदाहरणें शेंकडों दिसून येतात कीं त्या प्रसंगाला आयुष्याची दोरी तोडणें हेंच न्याय असतें, म्हणून ही ही उपपत्ती योग्य नाहीं. जर हॉब्सच्या ह्मणण्याप्रमाणें आपल्या सुखा करतां ह्मणून अमूक गोष्ट करणें किंवा न करणें जबाबदारीचें आहे असें ह्मटलें तर तें ही ठीक नाहीं. कारण तसें असल्यास एकच कृत्य एकास सुखकारक व दुसऱ्यास दुःखकारक वाटतें, ह्मणून त्या कृत्याची नैतिक योग्यता मनुष्याच्या खुषीवर अवलंबून राहते. पण अशी गोष्ट नसून नैतिक योग्यता ही कृत्याच्या अंगभूतच असने हें आपण वर पाहिलेंच आहे. यावरून सुखा करितां करावयाच्या कृत्याशीं व नैतिक दृष्ट्या योग्य अशा कृत्याशी कांहीं एक संबंध नाहीं, हें उघड दिसतें. येणें प्रमाणें सत्कृत्य करण्याची व असत्कृत्य टाळण्याची जबाबदारी प्रत्येक मनुष्यास वाटते ती वर सांगितलेल्या कोणत्याही गोष्टी पासून उत्पन्न झालेली नसून ती केवळ सर्वांच्या अंतःकरणप्रवृतीशी ज्याचा निकट संबंध, व जो सर्वांचे साग्खें नियमन करून त्यांना यथायोग्य शासन किंवा पालन करणारा, सर्वांतर्यामी जो परमात्मा त्या पासून उत्पन्न झालेली आहे चांगलें कृत्य केल्यास मी ईश्वराची आज्ञा पाळली व वाईट कृत्य केल्यास मी त्याची आज्ञा मोडून त्याच्या शिक्षेस पात्र झालो असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. व असें असतें ओ भगवंताची जी अर्जुनास उक्ती कीं ' ममैवांशो जीव लोके ' ह्मणजे मी अंशरूपानें सर्व जगतांत वास करतो, यावरून स्पष्ट होतें त्या सर्व साक्षी व शुद्ध परमात्म्यानें आपल्या मनोद्वारानें जी आपणास सदसद्विवेकाची दिशा घालून दिली आहे ती प्रमाणें वागणें आपलें कर्तव्य होय, व ती दिशा उल्लंघिल्यास आपणास त्याला जबाब द्यावा लागेल असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें.

एथ पर्यंत परस्परास बाधक अशा दोनच कृत्या संबंधाचें विवेचन झालें. परंतु मनुष्याचा संबंध जसजसा स्वतःशीं, कुटुंबाशीं, समाजाशीं व देशाशी वाढत जातो तसतशीं त्याला अनेक बाधक कृत्यें करावीं लागतात; व त्यापैकीं प्रत्येक ठिकाणीं वर सांगितलेला प्रकार घडून येतो. या प्रमाणें त्या सर्व कृत्यांचीं परस्परांशीं तुलना होऊन त्याच्या नैतिक योग्यतेच्या मानानें एक त्यांचा क्रम बनतो. या क्रमामध्यें एकच कृत्य त्याच्या पेक्षां हलक्या कृत्यांशीं तुलना केलीं असतां उच्च ठरतें; व त्याच्यापेक्षां उच्च कृत्याशीं तुलना केलीं असतां हलकें ठरतें. अशा तऱ्हेचा क्रम कृत्यांच्या नैतिक योग्यतेच्या मानानें बनला असल्या कारणानें तो सर्व मनुष्यांत सारखाच असतो. हा क्रम सर्वांचें ठिकाणीं पूर्ण असूं शकत नाहीं. तर प्रत्येकाचे ठिकाणीं हा कमी जास्त प्रमाणानें प्रगल्भ दशेस आलेला असतो तथापि सर्व मनुष्याचें ठिकाणीं हा क्रम सारखाच असल्या कारणानें केवळ उद्बोधकावरूनच श्रेष्ठ व अपरिचित अशा कार्यांची सुद्धां नैतिक योग्यता त्यांना कळून येते. लढाईत सांपडलेल्या लोकांस क्रूरतेनें वागविणाऱ्या जंगली लोकांस दयाळू सरदार भेटून त्यांनीं कैद्यास क्रूरतेनें न वागवितां सौम्यतेनें वागविलें असें त्यांनां दिसलें ह्मणजे लागलींच त्या सरदारासंबंधानें त्यांच्या मनांत पूज्यबुद्धी उत्पन्न होते छत्रपती श्री शिवाजी महाराजा संबंधानें जी मावळे लोकांच्या मनांत पूज्य बुद्धी होती ती याच कारणामुळें, हे आपणास इतिहासावरून स्व-

स दिसतें या सर्वांचें बीज हेंच कीं या सर्व कृत्यांची योग्यता सर्व मनुष्याचे ठिकाणीं सारखीच आहे. मात्र त्याचें ज्ञान सर्वांचे ठिकाणीं सारखें प्रगल्भ नसतें. तथापि तें ज्ञान होण्याचें साधन मात्र सर्वास एकच असतें. त्या साधनासच कवींनीं अंतःकरण प्रवृत्ती, मन, इत्यादि निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. या अंतःकरण प्रवृत्तीचा अवलंब केल्यानेंच आपल्या ठिकाणीं श्रेष्ठ योग्यतेची कृत्यें करणाऱ्या संबंधानें पूज्य बुद्धी उत्पन्न होते, व आपण त्याच्या आचरणाचें अनुकरण करावयास प्रवृत्त होतो. अशा तऱ्हेनें आपलें वर्तन अव्याहत चालल्यास आपलें पाऊल आचरणांत नेहमीं पुढें पडत जातें. पण अशा तऱ्हेनें वर्तन अव्याहत चालण्यास आपल्या स्वभावच एक जबर अडथळा आहे. तो कोणता ह्मणाल तर स्वसुखाभिलाष. मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्ती पासून होणाऱ्या सुखाची एकदां त्यास चटक लागली ह्मणजे त्यास तेंच तेंच कार्य करावेंसें वाटतें व त्या सुखप्राप्तीच्या अनेक युक्त्या शोधून काढण्यांत त्यांनां आनंद वाटतो. डाक्तर साहेबांनीं किंवा वकील साहेबांनीं प्रथमतः निरपेक्षबुद्धीनें एकदा झटून काम केलें व त्याबद्दल त्यांची हल्लीच्या रीतिरिवाजा प्रमाणें मुबलक स्तुती झाली कीं लागलीच त्यांना कृतकृत्यता वाटते व नंतर त्यांची खटपट केवळ स्वसुखप्राप्ती करतांच चालूं असावयाची.

या स्वसुखाभिलाषाची दृष्टी कृत्यांच्या परिणामाकडेन असते. ज्या कृत्यापासून पुष्कळ व तावडतोब सुख प्राप्त होईल तें कृत्य चांगलें व ज्या कृत्यापासून तसें सुख प्राप्त न होता उलट दुःख प्राप्त होईल तें कृत्य वाईट. अशा रीतीनें ही सर्व कृत्यांचा एक क्रम बनतोच. हा क्रम ईश्वरनिर्मित नसून मनुष्यांनीं बनविलेला असतो. व हा क्रम सर्वांचे ठिकाणीं सारखा असूं शकत नाहीं. कारण प्रत्येक प्राणिमात्रास एकाच गोष्टीपासून निरनिराळ्या प्रमाणानें सुख उत्पन्न होत असल्यामुळें त्या कृत्याची योग्यता सर्वांच्या मतें निरनिराळी ठरेल. व या मुळेंच त्याच्या ठिकाणीं असलेला सुखोत्पादनाच्या योग्यतेचा कृत्याचा क्रम सारखा असणें अशक्य आहे. असें आहे ह्मणूनच कवींनींहीं 'भिन्न रुचिर्हि लोक' असें ह्मटलें आहे. अशा तऱ्हेनें कृत्याच्या स्वसुखसंपादनाच्या योग्यतेनें बनलेल्या क्रमा प्रमाणेंच केवळ वागणारा मनुष्य नेहमी आपल्याच सुखाकरतां खटपट करीत असतो व त्याला परोपकार अगदीं माहीत नसतो, असें ह्मटल्यास चालेल. अशा मनुष्यांत व मिल्टन कवीनें आपल्या महाकाव्यांत वाणलेल्या सैतानाच्या स्वभावांत अगदींच फरक राहत नाहीं, व अशांनांच आपल्या भर्तृ हरीनें मानव राक्षस ह्मणून ह्मटलें आहे अशा भयंकर व राक्षसी स्थितीतून सुटण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं कृत्यांच्या नैतिक यो[illegible] जास्त लक्ष देऊन स्वसुखाभिला[illegible] असें करणें फारसें कठी[illegible]त्येक मनुष्याचे ठि[illegible]ति योग्यता सुचविणार[illegible]दनयोग्यता सुचविणारा, [illegible] असल्यामुळें, एकाच कृ[illegible]होंच्या मानानें एकदम [illegible]नैतिक योग्यतेकडे स जास्त लक्ष देऊन त्याप्रमाणें करण्याचा निर्धार केला ह्मणजे मनुष्य स्वसुखाभिलाषाच्या तडाख्यांतून थोडा थोडा करतां करतां अजीबात सुटतो, व नंतर तो 'तान्धांति परकार्यं' या उपपत्ती प्रमाणेंच केवळ साधु बनतो. असें होण्यास मनाचा फार दृढ निर्धार लागतो व ह्मणून प्रत्येकास साधू होणें शक्य नाहीं. तथापि मनाचा कांहींसा निर्धार करून नैतिक योग्यते प्रमाणें कृत्यें करण्याचा निश्चय केला तर आपली सन्मार्गाकडेस प्रवृती वाढत जाऊन आपलें आचरण शुद्ध व पवित्र होत जातें यांत बिलकुल संदेह नाहीं.

[ पुढें चालेल ]

# वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ९ शके १८१८

उमरावतीस जशी 'वऱ्हाड सार्वजनिक सभा' आहे त्याप्रमाणें मुंबईत 'प्रेसिडेन्सी आसोशिएशन' नांवाची प्रख्यात लोकसंस्था आहे. वऱ्हाडची सभा असावी तितका जोरदार, स्पष्ट वक्त्री व वजनदार नाहीं. मुंबईच्या सभेंत विद्वान, निस्पृह व सार्वजनिक लोक पुष्कळ आहेत; सभा जुनी अनुभवी, स्वतंत्र आहे, आणि तिची कार्यमाला बहु व्यापक दीर्घ परिवाची व अत्यंत लोकोपयोगी आहे. वऱ्हाडच्यां सभेनें मुंबईच्या किंवा पुण्याच्या सभेचा कित्ता गिरवावा व तिचे इतिहास वाचावे एवढेंच आमचें आग्रहपूर्वक सुचविणें आहे.

उपयुक्त विषयावर छोटे छोटे निबंध प्रकाशित करावे, सरकारचीं अभिवचनें व महत्वाचे ठराव जाहिर करावे निरनिराळ्या सभांतील गोष्टी पुस्तकरूपानें निरंतर लोकदृष्टी समोर मांडाव्या इत्यादि कार्यांचा उपक्रम मुंबईच्या सार्वजनिक प्रेसिडेन्सी आसोशिएशनें चालविला आहे. या सभेची अनेक पुस्तकें वेळोवेळ आह्मांकडे यैत गेलीं तसतशी माहिती आह्मी आमच्या वचकांस दिलीच आहे. सरकारास महत्वाच्या विषयावर अर्ज करावे, लोकांचीं दुःखें विदित करावीं, सार्वजनिक कामांत घडत असलेले अन्याय उजेडांत आणावे या व अशा गोष्टी वरील मंडळीनें फार उत्तम प्रकारें केल्या आहेत. या मंडळीचा सरकारदरबारांत मान मोठा आहे आणि उत्तरोत्तर ही मंडळी लोकसेवा फार उत्कृष्ठ बजावूं लागली आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

---

मुंबईचे स्माल काज कोडताचे मुख्य जज्ज मि० चिटी हे रजेवर गेल्यामुळें दुसऱ्या नंबरच्या जज्जाची जागा रिकामी झाली होती. त्या जागेवर मि० म्याकलिआड या बारिस्टरांची नेमणूक मुंबई सरकारनें केली आहे हीं नेमणूक अन्यायाची आहे असें गाऱ्हाणें स्पष्टपणें नामदार मेथ आदिकरून गृहस्थानीं प्रेसिडेन्सी आसोशिएशनच्या मार्फतीनें सरकारापाशीं केलें आहे. वरील जागेस अवश्य लागणारा दहा वर्षांच्या वकिलीचा अनुभव या गृहस्थांस नाहीं, मराठी किंवा गुजराथी भाषा अवगत नाहीं, कायद्याचें ज्ञानभांडार यथातथाच असावें असें एल एल बी च्या परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचें मत आहे. विद्यमान जज्यांच्या बढती विषयीं आशाच खुंटली, त्यांस उत्तम कामगिरीचा मोबदला न मिळता त्यांची मोठी निराशा झाली; आणि मि० म्याकलिआड पेक्षां विद्वत्तेनें, अनुभवानें व पांडित्यानें अधिक अशा बहुत नेटिवांचा पाणउतारा व हक्काची पायमल्ली झाली. ही नेमणूक स्टेट सेक्रेटरीच्या परवानगीनें होतें असते तेव्हां अशा अन्यायाच्या गोष्टीस त्या मुत्सद्याचा रुकार मिळाला नसावा असें प्रथम वाटतें. पण लार्ड हामिल्टन यांच्या गत कृत्यावरून या गोष्टीविषयींही कांहीं नवल वाटण्याचें कारण नाहीं.

मुंबईस हें एकच उदाहरण आहे असें नाहीं अशी नेटिवांची हेलना व जातबंधूची प्रतिष्ठा सर्व देशभर वारंवार सरकार करीत असते. वरील गोष्ट एक मासल्यासाठीं किंवा नमुन्यासाठीं ह्मणून सांगितली आहे. महाराणी साहेबांनीं जाहिरनाम्यांत जातिभेद मानण्याविषयीं स्पष्टपणें निषेध करावा पण त्यांच्या प्रधान मंडळीनें निषेधाला हरताळ लावून विधिरूप ह्मणून द्वैतभाव वाढवावा. राज्यें लोभानें व प्रेमानें बनतात. पण आपपरभाव, मत्सर, व क्षुद्रदृष्टी हीं कारभारांत नांदू लागलीं तर तींच राज्यें लयास जातात असाच इतिहास मोठमोठ्या राष्ट्रांचा आहे तेव्हां ब्रिटिश राज्याच्या चिरकालीनपणाला काय गोष्ट केली पाहिजे हें राज्यकर्त्यास निराळें शिकविणें नको.

हल्लीं वऱ्हाडांत ज्या नेमणूका होत आहेत त्यांत पंडित सुरज नारायणसारखे जुने असिस्टंट कमिशनर हक्कानें प्रथम असून मागें पडत चालले आहेत याचें कारण मुंबईच्यावरील नेमणूकी प्रमाणेंच आहे. समता, न्यायबुद्धि व गुणग्रहण या गोष्टि जर जागृत होतील. तरच प्रजाजन आनंदी व सुखी होईल मार्ग दर्शविणें आमचें काम आहे पण तो मार्ग चालणें सरकारचें काम आहे.

---

अर्जनवीस लोकांसंबंधानें नवीन नियम करण्याचा विचार मि. आवर्ड, जुडीशिअल कमिशनर यांचा चालूं आहे. या नियमाचा मसूदा गेल्या १९ तारखेच्या रेसिडेन्सी आरडस मध्यें प्रसिद्ध झाला आहे. जुडिशिअल कमिशनर एप्रिल १ ले तारखेस किंवा नंतर त्याचा विचार करून अलिशान रेसिडेंट यांच्या संमती साठीं पुढें धाडणार आहेत. या नियमाविषयीं मुख्य मुख्य गोष्टी ध्यानांत ठेवण्या सारख्या त्या अशाः—

सध्याच्या अर्जनवीसांनीं डेपुटी कमिशनरकडे अर्ज करून परवाने घ्यावेत.

नवा होतकरूं अर्जनवीस वयानें २० वर्षांपेक्षां अधीक, ९ वी इयत्ता पसार झालेला व चांगल्या वर्तणुकीचा असला पाहिजे. आणि अशा उमेदवारांचीं दरसाल सप्तेम्बरांत ५ रुपये फी घेऊन परीक्षा घेतली जाईल. फिर्यादीचा नमुना, फौजदारींतला अर्ज अपिलाचा अर्ज किंवा किरकोळ अर्ज लिहिता येतो किंवा नाहीं या संबंधानें परीक्षा होईल; आणि तेवढ्या पूर्ती सर्व कायद्याची माहिती पाहिजे.

अर्ज साध्या व सोप्या भाषेंत असावा व हकीकती पेक्षां निराळा वादविवाद नसावा. प्रत्येक अर्जा खालीं प्रतिज्ञालेख पाहिजे कीं अर्जदाराच्या ह्मणण्या प्रमाणें लिहिला असून तो त्यास नीट समजविला आहे अर्जनवीसानें खुद्द जातीनें अर्ज लिहिला पाहिजे आणि प्रत्येक अर्ज आपल्या नोंदबुकांत नोंदून त्यावर घेतलेली फी नमूद करावी. पक्षकारांच्या दरम्यान कोर्ट अर्जनवीसाच्या लिखाईचा पैसा प्रत्येक फिर्याद अर्जा सारख्यास १ रुपया व किरकोळीस चार आणे प्रमाणें कोर्ट खर्च ह्मणून देववील.

योग्य वर्तन न ठेवणाऱ्यांस काढून टाकण्यांत येईल.

वरील नियमांत अर्जनवीसांची परीक्षा मराठींत किंवा इंग्रजींत घ्यावयाची या बद्दल कोठें खुलासा नाहीं. तो जरूर पाहिजे आहे.

---

वडनेऱ्यास धर्मार्थ दवाखाना शेट जहानगीर हारमसजी मोडी यांनीं घातल्या विषयीं सर्व जणांस महशूरच आहे. या उदार, दयाळू व परोपकारी पुरुषानें मोठ्या खर्चानें 'कावसजी दिनशा एडनवाला' नांवानें रोग्यांचें वसतिगृह बांधलें असून तें त्या दवाखान्याला जोडलें आहे. गेल्या १४ वे तारखेस मि. बुलक साहेब यांच्या हातून त्या वसतिगृहाचा प्रारंभ-समारंभ झाला मि. निकोलेट यांनीं त्या दानशूर गृहस्थाची थोरवी सांगून डाक्टर शिवरतन वैजनाथ यांची प्रशंसा केली मि. निकोलेट, रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे आदिकरून थोर गृहस्थांनीं या दवाखान्याच्या स्थापकांस चांगली मदत केल्या विषयीं सांगण्यांत आलें. नंतर मि० बुलक साहेब यांनीं तें वसतिगृह खुलें केलें. ते ह्मणाले कीं माझे वडील बंधु राबर्ट यांच्या हातून या दवाखान्याचा पाया घालण्यांत आला व माझे मित्र कर्नल मेकंझी यांच्या हातून याचा प्रारंभ झाला तेव्हां हें रोग्यांचें वसतिगृह सुरू करितांना मला मोठा आनंद वाटतो. शिवाय मि. मोडी यांच्या या उदार व लोकोपयोगी धर्मकृत्या बद्दल त्यांचें अभिनंदन करणें यासारखें आनंदकारक काम करण्यास कोण सादर राहणार नाहीं बरें! नंतर मि. निकोलेट यांची स्तुती व नंतर मि. निकोलेट यांची स्तुती व तारीफ करून त्या वसतिगृहाचा प्रारंभ केला.

---

वऱ्हांड शाळाखात्यांत वयाचें सरक्युलर ह्मणून एक नियम अलिकडे अमलांत आहे. त्या सरक्युलरचा मतलब असा कीं अमूक एका इयत्तेला अमूक एका ठरीव वयापेक्षां अधीक प्रौढ वयाचा विद्यार्थी घेतला जाऊं नये. हें सरक्युलर चांगलें नाहीं ह्मणून गेलीं दोन वर्षे ओरड चालूंच आहे नामदार बळवंतराव भुसकुटे यांनीं या प्रकरणा संबंधानें कायदे कौंसिलांत प्रश्न विचारला होता. उत्तर समाधानकारक मिळालें नाहीं ह्मणजे अद्याप हिंदुस्थान सरकारास या प्रकरणांत चांगलीशी माहितीच नाहीं अ

प्रसिद्ध केलें.

सा जबाब मिळाला तथापि आनंदाची गो ष्ट कीं हा महत्वाचा विषय सरकार समोर आला आहे. नामदार बळवंतराव भुसकुटे यांनीं यथाशक्ति शेजारधर्मा प्रमाणें या प्रांताची लोकसेवा आरंभिली आहे या विषयीं आह्मी त्यांचे आभारी आहों.

## The Berar Samachar

**MONDAY MARCH ,23 1896**

It is a hopeful sign of the time that the finance minister predicts for 1896-7, not only a financial equili bruim but an appreciable surplus of Rs. 46,30,000. The budget is laid before the Imperial Legislative Council and on Thursday next it will be taken into consideration. The out-look is pleasant and we are glad to see Sir James Westland assure us of the restoration of the Famine Insurance grant in spite of the probable loss of 50,00,000 due to the reduction of the import-duties. Sir James says that our revenues are advancing, our expenditure is well in band and the rate of exchange continues to be steady. Expansion of duties was the only resource with which the Govt of India could tide over the last transition period. We have seen no significant retrenchment or curtailment of expenditure Finaces are no doubt advancing but the burden of taxation is immensely crushing and has reached the greatest possible tension. That the finances are just promising to be steady will be gathered from the hopeful account of a growing revenue which we quote below from the appropriation report on the accounts for 1894-95

( The figures are tens of rupees (Rx. 1—Rs. 10). with the last two figuret cut off )

"The items which mainly contributed to this favourable result were (1) an improvement of 930,2 in the Opium revenue, due partly to better prices having been realised at the sales of Bengal opium and partly to the levy of enhanced pass fees on increased exportations of Malwa opium, (2) a saving of 639,2 in the estimated expenditure under Opium, due mostly to short payments to cultivators owing to failure of crops, (3) an improvement of 982,0 in the Customs revenue due partly to the revenue under the Tariff Act of March 1894 having exceeded anticipations, and partly to the reimposition of cotton duties by the Tariff Act of Decmber 1894, (4) an improvement of 210,1 in Excise revenue, of which the Imperial share was 160,4 (5) an improvement of 792,4 in the net earnings of Imperial State Railways counterbalanced by a falling off 395,2 in those of Guaranteed Railways, [6] a saving of 233,3 in the net estimated military expenditure of the year notwithstanding the extra expenditure due to the Waziristan Boundary Commission and Field Force and the Chitral Expedition and an increase in the pay of British Troops in consequence of a reduction in the rate of Exchange at which they were paid, and (7) an improvement of 385,4 under other heads which was counterbalanced to the extent of 293,5 by increased charges on account of Interest on Debt due to the anticipation interest and brokerage paid on the conversion into 3 and half per cent. rupee debt. The actual Revenue and Expenditure of the year under the different groups are compared in detail in the following paragraphs with the actuals of the previous year and the Budget Estimate."

But we are afraid that the Indian Govt has acted unwisely in reducing the Import duties. The chances are that we endanger thereby the safety of the Indian exchequer. Our expenditure is fast growing and the financial estimates leave no margin for emergencies beyond control but within the reach of our calculation. We have practically no reserve-fund to meet a number of contingencies and the equilibruim in our finances is so unstable that is may be upset in no time. The royal Commission will, we hope, teach a lesson that the present financial policy of Iddia is very objectionable and requires a remodelling on the principle of India for India alone.

The protest which the Bombay Presidency Association has submitted in connection with the appointment of Mr. Macleod to the 2nd judgship of the Bombay Small Cause Courts reminds us of an evil principle that sacrifices the interests for the Natives to advance those of the Anglo Indians. It is a despot's policy to hold up India as a land of the benefits of the Anglo Indian sojourners. It is even suicidal in so far as it embitters the relations between the rulers and the ruled We could request our Anglo Indian friends to read a useful sermon in the following para we cull below from the eloquest minute of Sir Charles Trevelyan on Education :—

"The change will thus be peacefully and gradually effected; there will be no struggle, no mutual exasperation; the natives will have independence, after first learning how to make a good use of it we shall exchange profitable subjects for still more profitable allies. The present administrative connection benefits families, but a strict commercial union between the first manufacturing and the first producing country in the world, would be a solid foundation of strength and prosperity to our whole nation. If this course be adopted, there will, properly speaking, be no separation. A precarious and temporary relation will almost imperceptibly pass into another far more durable and beneficial. Trained by us to happiness and independence, and endowed with our learning and our political institutions, India will remain the proudest monument of British benevolence; and we shall long continue to reap, in the affectionate attachment of the people, and in a great commercial intercourse with their splendid country, the fruit of that liberal and enlightened policy which suggested to us this line of conduct."

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान १०२ अंशापर्यंत वाढलें आहे. सौम्य गोंवराचा आजार उद्भवला असून अन्य रोगराई विशेष ह्मणण्यासारखी नाहीं. पाण्याच्या कमताईबद्दल गांवोगांवची ओरड एकूं येते.

मि. सिंम्सन यांनीं डिपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज घेऊन नव्या कार्यास मोठ्या उल्हासानें सुरुवात केली आहे.

मि. एस. एच. किंग एक्स्ट्रा आसि. कमिशनर, उमरावती यांस माजिस्ट्रेट वर्ग १ चा आधिकार व दिवाणी १०००रुपये पर्यंतचे दावे चालविण्याचा अधिकार देण्यांत आले आहे.

रा० रा० काशिनाथ श्रीराम जटार अव्वाची, बुलढाणा यांस माजिस्ट्रेट वर्ग १ चा अधिकार दिला आहे.

मि० आरडाघ, परसनल असिस्टंट-इनस्पेक्टर जनरल यांस गं.या १९ वे तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

वऱ्हाडांत एकंदर २२ हायकोर्ट वकील व नंबर २ च्या फार्मांतील ९९ वकील मिळून १११ वकील सध्यां पटावर दाखल आहेत.

मि० हेअर साहेब यांस स्टेशनावर मुनिसिपालिटी तर्फे पुष्पमालार्पण करण्यांत आलें तेव्हां मेसर्स मिरझा आबासंबेग व सेराबजी यांनीं साहेब बहादूरांचे सद्गुण व परिश्रम सांगून आभार मानले.

मे० हेअर साहेब हे गेल्या बुधवारच्या गाडीनें विलायतच्या सफरीसाठीं आकोल्याहून रवाना झाले. त्यांच्या सन्मानार्थ पुष्कळ गृहस्थ स्टेशनवर त्यांचा निरोप घेण्यासाठीं गेले होते. घरोघर मंडळी परततांना परस्परांशीं ह्मणत कीं हेअर साहेबासारखा असा चांगला अधिकारी विरळा आढळेल.

अकोल्यास नळाच्या पाण्याची कमताई आहे आणि जें थोडें पाणी नळानें सोडतात तेंही नियमितपणानें व पद्धतशीर सोडलें जात नाहीं ह्मणन लोकांचे फार हाल होतात ही गैरसोय मि० वाचा हे लवकर दूर करितील अशी आशा आहे.

रा. रा. गणपुले बी. ए, नांवाचे गृहस्थास अकोला हायस्कुलांत असि० मास्तर नेमिल्याचें कळतें.

वाशिम जिल्हा बोर्डानें गेल्या १० वे तारखेस ठराव केला कीं तालुका बोर्डाचे सेक्रेटरीस कामें कमी असल्यामुळें दरमहा २० रुपये पगार होता तो या पुढें १२ रुपये प्रमाणें देण्यांत यावा. ठराव फारच चमत्कारिक.

रा. रा. कृष्णराव रामचंद्र काळे बी. ए. यांस अकोल्याहून बदलून उमरावती हायस्कूल मध्यें नेमलें.

मि० महमद शाबासखान तहशिलदार खामगांव हे आजपासून दोन महिन्याच्या हक्काच्या रजेमर जात आहेत. आणि त्या रजेत तेथील नायब तहशिलदार रा. रा. विठ्ठल सदाशिव करकरे यांस आर्किंग तहसदार नेमिलें.

## सुहृत्समाजाचा पांचवा वार्षिक समारंभ

सालाबाद प्रमाणें या समाजाचा पांचवा वार्षिक समारंभ तारिख २६ मार्च १८९६ रोज गुरुवारला सुरूं होऊन नेहमींच्या वहिवाटी प्रमाणें चार दिवस चालूं राहील.

ह्या प्रसंगीं ज्या विद्वान गृहस्थांनीं कांहीं महत्वाचे विषयांवर व्याख्यानें देण्याचें कबूल केलें आहे त्यांपैकीं कांहीं गृहस्थांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

रा० रा० प्र० ना० जोग बी० ए० एल् एल् बी.

रा० रा० ब० रा० अनगल बी० ए० एल् एल् बी.

रा० रा० कढी बी० ए० हेडमास्तर न्यू हायस्कूल.

रा० रा० करंदीकर सेक्रेटरी सा० स० वऱ्हाड.

रा० रा० आण्णा अजनसिंगीकर देशपांडे

इ० इ० इ०

व्याख्यानें उमरावती शहर लायब्ररीच्या इमारतींत होतील. सर्वांस येण्याची मोकळीक आहे.

उमरावती ता० १७ मार्च सन १८९६ इ० } र. बा. देवभानकर प्रेसिडेंट सुहृत्समाज उमरावती.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि. कीं. मुा. नंबर ३ सन १८९६

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टात.

नांव—झुंबरलाल

बापाचे नांव—बहीरजी सिरमाळी ब्राह्मण

राहणार—कारंजा तालुके एलिचपूर

जिल्हा—एलिचपूर. यांस मयत

रामरतन बापाचे नांव बहिरजी सीरमाळी ब्राह्मण राहणार कारंजा तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीने द्वारें कळविण्यात येत आहे कीं, त्यांनीं तारीख १० माहे एप्रिल सन १८९६ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात अगर स्वारी जेथें असल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकिकत दाखल करावी.

तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९६ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur District

डिस्ट्रिक्ट ज्यड्ज.

नोटीस.

मेहेरबान गुलाम रसूल वल्द सदरोद्दीन राहणार अटाळी तालुके खामगांव यांस.

नोटीस देणार राउतमल रामभजन दुकान अठाळी नोटीसीनें कळवितो कीं दस्ताऐवजाचे करारा प्रमाणें सालबंद्या दिल्या नाहींत. आजपासून आठ दिवसाचें आंत दोन सालबंद्या द्याव्या, न दिल्यास शरयाती प्रमाणें कोर्टात [illegible] करून शेत आमचे ताब्यांत घेऊ. ह्मणून दिल्ही नोटीस सही तारीख २१ माहे मार्च सन १८९६ इसवी.

(सही) राउतमल रामभजन
दुकान अठाळी तालुके
खामगांव जि० अकोला
दस्तुर खुद्द

## वर्तमानसार.

श्रावणकोरच्या दक्षिणभागांत एका शूर स्त्रीनें दाखविलेल्या प्रसंगावधानाची हकीकत हल्लीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे ती वाचनीय आहे. एक शुद्र जातींचे गृहस्थ आपल्या स्त्रीसह एका गल्लींतून जात असतां रस्त्यानें चाललेल्या एका मुसलमानाची दृष्टी तिजकडे जाऊन त्याला काम वासनेनें घेरलें; परंतु तिचा नवरा बरोबर असल्यामुळें त्याचा इलाज चालेना म्हणून तो त्याचे मागून बराच दूर गेला व दुसरें कोणी मनुष्य जवळपास नाहीं असें पाहून त्यानें कोयत्यानें तिच्या दादाल्याचा शिरच्छेद करून आपली कामवासना तृप्त करण्याचा प्रयत्न चालविला. ती अबला त्यावेळीं केवढया तरी दारूण प्रसंगांत सांपडली होती, परंतु ती मुळमुळ रडत बसली नाहीं. कशी तरी वेळ मारून नेऊन अब्रूरक्षण केली पाहिजे, असा विचार तिणें मनांत आणिला आणि "आपली इच्छा मला मान्य आहे, मलाही तो नवरा नकोसा झालेला होता. मेला ते बरेंच झालें. आतां आपण उभयतां आनंदानें राहूं; पण हे रक्तानें माखलेले कपडे अगोदर धुवुन साफ करा: म्हणजे कोणी संशय घेणार नाहीं." अशी सल्ला तिनें त्या मारेक्यास दिली व शजारी असलेल्या तलावावर त्याला नेलें. तेथें तो पाण्यांत उतरून स्नान करावयास लागला, अशी संधी राखून तिणें आपलें शौर्य प्रकट केलें आणि त्याच कोयत्यानें खां साहेबांचें मुंडकें उडवुन कृतकर्माबद्दल त्याला कठस्थान घातलें! आणि रक्तानें भरलेल्या त्या शस्त्रासह पोलीस ठाण्यांत जाऊन तिणें झालेली हकीकत निवेदन केली. पोलिसानें तिला पकडून खटला केला सेशन कोर्टानें तिला फाशीची शिक्षा दिली होती; परंतु मद्रास हायकोर्टानें त्या वीरपत्नीच्या प्रसंगावधानाची तारीफ केली व तिला दोष निर्मुक्त करून दिली! सदर्हू अबलेच्या शूरत्वाची व मद्रास हायकोर्टानें तिला दिलेल्या न्यायाची प्रशंसा करावी तितकी खरोखरच थोडी होईल.

इटालीची फौज मोठ्या नेटानें काम करीत असत असतांही इटालीच्या फौजेच्या एका तुकडीचा फडशा झाला.

अबिसीनियाच्या राजाची एक लाख फौज होती. हा जय मिळविल्यावर अबिसीनियाची फौज कांहीं पुढें सरकली नाहीं.

इटालीच्या फौजेची छावणी कसाला येथें आहे व तेथें राहाणें भयप्रद असल्यास तेथून माघार घ्या असा इटालीच्या फौजेस हुकूम झाला आहे.

अडिग्रट येथील इटाली सरदार आपल्या ... स लिहितो कीं, वेळ फार कठीण आणि अडिग्राट ठिकाणाच्या भोवती ... मोठा भरणा असल्यामुळ तें ... ण सोडून बाहेर पडणें कठीण झालें आहे. आमच्या जवळ रक्षणार्थ चार हजार लोक असून एक महिन्याची अन्नसामोग्री आहे.

कसला येथें इटालीचे दोन हजार लोक असून त्याच्यावर शत्रूची दरवेशी फौज चाल करीत आहे मदतीस येणाऱ्या दोन हजार फौजेस शत्रूकडून अडथळा होण्याची भीती आहे.

अबीसिनियावरच्या आपल्या फौजेस परत आणून अधरी ठिकाणाची आशा सोडून द्यावी अशी इटालींतल्या लोकांनीं ओरड चालविली आहे

अडिग्रट ठिकाणास शत्रूनीं गराडा घातल्याची बातमी आहे.

आमचें ठाणें भयप्रद नसून किल्याच्या पाहारेकऱ्यांशिवाय आमच्याजवळ तीस हजार फौज आहे असें इटालीचा जनरल सांगतो.

या इटाली बरोबरीच्या लढाईत अबिसीनियाच्या राजाचे लोक घायाळ वगैरे झाले त्याच्या करतां रशियांत वर्गणीनें पैसा जमविण्याचें काम सुरू झालें आहे.

आस्त्रियाचा परराज्यसंबधीं प्रधान बर्लीन येथें जर्मन दरबारी आला आहे आस्त्रया, जर्मनी व इटाली यांचें एक्य झालेलें आहे तेव्हां हल्लींच्या अबीसीनियाच्या प्रकरणांत आपण इटालीस मदत केली पाहिजे असें त्या प्रधानाचे जर्मनीशीं बोलणें आहे.

इटालीच्या जुन्या प्रधानमंडळानें राजीनामा दिल्यामुळें नवें प्रधानमंडळ स्थापन झालें.

इटालीचा पराभव झाल्यावरून अबिसीनियाचा राजा हळू हळू अडीग्रट कडे पुढें सरकत आहे.

दरवेशी लढवये पुष्कळ लोक कसालावर चाल करून येत आहेत. कसालाच्या पराजयाचा परिणाम माधी गडबड सुरू करील असें कित्येकांचें अनुमान आहे.

इजिप्तची फौज डोगाला कबजांत घेण्याकरिता पुढें सरकत आहे, दरवेशी लोकांनीं जी उचल केली आहे त्याकरतां ही तजवीज आहे.

इटालीच्या पराभवामुळें ही व्यवस्था फार घाईनें करणें भाग झालें आहे. दरवेशी लोक कासालाच्या अगदीं जवळ येऊन पोचले. इटालीनें अबिसीनियाच्या राजाशीं तहाचें बोलणें सुरू केलें, आणि या अबिसीनियाच्या कामावर जास्त फौज पाठविण्याचा आपला बेत रहित केला

हिंदुस्थानांत इलाख्याच्या ठिकाणी हल्लीं सेविंग ब्यांकचें आफीस वेगळें असून पोष्टाची सेविंग ब्यांकही आहेच, पण यापुढें या दोन वेगळ्या ठेवण्याची अवश्यकता नाहीं असें सरकारचें मत झालें.

पूर्वेकडे म्हणजे चीनच्या बाजूस रशियाची हल्लीं ९०,००० फौज आहेच व आतां समजतें कीं, आणखी नवी फौज त्या बाजूस पाठविण्याचा रशियाचा उद्योग जारीनें चालू आहे. कशा करतां?

मुंबईस सर मंगळदास नथुभाई नावाचे एक नामांकित गृहस्थ होऊन गेले त्यांस दोन मुलगे असून त्यातील एका मुलास कलावंती नावाची एक मुलगी आहे पुरूषोत्तमदास याच्याशीं या मुलीचें लग्न करण्याचें सर मंगळदास यांणीं ठरवून मरणा पूर्वी साखरपुडा वगैरे झाला मुलीचें लग्न अजून होणें आहे. मुलगी हल्लीं हैस्कुलांत पहिल्या वर्गांत शिकत असून तिचें वय १९ वर्षांचें झालें आहे. केलेल्या कराराप्रमाणें कमलावंतीचें लग्न माझ्याशीं करावयाचें असल्यास येत्या वैशाखाच्या आंत करावें नाहीं तर झालेला करार रद्द करावा अशी होणाऱ्या जावयानें मुलीच्या बापास नोटीस दिली. त्या प्रमाणें बापानें कबूल केलें नाहीं. अर्थात जावई पुरुषोत्तमदास यानें मुलीच्या बापावर दावा केला व करार अमलांत येत नसेल तर नुकसानीबद्दल २९,००० रुपये देववावे असें कोर्टाजवळ मागणें केलें. जज्य क्यांडी यांच्यापुढें चवकशी झाली. माझी माट्रिक्युलेशन परिक्षा पास झाल्यावाचून मी लग्न करूं इच्छित नाहीं व तुर्त लग्न करण्याची इच्छा नसून तूर्त लग्न करण्याची मला अवश्यकताही वाटत नाहीं असें मुलीनें आपल्या जबानींत कोर्टास सांगितलें सर मंगळदास यांच्या इच्छे प्रमाणें कमलावंतीचें लग्न वादीशीं करण्याची माझी खुषी आहे, पण मुलीच्या इच्छे विरुद्ध, माझ्यानें कांहीं करवत नाहीं, आणि मुलीच्या इच्छेविरुद्ध करवत नहीं अशी आमच्या जातींत रीत असून अमूक वया या आंत मुलीचें लग्न केलेंच पाहिजे असाही आमच्या जातींत नियम नाहीं असें मुलीच्या बापानें आपल्या जबानींत सांगून आपल्या त्या सांगण्याच्या सत्यतेबद्दल पुरावाही दिला. दोन्ही बाजूंनीं वकील बारिस्टर यांच्या अनेक प्रकारच्या कोव्या व कल्पनाही होऊन तकरारीहा झाल्या. आतां जज्जाचा ठराव मात्र व्हावयाचा आहे. तो झाला कीं तेंच धर्मशास्त्राचें मत असें ठरून त्या प्रमाणें अंमलही होईल. टा० अ०

श्रीरंगपट्टणचें देऊळ—हें देऊळ फारच मोठें आहे. ह्याची आकृति चौरस असून प्रत्येक बाजूची लांबी एक मैल आहे. ह्या चौरसाच्या आंत पुन्हा चौक आहेत ह्या देवालयाच्या तटाच्या भिंती २९ फूट उंच आणि ९ फूट जाड आहेत. जेथें मुख्य देवस्थान आहे त्याच्या सभा मंडपास १००० खांब आहेत, व तो प्रत्येक एकेक दगडाचा कोरून तयार केला आहे असें म्हणतात. एवढीं अवाढव्य देवालयें, पृथ्वींत अगदींच थोडीं असतील.

ग्वाहेर संस्थानच्या कांहीं भागांत दुष्काळ पडला असल्यामुळें ग्वाल्हेरच्या महाराजांनीं त्यांस कामावर लावण्यासाठीं गुना बारा रेलवेचें काम सुरू केलें आहे.

पुढील महिन्यापासून बंगाल-मद्रास आणि मुंबई या इलाख्यांच्या मेडिकल सर्व्हिसेस एकत्र होणार असून त्यांच्यावर खुद्द हिंदुस्थान सरकारची देखरेख रहाणार.

आगीनें नुकसान—मुंबईस आर्मी ऍंड नेव्ही कोऑपरेटिव सोसायटीच्या दुकानास आग लागून सुमारें १०-१२ लक्षांचें नुकसान झालें. या दुकानांतील मालाचा विमा उतरण्यांत आला होता.

ठराव—गांवठाणापासून पाव मैलाचे आंत ऊंस, केळीं वगैरे करितां कनालचें पाणी सरकारचे परवानगीवांचून मिळणार नाहीं. असा ठराव झाला आहे म्हणून सोलापुरसमाचारकर्ते लिहितात. ज्यांची शेतें गांवटाण्यांत असतील त्यांनीं इकडे लक्ष द्यावें.

गोव्यांतील बंडावा अद्याप विझला नाहीं. सरकारी फौज व बंडवाले यांच्या झटापटी अद्याप होत आहेत. शु० सू०

मि० 'वुइेलहेम' या सुप्रसिद्ध इंजिनियरें असें शोधून काढिलें आहे कीं, ज्याप्रमाणें विमानांत बसून आकाशांत जातां येतें, त्याप्रमाणें समुद्राच्या तळींही जातां येतें. त्याणीं हा प्रयोग प्रथमतः १८६१ सालीं केला त्याचप्रमाणें दोघा रशियन इंजिनिअरनींही अशीच युक्ती काढिली आहे, त्यांणीं इ. सन १८९३ सालीं एक मोठें जहाज समुद्रांत बुडालेलें विमानाच्या साह्यानें समुद्रांत बुडी मारून वर काढिलें. तें जहाज सुमारें पृष्ठभागापासून तीस फूट खालीं खोल गेलेलें होतें. त्यांत त्यांनीं चांगले पोहणारे व पाण्यांत बुडी मारणारे पानबुडे बसवून त्यांच्याकरवीं तें विमान त्यांणीं समुद्रांत सोडलें आणि बुडालेले जहाज वरती काढलें.

दीर्घायुष्य व चांगली प्रकृति पाहिजे असल्यास खालील गोष्टी लक्ष्यांत धरून त्याप्रमाणें वागणूक ठेवावी:—

( १ ) रात्रंदिवस स्वच्छ हवेंत श्वासोच्छ्वास करण्यास मिळावा.

( २ ) पुरेशी झोंप व विश्रांति घ्यावी.

( ३ ) मर्दाप्रमाणें श्रम करावे, पण फाजील श्रम कधींहि करूं नयेत.

( ४ ) राग नेहमीं टाळावा, क्षणाचा राग कधीं कधीं जन्माचें नुकसान करतो.

( ५ ) सर्वच कामें एकट्यानेंच स्वतः करण्याची हांव धरूं नये.

( ६ ) कधींही निराश होऊं नका. निराशा हा एक जबरदस्त रोग आहे

करमणूक.

आमस्टेर्डाम येथें एक यंत्र केलें आहे हें यंत्र म्हणजे लोखंडाचा माणसासारखा माणूस आहे. कोणाचें कपाळ दुखत असल्यास त्यानें तेथें जावें व कपाळाचे भोंकांत २ पैसे टाकावे कीं, डोकेंदुखीच्या औषधीचा एक कागद व त्यावर तें कोठें मिळेल त्याचा पत्ता, असें बाहेर येतें हे दोन पैसेवाले डाक्टरच. कोणत्याही रोगास हें हटकून औषध देतात.

बत्तीस कोट बायकांनीं फेर धरला तर त्यांत भूगोल मावेल म्हणतात. हिशोब आहेत!

शिमग्यांतील लढाई--बेळगांव जिल्ह्यांतील चेनवसूर गांवच्या लोकांनीं होळीकरितां सरकारी जंगलांतून लांकडे चोरून आणिलीं अशा संशयावरून पोलिसांनीं गांवीं जाऊन तपास चालविला. त्यावेळीं पोलिसाची व लोकांची बाचाबाच होऊन गोळीमारापर्यंत मजल आली. त्यांत १ इसम ठार झाला व दोघे जखमी झाले. ह्या तिघांची स्थिती पाहून गांवकऱ्याला जास्त चेव आला व २।३ शें लोकांचा जमाव करून त्यांनीं पोलिसावर हल्ला करण्याचा बेत केला होता. पण पोलिसांनीं एका देवळांत शिरून दारें बंद करून दडी मारल्यामुळें प्रसंग निभावला पोलि. सुपरि. साहेबांनीं ह्या दंग्याचा तपास आतां चालविला. आहे. काय शिमगा हा.

---

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

| | | |
|---|---|---|
| सहामाही | ,, ३ | ,, ०८ |
| सालअखेर | ,, ७ | ,, १ ०८ |
| किरकोळ अंकास | .... .... .... | ०४ |

नोटिशी बद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत रू० | १ |
| दर ओळीस .... | ०१०६ |
| दुसरे खेपेस .... .... | ०१ |

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

| | |
|---|---|
| Annual in advance 5 Postage '13 as. | |
| Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as. | |
| Six monthly ... ... ... 3 ,, 8 as. | |
| Single copy ... ... ... ... ... 4 as. | |

Advertisement.

Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine 3 as

VOL XXX AKOLA MONDAY 30 MARCH 1896 NO 12

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख ३० माहे मार्च सन १८९६ इ० अंक १२



## घड्याळ.

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपली. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझर्लंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे रासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे. मागील बाजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल (लेटी) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस ६ जीवेल (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहेत.) ज्या घड्याळास रुबी ज्वेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— "गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल."

गोविंद महादेव पोळ.

१२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक.


नोटीस

रा० रा० बालचंद मोतीलाल साहु दुकान अकोलें यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं मजकडे तुमचे कर्ज होते त्याबद्दल तुह्मी संमत १९४९ सालांत हिशोब करून तुह्मी जनपासून रजिष्टर दस्तैवज रुपये १०० पांचशेचा करून घेतला आहे. त्याचा करार पुरा होऊन गेला करितां रा० रा० ब्याहारीलालजी साहु याज शी माझी सर्व जिंदगी रुपये १००० हजार वर ताबेगहाण ठेऊन रजिष्टर करून दिलें आणि मी आपले खर्चा करितां रुपये ४०० नगदी त्यापासून घेतले. रुपये ६०० रुपये तुमचे करितां घेतलें तुह्मास देण्या करितां तुमचे दुकानावर घेऊन आलो तरी तुम्ही रुपये घेतलें नाहीं त्या दिवसां पासून ६०० रुपये माझे जवळ अनामत ठेविले आहेत आतां मी असें ऐकतो कीं तुम्ही मजवर फिर्याद करणार आहा तरी तुम्ही मजवर विनाकारण फिर्याद कराल तर तुमचा खर्च विनाकारण बुडेल कारण मी तुम्हास रुपये देण्यास तयार असतां तुम्ही घेतलें नाहीं. तुम्ही रुपये घेत असाल तर मी आतां देण्यास तयार आहे तुम्ही आपले व्याज वाढवाल तर मी व्याज कांहीं देणार नाहीं. कळावें तारीख २२। ।९६ इ०

(सही)

हरशिंग वल्लद परशराम कुणबी
राहणार खडकी टाकळी
निशाणी खुद्द.

...on pur

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १ शके १८१८

## गरीब लोकांच्या स्थितीचा विचार

(रा० रा० शंकर नायायण डांगे बी. ए. यांनीं व्याख्यान रूपांत लिहिलेला)

"गरीब लोकांचे स्थितिबद्दल कांहीं विचार" हा विषय आहे. आणि आपण जे आज येथें जमलो आहोत त्यापैकीं बरेच लोक त्या स्थितींत असल्यामुळें सर्व लोकांच्या लक्षांत ते चांगल्या रितीनें येतील. गरिबी ही सर्व काळीं सर्व राष्ट्रांत दिसून येत आहे. देश कितीहि श्रीमंत आहे तरी त्यांत गरीब लोक सापडावयाचेच व त्यांच्या स्थितीचें वर्णन व ती घालविण्याबद्दल चे उपाय सर्व राष्ट्रांत हितचिंतक लोकांनीं व सरकारांनीं केले आहेत व कित्येक राष्ट्रांत तिचे प्रमाण कांहींवेळ पर्यंत कमी ही केलें आहे. पण आपल्या ह्या देशांत त्यांचें प्रमाण जास्तच होत चाललें आहे.

या देशांत ह्मणजे २८ कोटी प्रजेंत $\frac{२}{५}$ प्रजा खाऊन पिऊन सुखी आहे जवळ जवळ $\frac{३}{५}$ यांस नुसतें खावयास मात्र मिळत आहे व $\frac{१}{५}$ ह्यांस फक्त एकदाच खावयास मिळत आहे. ह्मणजे हे लोक व ज्यास दोन वेळ खावयास मिळत आहे हे या दोहोंस मी गरीब असें ह्मणतो या मानानें आपल्या देशांत गरीबांची संख्या शेकडा ७५ तरी अशी आहे व एकदरीनें १८ कोटी होते. तेव्हां आपला देश निर्विवाद गरीब होत चालला आहे आणि याची स्थिती सुधारण्या बद्दल हितचिंतकांचे विचार ही चालू आहेत. व ते विचार काय आहेत व शास्त्रदृष्ट्या त्यांचें स्वरूप कसें आहे या बद्दल आपण विचार केला पाहिजे. कोणी ह्मणतात प्रजेवर कराचा बोजा फार आहे. कोणी ह्मणतात कीं जमीन निकस झाली आहे व प्रजे जवळ त्राण राहिला नाहीं. काणी ह्मणतात पूर्वी धान्य वगैरे देशांतच पिकत होतें व देशांत राहत होतें व आतां तें बाहेर गावीं जाऊं लागलें. अशी प्रत्येकाचीं कांहींना कांहीं कारणें आहेतच व प्रत्येक जण आपल्या मताप्रमाणें कांहींना कांहीं तरी उपाय शोधून काढतोच व काढीत आहे. पण सर्व प्रकारचीं कारणें शोधून काढून खरीं कोणतीं व खोटीं कोणतीं, मुख्य कोणतीं व गौण कोणतीं याचा फार थोडे विचार करितात. तरी पण अलीकडे या प्रश्नाचा विचार बऱ्याच राष्ट्रांनीं केला आहे. युरोपांतील सर्व राष्ट्रांची आधिभौतिक स्थिति बरीच सुधारली आहे. जिकडे तिकडे आगगाड्या, तारायंत्रें, शेतींत सुधारणा सुरू होऊन व्यापार वाढला आहे तरी गरीब लोकांची तिकडे स्थिती जशी सुधारावयास पाहिजे तशी सुधारत नसल्यामुळें या प्रश्नाचा विचारही लोक अर्थशास्त्र दृष्ट्या करू लागले आहेत व बरींच खरीं कारणें व खरे उपाय शोधून काढले आहेत व आपल्या देशाच्या ह्या स्थितीला या पैकीं उपयोगी पडतील असें मत दिलें असतां चुकीचें होईल असें मला वाटत नाहीं.

आपल्या देशांत वर निर्दिष्ट केलेल्या गरीब लोकांचें ह्मणजे एक वेळ खाऊन राहणारे व नुसते दोन वेळ खाऊन राहणारे लोकांचे दोन वर्ग करिता येतात. पहिला ह्मणजे केवळ भिक्षेवर अवलंबून राहिलेला. यांत भिक्षुक, फकीर, भिकार, आंधळे पांगळे वगैरे. दुसरा वर्ग ह्मणजे काबाड कष्ट करणारे ह्मणजे स्वतःचें भांडवल नसतांना केवळ श्रमावर राहणारे व शिलकेंत जवळ कोणत्याही प्रकारचें भांडवल नसलेले. यांत मजूर विशेषकरून येतात. पण हा वर्ग बराच व्यापक आहे. मजूरा सारखेच दुसरे पोट भरणारे येतात ह्मणजे लहान लहान काबाड कष्टाचे धंदे करणारे लोक उदाहरणार्थ शिपाईगिरी वगैरे. खरा अर्थ भांडवलाच्या उत्पन्नावर पोट न भरणारे किंवा पोट भरण्या इतके भांडवल नसलेले. व अर्थशास्त्रदृष्ट्या श्रम याचा अर्थ ही असाच केला आहे ह्मणजे Labour याचा अर्थ मानसिक व शारिरिक असा घेऊन क्लार्क, टीचर, जज्ज हे देखील श्रमावर पोट भरतात असें मानिलें आहे आणि या दुसऱ्या वर्गांत आपणापैकीं पुष्कळ लोक येत आहेत.

आतां आपण प्रत्येक वर्गाच्या स्थिती बद्दल विचार करू.

वर सांगितल्या प्रमाणें भिक्षा मागणाऱ्या वर्ग लोकांच्या स्थितीचा विचार करण्यापूर्वी भिक्षेचें स्वरूप काय आहे हें समजलें पाहिजे. ती घालण्याचा महिमा केवळ धर्मांत वर्णन केलेला आहे इज्याध्ययन दानानि तपः सत्यं धृतीक्षमा अलोभइति मार्गोऽयं धर्मस्याष्टविधः स्मृतः या स्मृतिकाराच्या वाक्या प्रमाणें दान हा धर्माच्या अष्टमार्गापैकीं एक मार्ग होय. बायबल मध्यें Charity बद्दल बरेच नियम आहेत व कुराणाच्या चतुष्टय अंगाचें दान हें एक अंग आहे. परंतु ह्या दाना संबंधाचे नियम व व्यवस्था ही राष्ट्राराष्ट्रांत वेगळ्या प्रकारची आढळून येत आहे. व त्या योगानें आपल्या पहिल्या वर्गाच्या लोकांच्या स्थितीवर परिणाम घडून येत आहे तिचे नियम आपल्या देशांत असावेत तसे नसल्यामुळें ह्या पहिल्या वर्गाची स्थिती जास्त वाईट होत चालली आहे. भिक्षेचें मूळतत्व भूतदया व समदुःखिता वृत्ति असल्यामुळें प्रत्येक मनुष्य कळवळा उत्पन्न झाल्यामुळें दुसऱ्यास त्याच्या दुःसह स्थितिबद्दल कांहीं देतो. प्याले ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं ज्या वेळेस आपण कोणास कांहीं देतो त्या वेळेस असें दिसून येईल कीं दात्याच्या मनांत याचक तिचा काय उपयोग करील किंवा याचक हा दान घेण्याच्या योग्यतेचा आहे किंवा नाहीं या गोष्टीच येत नाहींत किंवा आल्या तरी त्या गोष्टीचा पगडा आपल्यावर बसू न देतां केवळ दुःख पाहवत नाहीं ह्मणूनच त्यास कांहीं देतो. आणि ह्मणूनच ही गोष्ट मनोवृत्तीवर अवलंबून असल्यामुळें योग्यता योग्यतेचा विचार होत नाहीं कारण जेथें मनोवृत्तीची छाप आहे तेथें न्यायान्याय, योग्यायोग्य हें सर्व एकीकडे राहतें. तर मग कोणी ह्मणेल कीं भिक्षा घालण्या संबंधीं नियम हे कसे ठरविण्यांत येतील; ते नसल्या पासून तोटे ते कसे झाले आहेत व आपल्या ह्या प्रस्तुत विषयाशी त्याचा संबंध काय होय? त्या पासून आपली गरीब स्थिती ज्यास्त वाढली आहे व विशेषे करून आपल्या देशांत हव्या त्या मनुष्यास भिक्षा मिळते मग तो धट्टा कट्टा असो किंवा साधारणतः सुखवस्तु ही असो. याचकवृत्ति मात्र धारण केली पाहिजे. आज लाखो लोकांचा असा परिपाठ झाला आहे कीं आज गांवोगाव प्रांतोप्रांत हे लोक हिंडून लोकांच्या मनांत कोणत्याही कारणानें भूतदयेची प्रेरणा करून आपलें आपलें काम साधून घेत आहेत अशा रीतीनें चरितार्थ चालत असल्यामुळें या लोकांत स्वावलंबनाचा अंश ब-

...राव कमी दिसतो व बुद्धिमांद्य, आलस्य व कार्यादक्षता हे दोष मात्र दिसून येत आहेत

[ पुढें चालेल. ]

---

वऱ्हाड प्रांतास अमानी मुलूख म्हणतात ही राजकीय स्थिती किती कालपर्यंत अशीच चालणार आहे हें कांहीं सांगवत नाहीं. निजाम सरकार व इंग्रज सरकार या उभयता मधील हा प्रश्न आहे. थोरले सर सालरजंग हयात होते तेव्हां या गोष्टीविषयीं उहापोह वारंवार होत असे त्या वेळीं या प्रश्नाचा ...लिकाल निजाम सरकारच्या वयांत येण्यावर दारोमदार ठेविला होता पण अलिकडे हा प्रश्न अतिशय नाजूक बनला आहे. निजाम सरकार मांडलिक पडल्यामुळें व उत्तरोत्तर विचाराच्या विकाची स्वतंत्रता कमी कमी होत चालली यामुळें वऱ्हाड प्रांत परत मागण्याचा नवा प्रश्न उद्भूत करण्याचें धारिष्ट कोणास व झांहीं. इंग्रज सरकार या प्रकरणांत अगदीं राहूं; मुग्ध असून ते आपली चिकाटी न सोडतां तात्पर्यावर दृष्टी ठेवतील. वऱ्हाड प्रांताचा अमानीपणा कायम ठेवावा किंवा तो मोडावा हा प्रश्न इंग्रज सरकार स्वतां होऊन कधींच निकालास लागू देणार नाहींत. खुबीदार, पाताळयंत्री व दूरदर्शी अशीच राजकीय धोरणें आमच्या सरकारचीं असतात ते हां वरील प्रश्न मिटल्या सारखाच आहे.

वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकारच्या स्वाधीन केव्हां व कसा केला याची संक्षिप्त हकीकत मुंबईच्या टाईम्स पत्रांत आली आहे. हैदराबाद संस्थानाच्या संरक्षणार्थ जो फौजफाटा ठेवण्यांत आला होता त्याच्या खर्चाबद्दल ४३ वर्षांमागें निजाम सरकारला कंपनी सरकारचें ४९ लाख रुपयाहून अधिक कर्ज देणें होतें. सन १८११ सालीं रेसिडेंट रसेल साहेब यांनीं ही फौज प्रथम ठेविली आणि ती वाढता वाढता सुमारें आठ दहा लोकांची उत्तम पलटण बनली आहे. निजाम सरकारच्या राज्यांत स्वस्थता व शांतता राखण्याला या फौजेची जरूर होती पण संस्थानाच्या उत्पन्नांतून फौजेचा खर्च कांहीं भागण्या सारखा नव्हता. वर्षानुवर्ष हा खर्चाचा बोजा वाढत चालला आणि १८५१ त हें कर्ज ७० लक्ष रुपये झालें लार्ड डलहौसी यांनीं तगादा लाऊन १४ लक्ष रुपये वसूल केले. बाकीचें कर्ज पुन्हां तुंबुन चाललें. त्यावळीं जनरल फ्रेझर रेसिडेंट होते. संस्थानिकाच्या रक्षणार्थ म्हणून कांहीं फौज कायमची ठेवण न्यायाचें किंवा अन्यायाचें आहे अशा संबंधानें रेसिडेंट व लार्ड डलहौसी यांच्यामध्यें मोठा वाद पडला होता आणि सध्यां ही फौज म्हणजे कायमचा ससेमिरा निजाम सरकारला लागला आहे आणि तो वाद अशाच निकालावर मिटला असें उघड दिसतें. १८५२ सालीं पुन्हां हें कर्ज ५० लक्ष रुपये झालें. या कर्जाची भगमग तोडावी म्हणून निजाम सरकारानें आपले जवाहिर गहाण ठेविलें. ४० लक्ष रुपये मि० डायटन पासून त्या गहाणावर घेतले पण लार्ड डलहौसीनें कायद्याच्या बाजूनें मड अ जिकी की ब्रिटिश प्रजेनें नेटिव संस्थानिकास कर्ज देणें कामा नये. डायटन साहेबांस हद्दपार करण्याची भिती घातली तेव्हां त्यांनीं जवाहिर गुप्तपणें घेऊन मद्रासेस पळ काढिला. पुढें १८५४ गहाण कर्ज सर सालरजंग यांनीं फेडलें आणि जवाहिर परत घेतलें १८५३ सालींच निराळा तह झाला आणि वऱ्हाड, नलदुर्ग, व रायचूर हे प्रांत इंग्रजाच्या स्वाधीन कर्जफेडीसाठीं दिले. सालोसाल उत्पन्न व खर्च यांचा हिशोब द्यावा असें ठरलें होतें आणि त्या प्रमाणें २।३ वर्षें हिशोब ही देण्यांत आला. पण हिशोब पुढें देण्यांत आले नाहींत ही चूक आहे असें लार्ड क्यानिंग यांना १८६० त स्वतां लिहिलें होतें. १८५३ पासून १८६० अखेर पावेतो या प्रांताच्या उत्पन्नांतून कांहींच रक्कम निजाम सरकारास देण्यात आली नाहीं. आरंभीं तर ३० लक्ष रुपये उत्पन्न व ४४ लक्ष रुपये खर्च झाला या खर्चीत कंपनीच्या कर्जाच्या व्याजाची २॥ लक्ष रक्कम धरली आहे. राज्यकारभारानें खर्च अतिशय वाढले. शेंकडा १२॥ प्रमाणें खर्च येईल असा आरंभीं अंदाज होता पण तो सर्व चुकला. खर्च अगदी बेताल होत चालले ही गोष्ट व्हाइसराय साहेबांच्या लक्षांत आली आणि त्यांनीं या अवाढव्य खर्चाच्या रक्कमे पुरती कर्जाच्या रक्कमेतून वजावट करण्याचें कबूल केलें. पुढें १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं निजाम सरकारनें निस्सीम राजभक्तीनें इंग्रज सरकारास उत्कृष्ट मदत केली हें ऋण फेडण्यासाटीं इंग्रज सरकारनें बहुत नजराणे दिले, नलदुर्ग व रायचूर हे भाग परत दिले व जुन्या कर्जावर कांट मारला. वऱ्हाड प्रांताचें जें उत्पन्न होतें असें त्यांच्यांतून फौजेचा व राज्यकारभाराचा खर्च भागत असे. १८६० त निराळा तह झाला त्या अन्वयें सालिना हिशोब देण्याची रीत बंद केली आणि जी शिल्लक राहील ती निजाम सरकारास देत जावी असें ठरलें. सध्यां हीच व्यवस्था चालू आहे. ही व्यवस्था चालल्या पासून या प्रांताचा मोठा तोटा आहे. लष्करी खर्च विनाकारण या प्रांतांवर पडतो. इंग्रजी राज्यव्यवस्था पद्धतशीर, नियंत्रित, व सुखावह आहे पण तिच्यामुळें फार खर्च वाढले आहेत. सन १८८८ सालापासून एक कोटीवर या प्रांताचा वसूल आला. खर्च वजा जातां तीन वर्षें पर्यंत १८।१८ लक्ष रुपये सालिना शिल्लक रहात होती पण अलिकडे ही शिल्लक कधीं ७ किंवा ४ लक्ष रुपये राहूं लागली आहे. अशा उधळपट्टीच्या राज्यव्यवस्थे बद्दल इंग्रज सरकार फक्त स्वतालाच जबाबदार आहे. निजाम सरकारास सालिना रक्कम कमी पोंचली तरी देखील कांहींच विचारपूस होऊं शकत नाहीं. रयतेचें हित अशा राज्यकारभारांत नाहीं प्रांत परत निजामशाहीस जोडला तर बरें पण निदान त्या दिशेनें कांहींच हालचाल होऊं शकत नाहीं तर हा प्रांत खालसा होईल तर बरें असें म्हणणें भाग पडलें आहे.

---

वऱ्हाडांत सरकारतर्फे वकील मुकर नसल्यामुळें लोकांचें नुकसान फार होतें. इतके दिवस सेशनांत जे खटले चालत असत ते सरकारतर्फे चालविण्याचें काम आकोल्यास व उमरावतीस आळीपाळीनें कोणत्या तरी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनराकडे देतात. ज्या दिवशीं सेशनांत खटले चालतात त्या दिवशीं सरकार तर्फे या वकिलाची कचेरी बंद राहते. पक्षकार लोक कोर्टांत हजर राहिल्यानंतर त्यांचे मोकद्दमे पुढील तारखेवर ढकलण्यांत येतात. यामुळें साक्षीभत्ते, वकिलांची फी, येण्याजाण्याचे खर्च इत्यादि खर्चामुळें पक्षकार फार फार बुडतात. एखादें कोर्ट कांहीं दिवस बंद राहिलेलें पुरवलें पण तारखा नेमून ठेविल्या नंतर तें बंद राहिल्या प्रमाणेंच निव्वळ दुसऱ्यातारखा नेमण्यांत येतात या गोष्टी पासून लोकांला फार त्रास व खर्च पडतो.

गेल्या दोन आठवड्यांत सेशन मधील खटल्यांत जी आपलें झालीं होतीं त्यांत देखील सरकार तर्फे वकील म्हणून येथील स्माल काजचे जज्ज रा० रा० हुळे हे उमरावतीस गेले होते. स्माल काज कडील रोज सुमारें ५० दावे चालतात तेव्हां चार पांच दिवस जज्ज हजर नसल्यामुळें किती लोकांचें किती नुकसान होणें याचा अंदाज सहज होण्या सारखा आहे मे० आवर्ड जुडिशियल कमिशनर या गोष्टीकडे विशेष नजर देतील आणि लोकांच्या सोयी लवकर करितील अशी आम्ही उमेद बाळगतों.

---

मुंबई इलाख्यांतील राधनपूर संस्थाना संबंधानें लोकांच्या मनाला मोठा धक्का बसला! त्या संस्थानाचे महाराजांनीं मृत्युपत्र करून त्यांत आपल्या पश्चात राज्यकारभार कसा काय चालवावा याविषयीं मोठ्या दूरदृष्टीनें, शहाणपणानें व कुशलतेनें व्यवस्था कळविली होती. तरूण राजपुत्र वयांत येईपर्यंत एक राज्यकारभार चालविणारें कौंसिल नेमिलें व त्यांतील कौंसिलदार सूज्ञ, अनुभवी व कार्यदक्ष असे नामांकित गृहस्थ निवडले. पण मुंबई सरकारनें तें मृत्युपत्रच रद्द केलें. माजी महाराजास हा मृत्युपत्र करण्याचा अधिकार पोचत नाहीं असें ठरविलें, आणि मेजर आक डॉनेल यांस त्या संस्थानचे आडमिनिस्ट्रेटर नेमिलें. या निकालानें निराळेंच तत्व स्थापिलें आहे. तें असेंच कायम राहिलें तर नेटिव संस्थानिकांच्या हक्कावर ही निराळी गदाच आली आहे असें समजलें पाहिजे. मृत्युपत्रांत गैर गोष्टी, प्रजेचें अकल्याण किंवा इंग्रजी सार्वभौमत्वाला बाधक प्रकरणें असतीं तर सरकारचें म्हणणें कांहीं तरी शोभलें असतें. अलिकडे नेटिव संस्थानाविषयीं स्वातंत्र्यहारक तत्वें नवीन नवीन सरकार आपल्या कृतीनें प्रतिपादीत आहे हें ठीक नाहीं.

---

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांनीं देशी भाषांत ग्रंथ लिहिण्यास मोठें उत्तेजन दिलें आहे. राजाश्रयाची मातबरी कांहीं विलक्षण आहे बडोदे सरकाराच्या कृपेनें भाषाविषय, इतिहास, शास्त्रीयविषय पाकशास्त्र, गृहशास्त्र, कायदे, क्रीडाशास्त्र अश्वकला इ० विषयांवर पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा क्रम चालू आहे. राष्ट्रकथामालेमध्यें जीं पुस्तकें गुंफलीं जातात तीं इराण, इजिप्त राम, कार्थेज, फ्रान्स, जर्मनी, रोम, रशिया इत्यादि प्रमुख राष्ट्रांच्या इतिहासांचीं आहेत. वरील राष्ट्रांचा इतिहास फार व्यापक आहे. यापैकीं कांहीं राष्ट्रांनीं युरोप व आशिया या दोन खंडाचा इतिहास नवाजुना केला आहे.

दुसरा पुस्तकसंग्रह महाराष्ट्र ग्रंथमालें खालीं केला आहे. या मालेंत राजधर्माचीं तत्वें, तत्ववेत्ता बेकन याचा विचाररत्नाकर, इंग्लंडच्या राज्यविस्ताराची राजकीय गुरुकिल्ली, मार्कस आरेलिअस बादशहाचीं बोधवचनें, मेन साहेबांचीं ग्रामसंस्था इत्यादि उपयुक्त विषयावरील इंग्रजी ग्रंथ मराठींत आणिले आहेत 'ज्ञान मंजुषा' नामक नवीन शास्त्रीय विषयावर ग्रंथमाला तयार करण्याचें काम चालू आहे. आजपर्यंत सुमारें जवळ जवळ ४० पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. बडोदे सरकारनें आपल्याच प्रजेवरच या ग्रंथप्रकाशनानें उपकार केले आहेत असें नाहीं तर सर्व महाराष्ट्र देश त्यांच्या या उत्कृष्ट उपकृतीबद्दल ऋणी आहे. वरील ग्रंथ बहुतेक भाषांतराच्या रूपानें आहेत त्यामुळें देशी ग्रंथकाराच्या भाषांतरकृतीची फक्त पारख व्हावयाची असते. आमच्या मतानें निव्वळ भाषांतरें भाषेला गोडी किंवा रसवैचित्र्य आणीत नाहींत. भाषांतर करण्याचाच संकल्प ग्रंथलेखकांचा असल्यामुळें बुद्धि सर्व दिशेनें कुंठीत होते आणि ग्रंथाचा उठावणी जशी पाहिजे तशी होत नाहीं. श्रीमंत महाराज सयाजीराव यांनीं आपल्या ग्रंथमालेचे कर्तृत्व चांगल्या विद्वान गृहस्थाकडे सोंपविलें आहे तेव्हां आमची श्रीमंतास विनंती इतकीच कीं त्यांनीं आपल्या आश्रित पंडितमंडळाकडून नवीन ग्रंथ रचवावेत आणि भाषांतराची दिशा बदलावी. भाषांतरा पेक्षां नवीन ग्रंथ लिहिण्याची जबाबदारी मोठी आहे. जबाबदारी पूर्णपणें शिरावर पडल्याशिवाय मनुष्याच्या हातून कामगिरी चांगली होत नाहीं. यश, लाभ, व लौकिक हीं अशा भाषांतराच्या पुस्तका पासून मिळत नाहींत. ग्रंथ रचनेची कला मोठी अवघड आहे. ती दृढव्यासंग व पारायणें या वाचून साध्य नाहीं. भाषांतरा पेक्षां ग्रंथ रचनेला श्रीमंत महाराज उदार आश्रय देतील तर त्यांच्या आरब्ध कार्याचा प्रस्तुत पेक्षां अधिक लाभ होईल असें आम्हास वाटतें. अखेरीस श्रीमंत महाराजाकडून गेल्या सप्तकांत 'रोम व कार्थेज' 'घर व त्याच्या भोंवतालची जागा' व 'संकेत खेळ' असे ३ ग्रंथ आम्हाकडे आले त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों आणि आमच्या वरील सूचनेचा श्रीमंत अवश्य विचार करितील अशी आम्ही आशा करितों.

---

सर आनथोनी म्याकडोनल्ड लेफ्टनंट गव्हरनर हे नीरत येथे गेले होते तेव्हां त्यांनीं सरकारची जमाबंदीची पद्धति लोकांस कळविली आणि धारा वाढवितांना प्रजेला पीडा होणार नाहीं अशा विषयीं काळजी घेण्याचें आश्वासन दिलें. हे अधिकारी रयतेकनवाळू व सरकारचे ही निस्सीम भक्त आहेत. सरकार व रयत यांच्या दरम्यानेच हक्क परस्परांस विरोधी व बाधक आहेत असें त्यांचें मत नाहीं. जमिनीवरील सारा अगदीं माफक ठेविला तरच सरकारचा व रयतेचा फायदा आहे सारा अति वाढल्या

मुळें शेतीचा धंदा बुडतो, व्यापाराचे पाऊल मागें पडतें, व रयतेची असंतुष्टी होऊन सरकाराचाही परिणामीं फायदा होत नाहीं. सारा वाढविण्याचे वेळीं प्रजेच्या गोष्टी सर्व ऐकून घेतल्याच पाहिजेत आणि निव्वळ तिजोरीच्या भरतीचकडे लक्ष्य ठेविता कामा नये. सर म्याकडोनल यांनीं जे सुविचार वर प्रदर्शित केले आहेत त्यांचा थोडा जरी प्रादुर्भाव आमच्या प्रांतीं फत्तास येईल तर आह्मीं लोकांचे मोठें भाग्य समजूं. सांप्रत वऱ्हाडांत चालूं असलेल्या फेर तरमबंदी विषयीं लोकांच्या पुष्कळ कुरकुरी आहेत पण अकोल्यास दहा बारा हजार लोकांच्या भरलेल्या जाहिर सभेच्या विनंतीला कोणीच वरिष्ट अधिकारी मान देत नाहींत ह्मणून रयतेची निराशा कितीं होत आहे हें निराळें सांगण्याचें प्रयोजनच नाहीं.

---

# The Berar Samachar

**MONDAY MARCH ,30 1896**

Since the time Raosaheb Sitaram Vishvanath Patvardhan B. A. assumed charge of his present post he has been deaplaying keen enthusiasm and energy in work. He has had nice ideals of things which he desires to introduce in the Berar Educational system. Neatness and legibility in hand writing, elegance in reading and a diligent manipulation of numerical figures in the various branches of mathematics—attributes comprised in the Three Rs. which as his ideas go, form the necessary preliminaries to competency in primary education, are being attended to with particular care in almost all the primary schools in Berar. When these three attributes supplant the old quaint modes of hand writing, oddity in reading and a slow and mechanical way of numerical calculations, there will no doubt be a decided improvement effected in the tone and character of the education received in primary schools These are among the many good things which it is the aim of the present Director to realize in near future. So far the ambitions of our most vigorous and out-spoken Director are well and good. There is a clear indication of ardour, zeal and energy in whatever we see of Rao Saheb S. V. Patwardhan.

Dissatisfied with the dull ways of working which he was able to discover in some teachers here and there or perceiving the inefficiency and many times the incompetency of many a teacher, he has inaugurated a heavy train of changes and transfers & given a strong stimulus to importation of foreigners. Numerous reports are however afloat concerning reductions made in salaries, fines inflicted, warnings given as marks of the highest displeasure and supercessions of claims. There is, it is thickly rumoured, a strong sense of dislike and aversion developing in the sensible portion of the teachers as a whole, at the indecorous treatment which it has been the unhappy lot of many a school— master to receive at the hands of Raosaheb S. V. Patvardhan. We cannot persuade ourselves to believe that there may be any great force in such rumours. Be they true or false, what we hope is that the growth of this feeling will be soon checked by his yielding to a prompt and willing compromise in action and giving a happy and harmonious turn to all the previous irregularities which might have occasioned the present unpleasant cloud of much evil talk and displeasure.

It is certainly useless for Raosaheb Patvardhan whose practical genius we are bound to admit, to carry to an excess his disrelish for the doings of his predecessors. The deeper the voice of Raosaheb Patvardhan groans disparaging the tact and practical sagacity of his distinguished predecessors, the wider and the stronger will be the apprehensions of the people at large as to the probable success of the educational department under the control an officer like him reviling in condemnation of the past and extolment of the present.

The predecessors of Raosaheb Patvardhan were by no means inferior to him. Their services to the country have been recognised as most deserving and they have proved able and farsighted administrators. It is absurd to suppose that they did not perceive the defects that are now complained of as the standing reproach of the present Berar Educational Department. There must have been some solid reasons for them to continue in a course of steady action. It will not be a profitless waste of energy if Raosaheb Patvardhan leaves off his impatient mood and turns his attention calmly and with interest, to the actions of his several predecessors in order to be able to discover the true motives which shaped and coloured their actions. After a careful study of their actions, an analysis will suggest itself disclosing the points of differences in the surrounding circum— stances necessitating differences in actions and and he will have the ultimate satisfaction of securing a light by the aid of which he can be prepared to give proper tone and form to his regime. We have offered these observations with no desire to teach Rao saheb Patvardhan— for his vast experience justly entitles him to respect ful considerations and reverential feelings on our part, but with a hope that he will take note of them as a mere suggestion couched in terms of a friendly intimation that time has now arrived when he can show to the pub lic that he is ever willing to secure the true and best interests of the pub lic by a zealous and faithful discharge of the functions pertaing to the high and responsible office he holds and that he is perfectly conscious that his good intentions will hardly avail when popular sympathy is weaned from his cause.

---

At the last Convocation of the Allaha— bad University the Vice chancellor Mr. Coulan strongly urged the students to continue their studious habits. The success in future life depends upon a strict adherance to them. Further on he proceeded in eloquent terms to show that the moral training has higher claims upon us. He remarked:—

"And not only must you go on adding to your knowledge, but you must be careful to preserve and increase that submission to discipline which you have been taught in the institutions to which you once belonged. The youthful mind, released from the control which was necessary in the class-room and the boarding house, is apt to believe and to act upon the belief that all discipline may be safely put aside with the note book and the text-book and to give itself up to the enjoyment of a so-called emancipated existence, It seems an accepted truth to many whom our Colleges and Schools have sent out into the world that, once the necessity for scholastic dicipline ceases, those who were subject to it may and, indeed, ought to indulge, if they are to prove their enlightened manhood, in intellectual license of every description; in tilting without reflection at principles and institutions which appear obnoxious and in demand ing reforms which commend themselves to their uniformed judgment. This course of procedure, evidenced by writings and speeches, violent in character and thoughtless in composition, results entirely from the absence of moral discipline. It cannot be too strongly impressed upon you that intellectual without moral training in the youths of a community only half prepares them for a life of true usefulness and is a fruitful source of danger to the community itself; for whilst the former may be aptly compared to the motive power in a ship which urges it along in the direction of its port moral training is represented by the ballast in that ship which keeps it steady in its course. It is well to be equipped with learning for the voyage that is now before you, and it is well that you should increase that stock of learning whilst the voyage is in progress, but it is better still that you should cultivate moral nature so that you may be able to apply your knowledge to the best advantage of yourselves and the community to which you belong. And this task nobler in its character and more beneficent in its effect than any com mited to human beings, is a task which you must undertake and perform for yourselves. In the acquisition of such learning as you possess, you have had the help of accomplished professors and masters and from them also you have learnt the rudiments of moral discipline; but to make that discipline perfect to make it the rule of your lives, you must trust to your own efforts alone. You have read the lives, he you have witnessed the career of men whom the world respects and honours, and I will venture to say you have found none such who lacked the moral attributes which go to constitute a sound mind and an exalted character. It is to these men you must look for an example, it is from them you must learn how to cultivate your judgment. If you do this, you may be confident of attaining to what is the aim and end of the education that has been imparted to you, for you will then posses not only the knowledge which enables men to take part with credit in the affairs of life, but the trained mental faculty which qualifies them to guide those affairs with prudence and success."

---

## वऱ्हाड

हवामान—उष्मा विशेष होत आहे. सध्या उष्णतेचें मन १०४ अंशा पर्यंत आहे. तुरळक पटकी, गोंवर, पाण्याची दुर्मिळता इत्यादि गोष्टी सार्वजनिक आरोग्यास फार बाधक होत आहेत.

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर, डिस्ट्रीक्ट जज्ज आकोले हे २॥० महिन्यांचे रजेवर येत्या १५ वे तारखेपासून जाणार असून त्यांचे जागीं मि० शेख इस्मायल साहेब ह्यांची नेमणूक झाली असें कळतें.

'मधुकर'—चमत्कारिक स्वप्न वाचलें. ...माणसें धर्मभ्रष्ट झालीं, मद्यपी बनलीं, व मांसहारी झालीं त्यांस कूळ, धर्म, व सोवळें ओंवळें कसचें! अशांला रामनवमि, शिमगा व वैधृती हीं सारखींच आहेत. अशा पाणक्यांचीं नांवें अन्योक्तीनें छापण्यांत हांशिल नाहीं. तिरस्कार बहिष्कार, इत्यादि प्रकारांनी त्यांचें व्यसन इतरास जडूं दिलें नाहीं म्हणजे पुरें आहे. यवतमाळचा स्वमगत वृतान्त शहरो शहरीं सुखवस्तु लोकांमध्यें थोडाबहुत आढळतो. गाष्ट बाईट तर खरी!

---

### नोटीस.

रा० अभिलाखराव वल्लद तिलकराम राहणार आकोला ताजनापेठ तालुके व जिल्हा मजकूर यांस.

खाली सही करणार याजकडून ... तारीख १९ माहे मार्च सन १८९६ ... सर्वीचे आकोला येथील शुद्धवऱ्हाडी वर्तमान पत्रांत नोटीस आह्मास दिली. त्याचे उत्तर.

तुह्मी नोटिसीत लिहिलेली हकीकत खरी नाहीं. ती सदरहू हकीकत निराळी ... हे दुसेर आह्मादर जबाबदारी नसून ... बाबदारी आपणावर आहे. व ती भरून ... वेयाकरितां योग्य व कायदेशीर तजवीज आम्ही करूं. कळावे. तारीख २७ माहे मार्च सन १८९६ इ.

(सही) रघुवीरप्रसाद रामप्रसाद ...
सोपनराम
बलदेव रामप्रसाद दस्तुर खुद्द.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां ये यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टात अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें
दि. की. १९ मुा. नंबर ३/९६

विं० सि० ज० साहेब जिल्हा यांचे कोर्टांत.

नांव— गंगाई मर्द गोविंदा
जात— कुणबी
राहणार—अनवी मिरजापूर तालुके अकोले
जिल्हा— अकोला. यांस मयत

गोविंदा बापाचे नांव डोमाजी कुणबी राहणार अनवी मिरजापूर तालुके अकोले जिल्हा अकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा ... भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या ज्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीने कळवि... येत आहे कीं, त्यांनीं तारीख ४ माहे एप्रिल सन १८९६ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टात अगर स्वारी जेथें असल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २४ माहे मार्च सन १८९६ इसवी.

V. N. Dandekar
सि० ज्यड्ज.

---

## वर्तमानसार.

...नसार.

मि. लाप साहेबांनीं रा. सा. केळकर यांचा स्वभाव तुडस, हेकेखोर, उद्धट, एककल्ली आणि अपरिमित असल्यामुळें त्यांचें कोणाशीं पटत नाहीं. वकील लोकांशीं त्यांचे वर्तन चांगलें नाहीं. ह्मणजे टाकून बोलण्याची संवय त्यांस असल्यामुळें वकील लोकांस ते अप्रिय झाले आहेत. देणें घेणेंचा धंदा करणाऱ्या सावकार लोकांचेंही ह्यांच्यावर प्रेम नाहीं रा. केळकर सारखे ओळखीचे किती नज्ज आढळतील. बरे!

पर्वत दररोज ९ यार्ड सरकत आहे— गार्ड मधील गौफी नांवाचा पर्वत दररोज पांच यार्ड प्रमाणें सरकत सरकत गार्ड नदीकडे चालला आहे. हा ह्या कलियुगांतला अद्भुत चमत्कार होय. ह्या पर्वतांतून अत्यंत कर्कश असा आवाज एक सारखा होत आहे, व तो जागोजाग इतका चिरटला आहे कीं त्याच्या जवळ कोणासही जाऊं देत नाहींत. तारीख २३ फेब्रुवारी रोजीं ह्या पर्वताचें हें अद्भुत चलन पहाण्यासाठीं पांच हजार लोक जमा झाले होते. ह्याऱ्या अशा सरकण्यानें एक दगडी कोळशाची खाण, आणि एक मैल रेल्वे यांचा सत्यनाश झाला, असें एक फ्रेंच बातमीदार एका वर्तमान पत्रास कळवितो.

शु. सू.

आह्मास लोकानियुक्त म्युनिसिपल प्रेसिडेंट नेमण्याचा हक्क द्या असें कल्याणकराचें सरकाराजवळ मागणें आहे असें समजतें.

रशियाच्या राज्यांतल्या बड्या लोकांच्या ज्या इस्टेटी आहेत त्यांतील शेकडा ४१ ह्मणजे १,००,००० इस्टेटी वेगळाल्या सरकाराकडे किंवा इतर सावकारांकडे गहाण वगैरे पडलेल्या आहेत आणि त्या गहाणाची कर्जाची रकम १,२०,००,००,००० रुपये झाली आहे. त्या बड्या लोकांचा कर्जबाजारीपणा इतका वाढत वाढत चालला आहे कीं त्यांच्या कर्जांत गेल्या पांच वर्षांत ८,४०,००,००० रुपयांचा वाढवा झाला आहे.

डा. पीटर हा जर्मनीचा आफ्रीकेंतला कमिशनर होता व त्याणें त्यावेळीं आपल्या आंगाखालच्या एका स्त्रीस व तिच्या प्रियकरास अन्यायानें फाशीं दिलें असा जर्मन पार्लमेंटन्टचा त्याच्यावर आरोप आहे व त्याबद्दल चवकशी करण्याचें त्या सरकारानें कबूल केलें आहे.

इंग्रज लोक सैदनवर जातात हें पाहून फ्रान्सांत मोठी गडबड उडून गेली आहे. या बाबतींत फ्रान्स व रशिया यांच्यांत फार बारीक बोलणें सुरू झालें आहे.

हिंदुस्थानच्या डाक्टरी चाकरीकरतां गेल्या जानेवारींत विलायतेस जी परिक्षा झाली त्यांत हिंदुस्थानांतले राहाणारे असे मिस्तर्ले तिसरे आले व त्यांची बंगाल्यांत नेमणूक झाली आणि मि. कुकडे ९ वे आले व यांची मुंबई इलाख्यास नेमणूक झाली. दोघे ब्राह्मण असून साध्यायी आहेत.

ठा० अ०

काफरिस्तान हिंदुकुश पर्वताजवळ एक डोंगराळ प्रदेश आहे. येथील लोकांवर काबूलच्या अमिरानें कांहीं सैन्य पाठविलें आहे. या लोकांस धरून मुसलमान करावें, त्यांच्या बायका धरून न्याव्यात आणि त्यांस गुलाम करून आपल्या देशांत न्यावें हा क्रम त्या फौजेनें चालविला आहे!

शिवाजी उत्सवः— धुळ्यास वैशाख शुद्ध प्रतिपदेपासून तीन दिवस शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव होणार आहे. खरोखर मोठा भाग्यकाल समीप आहे!

आ. व.

दि. ब. श्रीनिवास राघव आयंगार सि. आय. ई हे गेल्या मंगळवारीं किंवा बुधवारीं बडोद्यास जाणार होते. व ते गेल्यानंतर श्री० महाराज सरकार यांजशीं तेथील दिवाणगिरीसंबंधी समक्ष बोलणार आहेत. अद्याप कांहीं नक्की नाहीं.

विजेचे कंदील—लंडन आणि साउथ वेस्टर्न रेलवेवरील व्हाक्स हाल स्टेशनावरील टिकीट कलेक्टरांस विजेचे कंदील देण्यांत आले आहेत. हे कंदील त्यांच्या कोटास अडकविलेले असून त्यांत वीज उत्पन्न करण्याची बॅटरीही त्यांच्या छातीवरील खिशांत असते.

अबिसीनियांतील लगजा मेनलो कयाच्या सैन्यानें इटालियन फौजेचा बऱ्याच टिकाणीं पाडाव केल्यामुळें हल्लीं इटाली सरकार तिकडे जास्ती सैन्य न पाठवितां त्या राजाशी तह करण्याच्या विचारांत आहे.

आस्ट्रियाचा राजा ईंग्लंड व जर्मनी यांच्यामध्ये पूर्ण सलोखा करण्याची खटपट करीत आहे.

श्री. स.

सुरतेस अग्निनारायणानें प्रलय करून सोडला होता. सुमारें १०० घरांची राखरांगोळी होऊन कित्येक कुटुंबें उघडीं पडलीं आहेत. त्यांच्या करितां सर पेटिट सारखे उदाराल्म फंड गोळा करीत आहेत. गांवोगांवीं आगीबद्दल पूर्वींच कांहीं तजविजी केलेल्या पाहिजेत.

न्यूयार्क शहरांतील लोकांना सुवासिक लोणी फार आवडतें आणि तें सुवासिक होण्याकरितां ते लोक लोणी एका कपड्यांत वांधून गुलाबाच्या अथवा व्हायलेट जातीच्या फुलांत रात्रभर ठेवितात.

डॉ० रांटेन नांवाच्या एका युरोपियन गृहस्थानें शरिरांतील अदृश्य भागाचा फोटो काढण्याची युक्ति काढिली आहे. या युक्तीनें शरीराच्या कोणत्याहि भागांत कांहीं अंतरविकृति झाली असल्यास ती तावडतोब ओळखतां येते. यांच्या या युक्तिनें एका गृहस्थाच्या हातांत शिरलेली बंदुकीची गोळी उघडकीस आली! एडिसन या नांवाचे दुसरे एक साहेब मनुष्याच्या ज्ञानतंतूचा फोटो काढण्याच्या तयारीस लागले आहे!

व्या०

कै० विष्णु शास्त्री चिपळूणकर यांच्या स्मृतीच्या सभेंत प्रो. जिन्सीवाले यांनीं सांगितलें कीं, शास्त्री बुवांनीं पंधरावीस वर्षांपूर्वीं जो अनर्थपात विध्वस्त करण्यासाठीं आपलें धनुष्य सज्ज केलें; तसल्याच प्रकारचा अनर्थ हल्लीं सुरू असल्यामुळें खरोखर शास्त्रीबुवांसारख्या महावीराची आजही अतिशय जरूर आहे; शिवाय आपले वास्तविक मत फार विचार करून बनवावें, व तें निर्भीडपणें मर्यादातिक्रम न करितां बेलाशक व्यक्त करावें हें शिक्षणही त्यांच्या लेखांपासून घेण्यासारखें आहे.

मो० वृ०

भोपाळच्या राज्यांत थोड्या वर्षांपूर्वीं दुष्काळाची फेरी आली होती, त्यावेळीं त्या संस्थानच्या श्रीमती बेगम साहेबांनीं आपली धान्यागारें व द्रव्यागारें मोकळीं करून प्रजा पालन केलें, ही सुप्रसिद्ध गोष्ट वाचकांच्या लक्षांत असेलच. भोपाळच्या राज्यांत गेल्या २।३ वर्षांत अल्पवृष्टि झाल्यामुळें हल्लीं सुद्धां तेथील प्रजेवर आपत्काळ आला आहे; परंतु ईश्वर कृपेनें त्या संस्थानांतील प्रजेला बेगम साहेबां सारखी परोपकारी व अन्नदात्री स्वामिणी मिळालेली असल्यामुळें तेथील प्रजा बिनदिक्कत राहिलेली आहे. तिकडील लोकांची हायहाय बिलकुल ऐकण्यांत येत नाहीं. हल्लीं भोपाळच्या बेगम साहेबांनीं दुष्काळ शमनाचे उपाय ज्यारी सुरू केलेले आहेत. ते उपाय, पात्रापात्र पाहण्याची त्यांची बुद्धि, त्यांचीं समता व त्यांचें धोरण हीं खरोखरच तारीफ करण्या सारखीं आहेत.

होळकर महाराजांवर व्हैसरायांचा रुसवा झालेला होता. पण आतां शुद्ध मन होऊन येत्या हिवाळ्यांत इंदुरास येण्याचें व्हैसरायांनीं कबूल केलें आहे असें समजतें. महाराजांचे नंव दिवाण राव बहादूर नानकचंद यांनीं महाराजांचे इच्छेनुरूप संस्थानांत चांगल्या सुधारणा चालविल्या असून एजंट साहेब कर्नल बार हेही माहाराजांबद्दल हल्लीं खूष आहेत असे समजतें. इंदूर संस्थानाबद्दल झालेला गवगवा असाच मोडत जावा असें आह्मी इच्छितों.

स० शो०

ह्मैसूर येथील सोन्याच्या खाणींत गेल्या महिन्यांत २७९६ औस सोनें निघालें त्याचे मागील महिन्यांत या पेक्षां २१० औस जास्त सोनें निघालें होतें.

अनेक प्रयोगावरून असें खात्रीपूर्वक सिद्ध झालें आहे कीं, गाणें व वाजविणें यांच्या योगानें रुधिराभिसरणावर परिणाम होतो.

जपान देशांतील शाळांतून डाव्या व उजव्या दोन्ही हातानें लिहावयास शिकवितात. व हा प्रघात तिकडे फार दृष्टीस पडतो.

इं०प्र०

जीवंत मासा गळ्यांत अडकल्यामुळें सख्या गवऱ्या हा गेल्या गुरुवारीं मुंबईस मरण पावला. हा इसम कोंकणांतून नोकरी करतां येथें आला होता. गुरुवारीं तो मासे धरण्यास कुलाब्यास गेला होता, तेथें एक मासा धरल्यावर त्याचे डोकें दातानें चेचण्या करितां त्यानें तो मासा तोंडांत धरला परंतु दुर्दैवानें तो गळ्यांत उतरला त्यामुळें त्याचा श्वासोश्वास बंद झाला तो ४ इंच लांबीचा मासा वर काढण्या विषयीं पुष्कळ यत्न केले. शेवटीं हास्पिटलांत त्याचा गळा चिरून तो मासा काढण्यात आला परंतु सख्यास त्यापासून फायदा न होता तो मरण पावला.

दी.वं.

## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टीस सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग १३ सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

अर्जाचा नंबर २ सन १८९६

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टात.

अर्जदार बाळाजी

बापाचें नांव धनाजी

जात कुणबी

राहणार जौलवाडी ता०अर्वी जिल्हा वर्धा

वरील (अज्ञान) अमृत बापाचे नांव माहिमाजी जात कुणबी रहाणार सर्फापूर ता० एलिचपूर जिल्हा एलिचपूर याणें [ याच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावें ह्मणून ] (याचें पालन व मालमिळतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वास या लेखाने कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख ७ माहे एप्रिल सन १८९६ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत अगर स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हाकिगत दाखल करावी. तारीख ११ माहे मार्च सन१८९६ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि. की. मुा. नंबर २/१८९६ वर्ग १६

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टात.

नांव—साहेब देवी

जवजे—न्याहालसींग सीक

राहणार—एलिचपूर तालुके एलिचपूर

जिल्हा—एलिचपूर. यांस मयत

न्याहालसींग बापाचे नांव मुजनसींग राहणार एलिचपूर तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं मालावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख ७ माहे एप्रिल सन १८९६ इसवी रोजी सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात अगर स्वारी जेथें असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकिकत दाखल करावी.

तारीख ९ माहे मार्च सन १८९६ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur District
डिस्ट्रिक्ट ज्यड्ज.

☞ हे पत्र अकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा[illegible]सिद्ध केलें.